सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, ३१ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २७७ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## इस्रोच्या ऐतिहासिक मोहिमेसाठी उलट मोजणी सुरू, भारत अमेरिका - रशियाच्या पंक्तीत बसणार

श्रीहरिकोटा : आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रात स्पॅडेक्स या ऐतिहासिक अंतराळ मोहिमेसाठी उलट मोजणी सुरू आहे. भारताच्या यानाचे सोमवार ३० डिसेंबर २०२४ रोजी अर्थात आज रात्री नऊ वाजून ५८ मिनिटांनी प्रक्षेपण होणार आहे. ही मोहीम यशस्वी झाली तर भारत अंतराळात स्पॅडेक्स अर्थात डॉकिंग - अनडॉकिंगची क्षमता प्राप्त करणार आहे.सध्या ही क्षमता अमेरिका, रशिया आणि चीन या तीन देशांकडेच आहे.



भारताच्या स्पॅडेक्स मोहिमेंतर्गत पीएसएलव्ही सी ६० रॉकेटद्वारे दोन उपग्रहांचे प्रक्षेपण होणार आहे.या दोन उपग्रहांचे मिळून एकूण वजन सुमारे २२० किलो आहे. यापैकी एक चेझर आणि एक लक्ष्य असेल. अंतराळात डॉकिंग - अनडॉकिंग जानेवारी २०२५ मध्ये केले जाईल. हा प्रयोग पृथ्वीपासून ४७० किमी अंतरावर होईल. प्रयोगानंतर दोन्ही उपग्रह पृथ्वीभोवती दोन वर्षे फिरतील.

उपग्रह चेझरमध्ये कॅमेरा आहे तर उपग्रह लक्ष्यात दोन पेलोड आहेत. प्रयोग यशस्वी झाल्यास इस्रोला कक्षेतून बाहेर पडल्यानंतर वेगळ्या दिशेने जाणारा भाग पुन्हा कक्षेत आणण्याचे तंत्रज्ञान मिळेल. कक्षेत सर्व्हिसिंग आणि इंधन भरण्याचा पर्यायही खुला होणार आहे. स्पॅडेक्स मिशनमध्ये दोन भिन्न अंतराळयानं अंतराळात एकमेकांशी जोडली जातील. सोप्या भाषेत सांगायचे तर दोन्ही उपग्रह अंतराळात या तंत्रज्ञानाद्वारे एकमेकांशी जोडले जातील.याला डॉकिंग म्हणतात. त्यानंतर, दोन्ही उपग्रह अंतराळात वेगळे होतील. याला अनडॉकिंग म्हणतात. इस्रोने ही मोहीम यशस्वी केल्यास तसे करणारा भारत हा अमेरिका, रशिया आणि चीन नंतर चौथ्या क्रमांकाचा देश होणार आहे.

स्पॅडेक्स मोहिमेसाठी दोन्ही उपग्रह ताशी २८ हजार किमी वेगाने अंतराळात प्रवास करतील. या वेगाशी जुळवून घेऊन दोन्ही उपग्रहांना जोडणे आणि वेगळे करणे हे काम पूर्ण करावे लागेल. हे करताना कुठेही टक्कर होणार नाही याची खबरदारी घ्यावी लागेल. भारताने स्पॅडेक्स अर्थात डॉकिंग - अनडॉकिंगची क्षमता प्राप्त केली तर भविष्यात स्वतः चे अंतराळ स्थानक उभारण्याचा पर्याय भारतापुढे खुला होईल.

एकाच प्रक्षेपकातून दोन वेगवेगळ्या दिशांना प्रक्षेपित केलेले यानाचे भाग अंतराळात नेऊन तिथे जोडायचे या पद्धतीने टप्प्याटप्प्याने मोठे अंतराळ स्थानक उभारणे शक्य होते. स्पेस डॉकिंगचा हा प्रयोग अर्थात स्पॅडेक्स अमलात आणून अंतराळ स्थानक उभारून त्याद्वारे अनेक महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमा आणि प्रयोग करणे शक्य आहे. भारताला भविष्यात चंद्रावर माणूस पाठवून संशोधन करायचे आहे. मंगळ ग्रहावर यानाच्या मदतीने संशोधन करायचे आहे. या दोन्ही स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी स्पॅडेक्स मोहीम यशस्वी होणे आवश्यक आहे. यामुळे भारताच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमांना चालना मिळेल. यामुळे स्पॅडेक्स मोहिमेसाठी होत असलेले प्रक्षेपण भारतासाठी महत्त्वाचे आहे.

## ए.आय.चा वापर करून रस्ता सुरक्षा वाढविण्यावर भर : देवेंद्र फडणवीस

### पुढील १०० दिवसांमध्ये परिवहन विभागाने करावयाच्या कामाचा घेतला मुख्यमंत्र्यांनी आढावा

मुंबई, दि. ३० : परिवहन क्षेत्राला राज्याला सुरक्षित, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी पुढील ३ वर्षात नवीन ई.व्ही.पॉलिसी घोषित करण्याकरण्याबरोबरच १५ वर्ष झालेली वाहने भंगारात काढावी. रस्ते अपघाताचे प्रमाण करण्यासाठी ए.आय.चा वापर करून रस्ते सुरक्षा वाढविण्यावर भर देण्यात यावा. यासंदर्भात गुगलशी करार झाला असल्याने त्याचा वापर करावा. त्याचबरोबर घाटात मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने यावर इंजिनियरिंग सोल्यूशन शोधून काढावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच्या बैठकीत दिल्या.

राज्यात परिवहन सेवेला अधिक गती देण्यासाठी राज्यात बाईक टॅक्सी, मॅक्सी कॅब सुरू करण्यावर भर देण्यात यावा. त्याचबरोबर जुन्या १३ हजार शासकीय वाहने भंगारात काढली जावी अशा सूचना करून मुख्यमंत्री म्हणाले की, टॅक्सी, टो, शहर बस सेवेचे तिकीट दरासंदर्भात निर्णय घेण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. वडसा-गडचिरोली तसेच सोलापूर-उस्मानाबाद येथील रेल्वे प्रकल्पाचे काम हाती घेण्याची सूचना केली. राज्य परिवहन सेवेच्या १५ वर्षे झालेल्या बसेस भंगारात टाकून उर्वरित बसेसमध्ये एल.एन.जी. तसेच सी.एन.जी. बसविण्यात यावी जेणेकरून बसेसची कार्यक्षमता वाढेल. बसेसच्या सुरक्षेसाठी एस.ओ.पी. निश्चित करण्याच्याही सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी केल्या. यावेळी बंदरे तसेच विमानतळ प्राधिकरण आदिबाबतची चर्चा करण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे परिवहन, बंदरे आणि महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरण या विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस अन्नप व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री ङ आशिष शेलार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, सामाजिक न्याय मंत्री संजय सावकारे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, सचिव विरेंद्र सिंह, सचिव रविंद्र सिंह, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## दाऊदला फरफटत आणणार होते, मग वाल्या कराडला आणायला काय हरकत? जितेंद्र आव्हाडांची विचारणा

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई, दि.३० डिसेंबर : तुम्ही दाऊद इब्राहिमला फरफटत अणणार होते. मग आता वाल्या कराडला आणायला काय हरकत आहे? असा थेट सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महायुती सरकारवर करीत टीका केली आहे. मी आका काका म्हणणारा नाही, मी थेट धनंजय मुंडे यांचे नाव घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होऊन २० दिवस उलटले आहेत.मात्र या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मिक कराडवर अटक तर सोडा खून प्रकरणात आरोपीही करण्यात आलेले नाही.त्यामुळे राज्यभरात सध्या हा विषय गाजत असून वाल्मिकी कराड व त्याचे राजकीय गॉडफादर मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर सर्व स्तरातून पिके ची जोड उठत आहे याबाबत जितेंद्र आव्हाड यांनी सोमवारी मुंबईत पत्रकारांशी बोलताना पोलीस व सरकारवर कडाडून टीका केली. ते म्हणाले, 'लोकांची मेमरी शॉर्ट आहे. लोकं विसरून जातील. याची ते वाट पाहत आहेत ३०२ मध्ये वाल्मिक कराड यांचे नाव नाही. मोक्का लावू असे सभागृहात मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. मात्र अद्याप काहीच हालचाली घडलेल्या नाहीत.

संतोष देशमुख हत्याप्रकरणी ३०२ चा गुन्हा दाखल झाला आहे. मात्र, त्यामुध्ये वाल्मिक कराडचे नाव नसल्याचे सांगून आव्हाड म्हणाले की, अजित पवार यांनी अद्यापपर्यंत कोणतीच जबाबदारी घेतली नाही. उलट सभागृहात अजित पवार यांनी सुरेश धस यांना डोळा डोळा म्हणत खुणवत होते . त्यांचा उद्देश काय होता हे मला माहित नाही अण्णा हजारेंनी आरोप केल्यावर पवारसाहेबांनी सुरेश जैन, नवाब मलिक, पद्मसिंह पाटील, विजयकुमार गावीत यांचे राजीनामे घेतले होते आता मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी केली. त्यासह, वाल्मिक कराडच या घटनेतील मुख्य सुत्रधार असून त्यालाही अटक करण्याची मागणी आमदार, खासदार व स्थानिक नेते करताना दिसत आहेत. मात्र अद्याप त्याबाबत ते काहीही बोलायला तयार नसल्याची टीका त्यांनी केली.

महिला आयोगाचे पोलिसांना पत्र

वाल्मिकी कराड व मंत्री धनंजय मुंडे यांच्या बाबत राज्यभरातून रोष व्यक्त होत असतानाच

भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबाबत सर्व स्तरातून तीव्र प्रतिक्रिया अंत आहे. त्याबाबत मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळीने दिलेल्या तक्रारी नुसार राज्य महिला आयोगाने आता कार्यवाही सुरू केली आहे याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे पत्र पाठवले आहे, अशी माहिती आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिली.

## ठाण्याचे पहिले नगराध्यक्ष, पहिले महापौर सतीश प्रधान यांचे निधन

ठाणे : ठाणे नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष नंतर ठाणे महापालिका झाल्यावर या मनपाचे पहिले महापौर झालेले शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सतीश प्रधान (८५) यांचे रविवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. सोमवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. याआधी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या अनेक नेत्यांनी ठाण्यात सतीश प्रधान यांचे अंत्यदर्शन घेतले.

सतीश प्रधान यांच्या कार्यकाळात १९८० मध्ये ज्ञानसाधना महाविद्यालयाची स्थापना झाली. शिवसेनेचे माजी खासदार, ठाणे महापालिकेचे पहिले महापौर, ठाणे नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष अशी महत्त्वाची पदे भूषवलेल्या सतीश प्रधान यांच्या कार्यकाळात ठाणे शहरात महापौर मॅरेथॉन स्पर्धा सुरू झाली. सतीश प्रधान यांच्या नेतृत्वात ठाणे शहरात अनेक विकासकामं झाली. शिवसेनेची संघटनात्मक बांधणी आणखी मजबूत करण्याचे कामंही सतीश प्रधान यांच्या कार्यकाळात झाले.

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सतीश प्रधान यांच्या पश्चात मुलगा कमलेश प्रधान, सून डॉ. मानसी प्रधान, कन्या, जावई आणि दोन नाती असे कुटुंब आहे.

## क्रिकेट खेळताना आला अॅटॅक, ३२ वर्षीय फलंदाजाचा खेळपट्टीवर मृत्यू

जालना : आनंदासाठी आणि फिटनेससाठी मैदानी खेळ खेळण्याचा सल्ला डॉक्टरांकडून तरुणाईला सतत दिला जातो. पण धकाधकीच्या जीवनात अनेकजण तब्येतीकडे दुर्लक्ष करतात. सकस आहाराऐवजी फास्टफूडवर जगतात. नियमित व्यायाम करणे टाळतात. यामुळे एखाद्या दिवशी नेहमीपेक्षा जास्त धावपळ झाली तरी हृदयावर ताण येतो. रक्तदाबात चढउतार सुरू होतात. श्वास घेण्यास त्रास होतो. या एरवी छोट्या दिसणाऱ्या समस्यांकडे वेळेत लक्ष दिले नाही तर काही वेळा या समस्या जीवघेण्या ठरतात. काहीसा असाच प्रकार जालना जिल्ह्यात घडला आहे. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

क्रिकेट खेळताना धाव काढून झाल्यावर दोन फलंदाज धावपट्टीवरच एकमेकांशी बोलत होते. नंतर एक फलंदाज फलंदाजीसाठी गेला तर दुसरा अर्थात नॉन स्ट्रायकर एंडचा फलंदाज त्याच्या क्रिझच्या दिशेने जाऊ लागला. पण आधीचे श्रम त्याला त्रासदायक ठरले. तो क्रिझकडे जात असताना छातीत असह्य वेदना होऊ लागल्यामुळे खेळपट्टीवरच कोसळला. थोड्याच वेळात या खेळाडूचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. सहकारी खेळाडूंनी डॉक्टरांना बोलावले. डॉक्टरांनी तपासणी करुन खेळाडूचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचे सांगितले. धक्कादायक बाब म्हणजे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झालेल्या खेळाडूचे वय फक्त ३२ वर्षे एवढे होते. जालना शहरात एका क्रिकेट स्पर्धेदरम्यान खेळपट्टीवर त्याचा मृत्यू झाला. आयोजकांनी हृदयविकाराच्या झटका आलेल्या खेळाडूला रुग्णालयात नेले पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. अवघ्या ३२ वर्षांच्या उमद्या खेळाडूने प्राण गमावले होते.

## महाराष्ट्र टेक्नीकल टेक्सटाईल मिशनची स्थापना करावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. ३० : महाराष्ट्रात टेक्नीकल टेक्सटाईल मिशन ची स्थापना करणे, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळाची स्थापना करणे, नवी दिल्ली येथे आयोजितमत भारत टेक्स २०२५ मध्ये सहभाग घेणे, टेक्निकल टेक्सटाईल पार्कसाठी अभिरूची पत्रे मागविणे तसेच स्थानिक वस्त्रोद्योगासाठी कॅप्टिव्ह मार्केट योजना प्रभावीपणे लागू करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केल्या.

हातमाग विणकरांना सामाजिक सुरक्षा कवच प्रदान करण्याच्या दृष्टीने वृध्दापकाळासाठी निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. राज्याच्या एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी अर्बन हाट केंद्रांची स्थापना करणेबाबत योजना तयार करावी. तसेच प्रसार भारती यांच्या सहकार्याने करघा या पारंपारिक वस्त्रोद्योग मालिकेचा पहिला भाग प्रसारीत करावा. वस्त्रोद्योग विभागाच्या योजनांचे डिजिटायझेशन आणि ऑटोमेशन करून राज्यातील सूतगिरण्यांमध्ये प्राधान्याने सौर ऊर्जेचा वापर वाढविण्यावर भर देण्याच्याही सूचना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी केल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस अन्नप व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री ङ आशिष शेलार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, सामाजिक न्याय मंत्री संजय सावकारे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, सचिव विरेंद्र सिंह, सचिव रविंद्र सिंह, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## स्मार्ट रेशनकार्ड प्रथम कामगारांना प्राधान्याने द्या : मुख्यमंत्री

### पुढील १०० दिवसांमध्ये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने करावयाच्या कामाचा घेतला मुख्यमंत्र्यांनी आढावा

मुंबई, दि. ३० : स्थलांतरित कामगारांवर लक्ष केंद्रीत करून त्यांना स्मार्ट रेशनकार्ड देण्यात यावे. त्याचबरोबर स्मार्ट कार्ड देताना ते कुठल्याही राज्यातील असेल तर त्यांना महाराष्ट्रात कुठल्याही रेशन दुकानात त्यांना धान्य मिळेल, असे सांगण्याचा सूचना कराव्या, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज झालेल्या आढावा बैठकीत दिले.

आगामी वर्षात २५ लक्ष नवीन लाभार्थ्याचे सार्वजनिक वितरण यंत्रणेसाठी समावेशन करून त्याचे ई-केवायसी करून प्रमाणीकरण करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, मागील ६ महिन्यात एकदाही अन्न धान्याची उचल न केलेल्या शिधापत्रिकाची तपासणी करावी, शिधापत्रिकामधून मयत व्यक्ती वगळाव्या, १०० पेक्षा जास्त वय असणाऱ्या लाभार्थ्यांची फेरतपासणी करावी. तसेच संगणकीकृत न झालेल्या १४ लक्ष लाभार्थ्याचे नाव शिधापत्रिकेत समाविष्ट करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

अन्नधान्य वाटपामध्ये लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात धान्य वाटप व्हावे यासाठी सर्व रास्त भाव दुकानांमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटे बसवावेत, सर्व शिधापत्रिका धारकांना स्मार्ट शिधापत्रिकांचे वितरण करण्यात यावे. लाभार्थ्यांना वेळेत अन्न धान्याचे वितरण होण्याच्या दृष्टीने एक गाव एक गोदाम उभारण्याची कार्यवाही सुरू करावी. वाहनांचे जिओ टॅगीग करावे, अन्न धान्य वाटपामध्ये एक देश एक शिधापत्रिका धोरण राज्यात राबवण्यात येत आहे. त्याअनुषंगाने स्थलांतरित मजुरांना अन्न धान्य वाटपामध्ये प्राधान्य देण्यात यावे. गरजू लाभार्थ्यांचा सण उत्वस उत्साहात साजरा व्हावा यासाठी राज्यात सणांच्या काळात आनंदाचा शिधा वाटप करण्यात येतो. या आनंदाचा शिधा वाटपाची एक दिनदर्शिका तयार करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस अन्नप व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री ङ आशिष शेलार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, सामाजिक न्याय मंत्री संजय सावकारे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, सचिव विरेंद्र सिंह, सचिव रविंद्र सिंह, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## नितेश राणेंना मंत्रीपदावर राहण्याचा अधिकार आहे का? हे भाजपाने स्पष्ट करावे : अतुल लोंढे

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ३० डिसेंबर : देशाची एकता व अखंडता राखण्याची शपथ घेऊन मंत्री झालेले नितेश राणे केरळला भारताचा पाकिस्तान म्हणतात आणि भाजपला मतदान न करता काँग्रेस व इतर विरोधी पक्षांना मतदान करणाऱ्यांना दहशतवादी म्हणतात, अशा व्यक्तीला मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार आहे का? हे राष्ट्र प्रथम म्हणणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे स्पष्ट करावे, असे आव्हान प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिले आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील राणे यांनी नुकतेच केरळ बाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे त्याबाबत अतुल लोंढे म्हणाले की, अशा व्यक्तीकडून काय अपेक्षा करणार? पण आमचा प्रश्न देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आहे की, आजच प्रसिद्ध झालेल्या व्यक्तीगत खर्चाच्या आकडेवारीमध्ये महाराष्ट्राला बिहार व उत्तर प्रदेशच्या बरोबर नेऊन ठेवले आहे. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश व तेलंगणा ही गैरभाजपा शासित राज्ये यात दुपटीने आघाडीवर आहेत. शहर व ग्रामीण भागातील लोक जास्त कमावतात व जास्त खर्च करण्याची क्षमता ठेवतात हे सरकारचे आकडे आहेत. भाजपाने महाराष्ट्रात धर्मांधता व द्वेषाचे विष पेरल्याने राज्याची ही अवस्था झाली आहे म्हणूनच, कुठं नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा? असा प्रश्न विचारावा लागत आहे.

राज्यात सर्वात जास्त बेरोजगारी व महागाई आहे, शेतमालाला भाव नाही, एक जात दुसऱ्या जातीविरोधात लढवली जात आहे, हिंदू मुस्लीम तणाव वाढत आहे, रोज खून, बलात्कार होत आहेत. याला कारण धर्मांधता व द्वेषाचे राजकारणाच जबाबदार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांचा पंजाब बंद; १५० ट्रेन रद्द!

चंदीगढ : काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होण्यासाठी संयुक्त किसान मोर्चा (गैरराजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाच्या वतीने पंजाबमध्ये 'रेले रोको' आंदोलनाची हाक दिली होती. यावेळी शेतकऱ्यांनी विविध रेल्वे मार्गांवर ठिय्या देऊन रेल्वे मार्ग रोखले होते. त्यानंतर आता पुन्हा शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला आहे. आज किसान मजदूर मोर्चा आणि संयुक्त किसान मोर्चा यांनी पंजाब बंदची हाक दिली आहे. शेतकरी नेते जगजित सिंग डल्लेवाल हे किमान आधारभूत मूल्यासाठी कायदेशीर हमीसह आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी केंद्रावर दबाव आणण्यासाठी २६ नोव्हेंबरपासून खनौरी सीमेवर आमरण उपोषणासाठी बसले आहेत. मात्र अद्यापही केंद्र सरकारने काहीच निर्णय न शेतकऱ्यांनी पुन्हा आक्रमक भूमिका धारण केली आहे. शेतकऱ्यांनी पंजाब बंदची हाक दिली असून सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत अनेक ठिकाणी रेल्वे ट्रॅक रोखून प्रवासी आणि मालगाड्यांची वाहतूक विस्कळीत करणार आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने १५० ट्रेन रद्द केल्या आहेत. मात्र यामुळे प्रवाशांचा खोळंबा होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. उत्तर रेल्वेने ३ वंदे भारत एक्स्प्रेससह नवी दिल्लीहून कालका, चंदीगड आणि अमृतसरकडे धावणाऱ्या ३ शताब्दी एक्स्प्रेस आणि पंजाब, हरियाणा, चंदीगड, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये धावणाऱ्या अनेक ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत.

## अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२५ ची आयोजन समिती बैठक संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.३० : मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशनच्या वतीने अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले जाते. महोत्सवाचे यंदाचे दहावे वर्ष आहे. नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण सेंटर या संस्थांच्या विशेष सहकार्याने तर महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारच्या सुचना एवं प्रसारण मंत्रालयाच्या सहयोगाने हा महोत्सव आयोजित करण्यात येतो. दि. १५ ते १९ जानेवारी २०२५ या दरम्यान आगामी महोत्सवाचे आयोजन पिव्हीआर आयनॉक्स येथे करण्यात आले आहे.



महोत्सव आयोजनपूर्व बैठकीचे रविवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी, सकाळी १० वाजता. एमजीएम फिल्म आर्ट्स च्या व्ही. शांताराम प्रेक्षागृहात आयोजन करण्यात आले होते. यावेळी महोत्सवाचे नवनियुक्त संचालक प्रसिध्द दिग्दर्शक सुनील सुकथनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम त्यांच्या निवडीबद्दल त्यांचा विशेष सत्कार एम जी एम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ आशिष गाडेकर यांच्या हस्ते करण्यात आला. करून अभिनंदन करण्यात आले.

महोत्सव संचालक सुनील सुकथनकर व चित्रपट नियोजन प्रमुख प्रमुख अमित पाटील यांनी आगामी महोत्सवाची संपूर्ण रूपरेषा मांडली.

महोत्सवानिमित्त शहरातील विविध महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येणार्या चित्रपट रसग्रहण कार्यशाळेबद्दल प्रा.संगीता औटे यांनी माहिती दिली. महोत्सवाचे यंदाचे दहावे वर्ष असल्याने त्यांनी यासंदर्भातील दहा कलमी कार्यक्रमाची मांडणी केली.

एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत यांनी महोत्सवादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रम, मास्टरक्लास याबद्दल माहिती दिली.

महोत्सवाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात येणार्या कॅटलॉबद्दल प्रा.डॉ.रेखा शेळके यांनी विस्तृत मांडणी केली तर महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाकरीता स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्यांची माहिती गणेश घुले यांनी सादर केली. जास्तीत जास्त प्रतिनीधी नोंदणी होण्यासंदर्भात डॉ. आनंद निकाळजे व महेश देशमुख यांनी उपस्थितांना आवाहन केले.

बैठकीच्या शेवटी महोत्सवात प्रदर्शित होणार्या काही प्रमुख चित्रपटांचे ट्रेलर दाखविण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक शिव कदम यांनी व सुत्रसंचालन यशश्री मुळे हिने केले तर श्रीकांत देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी आयोजन समितीच्या सदस्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आमदार अब्दुल सत्तार यांचा बुधवारी नागरी सत्कार व अभिष्टचिंतन सोहळा

## मित्र मंडळाच्या वतीने जय्यत तयारी



सिल्लोड,(प्रतिनिधी शिवसेना नेते , माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांची सिल्लोड मतदारसंघातून सलग चौथ्यांदा निवड झाल्याबद्दल तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने उद्या १ जानेवारी बुधवार रोजी सायंकाळी ४ वाजता छत्रपती संभाजीनगरच्या मराठवाडा सांस्कृतिक मैदानावर भव्य नागरी सत्कार व अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

लोकनेते आमदार अब्दुल सत्तार साहेब मित्र मंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व पक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते - नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दरम्यान या कार्यक्रमाची मित्र मंडळाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. या कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह आसपासच्या जिल्ह्यातून लाखाच्या जवळपास लोक येतील या अनुषंगाने आसनव्यवस्था आयोजकांच्या वतीने करण्यात आली आहे.

जोरदार वातावरण निर्मिती

अब्दुल सत्तार यांचा वाढदिवस ऐतिहासिक व भव्य व्हावा यासाठी मित्र मंडळाच्या वतीने जोरदार वातावरण निर्मिती करण्यात आली आहे. शहरासह जिल्ह्यात सर्वत्र आ. अब्दुल सत्तार यांचा नागरी सत्कार व अभिष्टचिंतन सोहळ्याचे होर्डिंग, बॅनर, पोस्टर, कटाउट, कमानी, याद्वारे कार्यक्रमाची जाहिरात केली जात आहे. हा कार्यक्रम जोरदार व्हावा यासाठी मित्र मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते गेल्या पंधरा दिवसापासून मेहनत घेत आहेत. यावर्षी हा कार्यक्रम सिल्लोड ऐवजी छत्रपती ल संभाजीनगर मध्ये आयोजित करण्याचा निर्णय अब्दुल सत्तार यांच्या चाहत्यांनी घेतला व त्यानुसार छत्रपती संभाजी नगर शहरातील मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे. राज्य मंत्रिमंडळात समावेश न झाल्याने अब्दुल सत्तार यांचे चाहते नाराज झाल्याची प्रतिक्रिया शहरात झालेल्या त्यांच्या समर्थकांच्या बैठकीत व्यक्त करण्यात आली होती त्यामुळे अभिष्टचिंतन सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना आ.अब्दुल सत्तार काय बोलतात याकडे सर्व जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर एक जानेवारी रोजी संध्याकाळी चार वाजता या कार्यक्रमास वरून सुरुवात होणार असून जिल्हाभरातून सुमारे एक लाख कार्यकर्ते कार्यक्रमास येतील असा दावा आ. अब्दुल सत्तार मित्र मंडळाचे वतीने करण्यात आला आहे.

# माणुसकी वृध्द सेवालयाच्या नवीन वास्तूचे अ.पो.अ. सुनिल लांजेवार व प्रकाश भागवत यांच्या हस्ते उद्घाटन

## याप्रसंगी रक्तदान शिबिरात ११ दात्यांनी केले रक्तदान



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० डिसेंबर

सु-लक्ष्मी सेवाभावी संस्था संचालित माणुसकी वृद्ध सेवालयाच्या नूतन वास्तूचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक सुनिल लांजेवार व प्रसिद्ध मराठी सिनेअभिनेते प्रकाश भागवत यांचे हस्ते करण्यात आले,या कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलन झाली.गाडगेबांबांचे प्रतीमापुजन करुन या कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.यावेळी शासकीय रक्त पेढीसाठी भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले यात ११ दानदात्यांनी रक्तदान केले.

प्रमुख पाहुणे म्हणून सुनिल लांजेवार अप्पर पोलीस अधीक्षक संभाजीनगर ग्रामीण, प्रकाशजी भागवत येड्याची जत्रा फेम, तथा हास्य कलाकार, भारत सोनवणे (माजी अधिष्ठाता घाटी), समाजसेवक धोंडीरामसिंह राजपूत,सुनिल कोटकर,संजय खंडागळे पोलीस उपनिरिक्षक ,चिकलठाणा ,मुक्ताराम गव्हाणे,पूनम चव्हाण,धनंजय वैष्णव, देविदास पंडीत,हे होते माणुसकी समुहाच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सन्मानचिन्ह प्रशस्तिपत्र देवून विषेश सन्मान करण्यात आला,यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना सिनेअभिनेते प्रकाश भागवत म्हणाले कि जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले,तोची साधु ओळखावा देव तेथेची जानावा या अभंगाच्या ओळी प्रत्यक्षात रंजल्या गांजल्यांची सेवा करुन खऱ्या अर्थाने समाजातील तरुणांना दिशा देण्याचे कार्य सुमित व त्यांची पत्नी पुजा पंडीत हे करत आहेत.सुमित सारखे प्रामाणिक सेवा करणारे लोक जगात खुप कमी आहेत.

या कार्यक्रमात प्रा.धोंडीरामसिंह राजपूत,यांनी गाडगेबाबांच्या वेषभूषेत उपस्थितांना स्वछतेचे महत्त्व पटवून सांगितले.व ज्युनियर चार्ली सोमनाथ स्वभावणे यांनी आपल्या मुख अभिनयातुन रक्तदानाचे महत्व पटवून दिले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारुडरत्न केरे महाराज,प्रा.शरद सोनवणे, सोमनाथ स्वभावणे,सुनिल चव्हाण, उमाकांत वैद्य,सुदाम पवार,किशोर पवार,गनेश जाधव (मंडप), बंडु राठोड,अरुण चव्हाण,मिराबाई पंडित पुजा पंडित,संध्या पारवे,लक्ष्मी पंडित यांनी परिश्रम घेतले.

मेल्यानंतर खांदा देण्यापेक्षा जीवंत माणसांना मदतीचा हात द्या...

अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार यांचे प्रतिपादन.

माणुसकी वृध्द सेवालयाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थीतांना मार्गदर्शक करतांना सुनिल लांजेवार यांनी सांगितले की दहाव तेराव घालुन शोक व्यक्त करण्यापेक्षा जिवंतपणी आई वडिलांचा सांभाळ करा.

ध्येयवेडा- सुमित पंडित

स्वतःच्या कुटुंबासाठी आपण सर्वजण काम करत असतो.परंतू दिनदुबळ्यांना, अनाथांचा नाथ समाजात कोणीही होतांना दिसत नाही.परंतु ध्येय वेडा सुमित पंडित हा अनाथांसाठी मोलाचे कार्य करत आहे.

सर्वसामान्य माणसांना सांभाळणे सोपे असते परंतु मनोरुग्णांना सांभाळून आगळावेगळा आदर्श सुमित पंडित यांनी निर्माण केला आहे. पती-पत्नी,आईवडील स्वतः साठी न जगता या अनाथाचे नाथ झाले आहेत. जीवनातील सुख या वृध्द सेवालयातील लोकांची सेवा करण्यात मानतात.तुम्ही आम्ही वेळ देवू शकत नाहीत. पण थोडाफार मदतीचा हात नक्कीच देवू शकतो. ध्येयवेडे होऊन समाजाप्रती काम करणारी सुमित व पुजा सारखी मंडळी बोटावर मोजण्याइतकेच समाजात शिल्लक आहेत. आपणही खारीचा वाटा म्हणून समाजाचे काही देणे लागतो या भावनेने मदतीसाठी पुढे यावे केले प्रतीपादन या प्रसंगी सुनिल लांजेवार यांनी केले.

# जप्त केलेल्या वाहनांचा जाहीर लिलाव

अहिल्यानगर दि.३०- तालुक्यात अवैधरित्या गौणखनिज उत्खनन करुन वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या मालकांनी दंडात्मक कार्यवाहीत आदेशातील रक्कम शासन जमा न केल्याने ही रक्कम वसूल करण्यासाठी २ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, अहिल्यानगर जवळील गंगा उद्यानाच्या मागील बाजूस जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे. लिलावात भाग घेण्याचा अर्ज, लिलाव होणाऱ्या जंगम मालमत्तेची किंमत, अनामत रक्कम, तसेच लिलावाच्या अटी व शर्तीकरिता तहसीलदार अहिल्यानगर यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे तहसीलदार संजय शिंदे यांनी कळविले आहे.

# विज्ञान प्रदर्शन निमित्ताने अजंता व्हॅली इंग्लिश स्कूलच्या गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मान



सोयगाव,दि.३० डिसेंबर : छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित ५२ वें जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात अजंता व्हॅली इंग्लिश स्कूल च्यश्र विद्यार्थिनी आराध्या विकास मंडवे (लश्र्रीी ६ ींह) व प्रनवी विजय पगारे (क्लास ७ ींह) यांनी कचरा व्यवस्थापन ह्या विषया वरती यशस्वीरित्या मॉडेल चे प्रात्यक्षिक दाखवले. सदरील विद्यार्थिनीची तालुका स्तरावरून द्वितीय क्रमांकाची निवड करण्यात आली होती. त्या बद्दल अजंता व्हॅली इंग्लिश स्कूल येथे सोमवारी दि.३० सोमवार रोजी या दोन्ही विद्यार्थिनींचा केंद्र प्रमुख फिरोझ तडवी,शालेय संचालक डॉ.दिनकर पिंगाळकर,डॉ. स्वाती पिंगाळकर, मुख्याध्यापिका रूपाली मानकर यांनी,पुष्पगुच्छ देवून सन्मान केला पुढील कार्यास शुभेच्छा सुध्दा देण्यात आल्या. तसेच कचरा व्यवस्थापन मॉडेल निर्मितीसाठी मार्गदर्शक विज्ञान विषयाच्या शिक्षिका सोनाली बागुल यांनी विऊ अथक परिश्रम घेतले त्यामुळे त्यांचे सुध्दा यावेळी अभिनंदन करण्यात आले.

# सांधे प्रत्यारोपण सर्जरी बद्दल रोबोटिक तंत्रज्ञानाचे फायदे

अहमदनगर - सांधेदुखी, संधींमध्ये सूज किंवा घर्षण, आणि शरीराच्या इतर भागांतील हालचालींच्या अडचणीमुळे लोकांच्या दैनंदिन जीवनात अनेक अडथळे निर्माण होतात. या समस्यांसाठी सांधे प्रत्यारोपण सर्जरी हा एक अत्यंत प्रभावी उपाय आहे. जरी या शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या लोकांची संख्या वाढत असली, तरी या सर्जरीबद्दल समाजात अनेक गैरसमज आणि भीती पसरलेली आहे. या बद्दल बोलताना मणिपाल हॉस्पिटल, खराडी, पुणे येथील डॉ. सिनुकुमार भास्करन , सल्लागार - हाड व सांधे प्रत्यारोपण, पुनर्रचना आणि रोबोटिक आर्थ्रोप्लास्टी (हिप आणि गुडघा) म्हणाले योग्य माहितीच्या अभावामुळे रुग्ण अनेक वेळा उपचार घेण्यास टाळाटाळ करतात. सांधे प्रत्यारोपण सर्जरीसंबंधी पसरलेल्या प्रमुख गैरसमज समजू आणि रोबोटिक सर्जरीची आधुनिक तंत्रज्ञान समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

# जेव्हा जेव्हा ऋषीमुनींना, भक्तांना त्रास होतो त्या त्यावेळी भगवंत चांगल्या कुळात जन्मास येतात - ह.भ.प.सचिन महाराज मंठेकर

## श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची रविवारी सांगता



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० डिसेंबर

भगवान गोपाल कृष्णाच्या कृपा आशीर्वादाने श्री श्रीमद् भागवत कथा वांग्मय स्मूर्ती पाचव्या दिवशीच्या सत्संगामध्ये दिवस किती लवकर चालले काहीच लक्षात येत नाही.एक एक दिवस निघून जात आहेस. आयुष्य सुद्धा असच निघून जाते श्रीमद् भागवत कथा सांगता माझ्या आयुष्यातले वीस वर्षे निघून गेले.ह.भ.प.सचिन महाराज मंठेकर दि.२९ रविवारी रोजी श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याच्या पाचव्या दिवशी उपस्थित भाविक भक्तांना आपल्या भागवत कथा सांगत असतांना म्हणाले .

कुलस्वामिनी गायल माता व श्री संत गजानन महाराज आणि परमपूज्य नाईक दादा यांच्या कृपाशीर्वादाने श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे दि.२३ ते २९ डिसेंबर दरम्यान राजेंद्र श्रीराम झंवर व किशोर श्रीराम झंवर परिवार सोयगाव शहरातील बालाजी नगरातील प्रसिद्ध व्यापारी राहत्या घरा शेजारील भव्य मैदानावर आयोजन करण्यात आलेले होते.या कथेचा व ज्ञानयज्ञ नैत्रदिप्य सोहळा कार्याक्रमाचा लाभ हजारो भाविक भक्तांनी घेतला रविवारी भोजनदान करून सांगता करण्यात आली.

दरम्यान गोकर्ण चरित्र,परिक्षित जन्म,वराह अवतार,दत्त जन्म,ध्रुव चरित्र,नृसिंग अवतार, श्रीकृष्ण जन्म, श्री कृष्ण लिला, श्री कृष्ण रुख्मिणी विवाह तर रविवारी श्रीकृष्ण निजधाम गती सांगता असे पाच दिवस मंगलमय वातावरणात कथा ज्ञानयज्ञ सोहळा उत्साहात पार पडला.

पुढे ह.भ.प.सचिन महाराज मंठेकर सागतात की,जसा दिवा जळतांना दिसतो.पण तेल जळताना दिसतं का ? तेल जळताना नाही दिसत तसंच वय वाढताना दिसतं मात्र आयुष्य संपताना दिसतं का ? कधीच नाही मग आपल्या हातात काय लागणार त्यासाठी मनुष्याने आयुष्यात सत्संग ऐकलाच पाहिजे जीवाचा उद्धार त्यामुळेच होतो काल तुम्हाला राम जन्मापर्यंत कथा सांगेली श्रीमत भागवत कथेमध्ये वामन अवतार झाल्यानंतरची पुढील कथा राम जन्म आहे राम जन्म झाल्यानंतर गोपाल कृष्ण अवतार आहे.काही वक्ते तिसऱ्या दिवशी कृष्णा चरित्र घेतात आणि मी पाचव्या दिवशी कृष्णचरित्र का घेतो हे तुम्हाला सांगतो चार दिवसापर्यंत आपल्या हातून तपश्चर्या झालेली आहे. आणि तपश्चर्याचे फळ आज आपल्याला मिळणार आहे म्हणून आपण पाचव्या दिवशी.कृष्ण चरित्र ऐकून सर्व सर्व पातक नाशन होतो कृष्णा चरित्र ऐकून सूध्दी सर्व पापांचा नाश होतो.भगवान अवतार कधी घेत असतात भगवान अवतार घेतात यदा ही धर्मस्य नियम आहे भगवंताचा ग्लानिर् भवतती भारत ज्या वेळेला धर्माला ग्लानी प्राप्त होईल साधू संताला त्रास होईल आपल्या ऋषीमुनींना त्रास होईल आपल्यासारख्या भक्तांना त्रास होईल त्यावेळी भगवंताचा असा नियम आहे आपल्याला त्रास झाला तर भगवंत येत असतात आणि दृष्टांचा नाश करित असतात कलानर्भवती भारत अपयुक्त धर्मस्य सदा तदा तर मान्य पूजायहम तदा मानम पुजा त्याकाळी सुद्धा कंस शिशुपात यासारखे अनेक राक्षस उन्मत्त झालेले होते, त्या काळात अनेक ऋषीमुनींना त्याचा त्रास होऊ लागला,भगवंताला नाही सहन होत आपल्या भक्ताला त्रास झाला तर म्हणून भगवंत कुठल्याही रूपामध्ये येतो आपल्या भक्ताचा रक्षण करतो आणि परमेश्वर जन्म घेतो तर चांगल्या कुळामध्ये घेत असतात.

# छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कारासाठी अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर : वनेतर क्षेत्रातील वृक्षारोपण व संवर्धनात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थाना छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार दिला जातो. सन २०२४ करीता या पुरस्कारासाठी वृक्षरोपण संवर्धनाचे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. सामाजिक वनीकरण विभागामार्फत व्यक्ती, ग्रामपंचायत, शैक्षणिक संस्था, सेवाभावी संस्था, ग्राम, विभाग/ जिल्हा या संवर्गात हा पुरस्कार दिला जातो. मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व महसूल विभागस्तरावर प्रथम पुरस्कार ५० हजार रुपये व द्वितीय पुरस्कार ३० हजार रुपेय, राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार १ लाख रुपये, द्वितीय ७५ हजार रुपये व तृतीय ५० हजार रुपये दिले जातात. तसेच वृक्षमित्र पुरस्कार वृक्षरोपण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या तीन खाजगी संस्थांना प्रोत्साहनपर प्रत्येकी २५ हजार रुपये या प्रमाणे पुरस्कार दिला जातो. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्ति/ संस्थांनी गेल्या तीन वर्षात (२०२१ ते २०२३) केलेले कार्य ग्राह्य धरले जाते. इच्छुक व पात्र संस्थांनी विहित नमुन्यात जिल्हा, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग यांच्या कार्यालयात अर्ज करावा. अर्ज करण्यासाठी अंतिम मुदत दि.१५ जानेवारी २०२५ आहे. तर विहित नमुन्यातील अर्ज संबंधित विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग यांच्या कार्यालयात किंवा वन विभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत,असे कळविण्यात आले आहे.

# छाया एम.व्ही. ने एसबीआय लाईफ स्पेल बी सीझन १४ मध्ये 'स्पेल मास्टर ऑफ इंडिया' किताब जिंकला

पुणे : एसबीआय लाईफ स्पेल बी सीझन १४ ही भारतातील सर्वात प्रतिष्ठेची स्पेलिंग स्पर्धा मिर्चीच्या पुढाकाराने कोलकाता येथे रोमांचक ग्रँड फिनालेने संपन्न झाली. एसबीआय लाईफ स्पेल बी सीझन १४ मध्ये बेंगलुरू येथील प्रेसिडेन्सी स्कूल, आरटी नगर येथील आठवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय छाया एम व्ही हिने 'स्पेल मास्टर ऑफ इंडिया' राष्ट्रीय विजेतेपद पटकावले आहे. उत्साहाने भरलेल्या वातावरणात या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय चॅम्पियनची घोषणा आणि सत्काराने झाली, ज्यांनी संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली तसेच असाधारण कौशल्य, समर्पण आणि भाषेबद्दलची तीव्र तळमळ दर्शविली. या स्पर्धे तील उपविजेते, जयपूरच्या केंब्रिज कोर्ट हायस्कूलचे १३ वर्षीय मेधांश वड्दादी आणि हैदराबादच्या केनेडी हायग्लोबल स्कूलचे १४ वर्षीय यशविन पचौरी यांनीही एसबीआय लाईफ स्पेल बी ग्रँड फिनालेमध्ये कौतुकास्पद कौशल्य दाखवले. गुंतागुंतीच्या शब्दांना नेव्हिगेट करण्यात आपली अचूकता आणि आत्मविश्वास दाखवत या मुलांनी विजेते म्हणून आपली पात्रता सिद्ध केली.

# रांजणगावात विनापरवाना देशी दारू विक्री ; गुन्हा दाखल

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : कमळापूर फाटा रांजणगाव शे. पू. येथे अवैध देशी दारू विक्री सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर वाळूज एमआयडीसी पोलिसांनी कमळापूर फाटा येथे छापा टाकून १२ हजार ५०० रुपयांचा ऐवज जप्त करत दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की , कमळापूर फाटा रांजणगांव शें. पू. येथे विनापरवाना देशी दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्यावरून छापा टाकला असता पुजा सनी पवार रा. कमळापूर ही महिला विनापरवाना देशी दारू विक्री करत असल्याचे आढळून आली. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता तिने या गुत्याचा मालक अनूप पिंपळे , रा. पंढरपूर हा असून त्याच्या सांगण्यावरून दारू विक्री करत असल्याचे सांगितले. सदर दारू ही विनापरवाना विक्री होत असल्याचे दिसून आले. यावेळी पोलिसांनी ३५ रुपये किंमतीच्या २०० बॉटल , ७० रुपये किंमतीच्या ४८ बॉटल व रोख रक्कम २१४० असा एकूण १२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पूजा सनी पवार व अनूप पिंपळे यांच्या विरोधात दारू बंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नगर तालुक्यात शहरातील व्यापाऱ्यांच्या जमिनीवर विशिष्ट समाजाकडून ताबेमारी

## जिल्हा पोलीस प्रमुख यांची व्यापाऱ्यांसमवेत समवेत आ.संग्राम जगताप यांनी भेट घेत कारवाईची केली मागणी



अहिल्यानगर : नगर शहरातील व्यापाऱ्यांच्या जमिनीवर नगर तालुक्यातील वाटेफळ येथील अनिल वालचंद गांधी, विजय वालचंद गांधी बाबुर्डी येथे सुदर्शन डुंगुरवाल आणि वाकोडी येथे धनेश कोठारी यांच्या जमिनीवर विशिष्ट समाजाकडून ताबेमारी करीत राजरोजपणे पाल टाकण्याचे काम केले जाते. त्याच्या निषेधार्थ शहरातील सर्व व्यापारी संघटित होऊन आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली. यावेळी आमदार संग्राम जगताप, जयेश पोखरणा, पिंटू कटारिया, कमलेश भंडारी, दिनेश संकलेचा, रोहन बोरा, संदीप बोरा, गणेश बुरा, नितीन शिंगवी, रितेश सोनीमडलेचा, सचिन छाजेड, मनीष लोढा, ईश्वर बोरा, दिनेश संकलेचा, भरत गुरुनानी, पराग मानधना आदीसह व्यापरी मोठ्या संख्येने उपस्थित होता

शहरातील व्यापाऱ्यांच्या जमिनीवर नगर तालुक्यातील गावांमध्ये विशिष्ट समाजाकडून पाल टाकून ताबेमारी केली जाते तसेच खंडणी मागत दमबाजी केली जाते अशा लोकांचा बंदोबस्त करावा यासाठी पोलीस अधीक्षकांची भेट घेतली असून यावेळी कारवाईची मंगनी केली तसेच अशा प्रवृत्तीच्या विरोधात महाराष्ट्र सरकारकडे कायदा करण्याची मागणी केली जाईल तसेच सर्वसामान्य लोकांना न्याय-हक्क मिळाला पाहिजे यासाठी काम केले जाईल असे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले. यावेळी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी संबंधित व्यक्तींवर कारवाई केली जाईल असे आश्वासन व्यापारी वर्गाला दिले.

# अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृती

## विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करण्याचे समाजकल्याण विभागाचे आवाहन

अहिल्यानगर दि.३० - अल्पसंख्याक विकास विभाग अंतर्गत अल्पसंख्याक समुदायातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन,जैन ,पारसी ,ज्यु आणि शिख या घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडून परदेशात शिक्षणासाठी सन २०२४-२५ करिता अर्ज मागविण्यात आले आहेत.

परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या लाभासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी आणि अल्पसंख्याक समुदायातील घटकातील असावा. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा असेल. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे. परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत दोन वर्षे कालावधीचाच एमबीए अभ्यासक्रम अनुज्ञेय राहील.

शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३० टक्के जागांवर मुलींची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. गुणवत्तेनुसार निवड करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील. एकाच कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृतीचा लाभ देता येईल. पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत व पीएचडी साठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. ही पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेला असावा.

परदेशातील शिक्षण संस्था ही जागतीक क्रमवारीत (क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँक ) २०० च्या आत असावी. सदर योजनेअंतर्गत लाभ घेवू इच्छित असलेल्या विद्यार्थ्यांस पुढील सत्राचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून त्यासाठी शैक्षणीक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

योजनेतील लाभाचे स्वरुप -

परदेशातील शैक्षणिक संस्थेने प्रवेशपत्रांमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण शुल्क, अभ्यासक्रमासाठी नजिकच्या मार्गानी सर्वसाधारण विमान प्रवास भाडे, (परतीच्या प्रवासासह) निर्वाह भत्ता, वैयक्तीक आरोग्य विमा यावरील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष केलेला खर्च, विहित केलेल्या वित्तीय मयदित मूळ शूल्क भरणा पावती, प्रवासाचे मुळ तिकीट, मूळ बोर्डिंग पास, परतीच्या प्रयासाचे तिकीट इ. तपासून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर भारतीय रुपयामध्ये प्रतिपूर्ती केली जाईल. अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी शासनाच्या ु.ारहरीरिहींर.सीं. ळप या संकेतस्थळावरील ताज्या घडामोडी या लिंकवर जाऊन भेट द्यावी. संकेतस्थळावरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह ३१ डिसेंबरपर्यंत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत ऑनलाईन भरुन त्यांची प्रिंट, समक्ष किवा पोस्टाने समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे-४११००१ येथे सादर करावा. तसेच. महाराष्ट्र शासनाची वेबसाईट https://fs-maharashtra.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरावी, असे आवाहन समाज

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२४/२०२५ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ३०-१२-२०२४

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **कमलेश जगतराव सोनवणे, नितीन जगतराव सोनवणेख नृसिंह जगतराव सोनवणे** यांनी मोहल्ला **नारळीबाणा** सोयगांव स.नं. ----- मधील घर क्र. **८०८ ब** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : रविंद्र तुळशीराम कदम पश्चिम : सुनिल उत्तम मानकर**

**दक्षिण : अलिय्यार खॉ पठाण उत्तर : सर्वीस रोड**

आकार : पूर्व पश्चिम **१६ X २७.८** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

**जा.क्र.२०२४/विधी/ज.मू. आदेश/प्र.क्र.४३८९/कावि-४९८९ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-०९.१२.२०२४.**

## जाहिर प्रगटन

अर्जदार : भावना दिपक गायकवाड, वय-०२ वर्ष व्यवसाय- निरंक, अ.पा.क.मामा नामे - दिनेश गोविंदा बनकर, वय-३२ वर्ष, व्यवसाय शेती. रा.गोंदेगाव ता. सोयगांव जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय गोंदेगाव. ता. सोयगांव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी दिनेश गोविंदा बनकर, रा.गोंदेगाव ता. सोयगांव जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांची भाची नामे भावना दिपक गायकवाड हिचा दिनांक २१.०४.२०२२ रोजी मौजे गोंदेगाव येथे जन्म झ गाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा- २०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की भावना दिपक गायकवाड, यांचा दिनांक २१.०४.२०२२ रोजी मौजे गोंदेगाव येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/भशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-६०३

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २७/०९/२०२४

अर्जदार : हिराबाई नारायण सोनगिरे रा. पिशोर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२-०६-१९९२ रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२-०६-१९९२ रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२-०६-१९९२ रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २०-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०२-०६-१९९२ रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक २७/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# विघनवाडी ते राजुरी रेल्वे चाचणी पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

बीड वासियांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या रेल्वेची चाचणी काल बीड जवळील विघनवाडी ते राजुरीपर्यंत करण्यात आली. खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत ही चाचणी करण्यात आली असून रेल्वेच्या अधिकाऱ्यांना यापुढील रेल्वे मार्गबाबत खासदार सोनवणे यांनी सूचना केल्या आहेत.



अहमदनगर ते बीड परळी रेल्वे मार्ग मध्य रेल्वेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. २६१. किलोमीटर लांबीचा हा मार्ग करण्यात येत असून पहिल्या टप्प्यात नगर ते अमळनेर असा १००. ८ किलोमीटरचा मार्ग यापूर्वीच पूर्ण झाला होता. यानंतर रेल्वे मार्गातील अमळनेर ते विघनवाडी या अंतरापर्यंत काम ९ ऑगस्ट २०२४ ला हे काम पूर्ण झाल्यानंतर शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते बीड अशी ३५ किलोमीटर अंतरापैकी नवगण राजुरीर्यंतचे रेल्वे रूळ टाकण्याचे काम देखील पूर्ण झाले आहे. हे काम पूर्ण झाल्याने या मार्गावर रेल्वे चाचणी (दि.३०) सोमवार रोजी घेण्यात आली आहे.

मागील काही वर्षांपासून नगर-बीड-परळी असा रेल्वे मार्ग मंजूर हल्यानंतर मार्ग तयार करण्याचे काम सुरु होते. टप्प्याटप्प्याने या मार्गाचे काम करण्यात येत आहे. आता काही अंतराचे काम बाकी असून ते पूर्ण करण्यासाठी गती मिळाली असून येत्या २६ जानेवारीपर्यंत काम पूर्ण करून बीड पर्यंत रेल्वे मार्ग पूर्ण करण्यात येणार असून बीडपर्यंत रेल्वे पोहचणार असल्याने विकासाच्या दृष्टीने पाऊल आहे.

शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते राजुरी नवगण पर्यंत ही पहिली चाचणी केली गेली. रेल्वे कृती समितीने यासाठी खूप मोठा लढा घेतला. या लढ्याचे फळ आणि स्वप्न पूर्ण करण्याचं काम माझ्या काळात पूर्ण होत आहे. आज राजुरी पर्यंत ही चाचणी झाली असून दि.२६ जानेवारी पर्यंत रेल्वे बीडपर्यंत रेल्वे येणार असल्याचा शब्द मी पूर्ण केला असल्याचं खासदार सोनवणे यांनी म्हटले आहे.

# जिल्ह्यात १२ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षण मागणी अनुषगांने आंदोलने चालू आहेत तसेच आगामी कालावधीत नुतन वर्षे साजरे होणार आहे.सध्या बीड जिल्ह्यामध्ये पोलीस स्टेशन केज येथे दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष व संघटना यांच्याकडून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्या मागणी करीता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, आंदोलने, उपोषण, मोर्चे होण्याची शक्यता असून अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरक्षणच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष आक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १२ जानेवारी २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकाऱ्यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.



केज-दर्श वेळा अमावास्या निमित्त केज तालुक्यातील युसुफ वडगाव येथील शेतकरी बापुसाहेब भुसारी सपत्नीक मनोभावे शेतात पांडवांची पुजा करताना (छाया:-अनिल गलांडे)

# संतोष देशमुख हत्या ही राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी ही घटना आहे-ना.रामदास आठवले

## हत्या व खंडणी सर्व आरोपी व मुख्य सुत्रधाराला तात्काळ अटक करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांची भेट घेणार-ना.रामदास आठवले

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३० डिसेंबर**

संतोष देशमुख यांची हत्या ही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समाजाला राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारे घटना असून या हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. तसेच या प्रकरणाचा तपास जलद गतीने करण्यात यावा. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्र्याची देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले.



केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दि. ३० डिसेंबर रोजी मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. यावेळी त्यांच्या सोबत युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, बाबुराव कदम, मिलिंद शेळके यांच्यासह रिपाईचे नेते उपस्थित होते

बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुका केज येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी आहे तसेच यां घटनेपूर्वी पवन ऊर्जा प्रकल्पात घडलेल्या घटनेची येथील सुरक्षा रक्षाच्या मारहाणीची प्रकरणी पोलिसांनी ट्रॉसिटीची तक्रार दाखल करून घेतली असती तर कदाचित ही घटना टाळता आली असती म्हणून जिल्ह्यात आणि राज्यात पोलिसांच्या कार्यपद्धतीवर रोष व्यक्त होत आहे. या घटनेतील गुन्हेगारांची प्रॉपर्टी जप्त करून भागणार नाही तर यातील आरोपींना पकडणे आवश्यक आहे. चार आरोपी पकडले असून अद्यापही तीन आरोपी फरार आहेत. इतर आरोपी ताब्यात घ्यायला एवढा वेळ लागतो ? महाराष्ट्र पोलीसासाठी ही चांगली नाही पोलिसांनी दवाखाली काम करू नये. हे जे प्रकरण आहे ते अत्यंत गंभीर आहे. सुरक्षा रक्षक अशोक सोनवणे हा सोलार प्रकल्पात काम करीत होते त्यांना मारहाण झाल्यामुळे

संतोष देशमुख हे भांडण सोडवायला गेले होते. त्यामध्ये ट्रॉसिटी लावणे अत्यंत आवश्यक होते. जर ट्रॉसिटी लावली असती आणि आरोपींना पकडले असते तर ही घटनाच घडली नसती. यामुळे पोलीसावर लोकांचा संशय आहे. हे अत्यंत गंभीर आहे. केज आणि बीड येथील पोलिसांवर लोकांचा संशय आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांची बदली झालेली आहे. नवीन आलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षकांनी यात लक्ष घालावे. यासंदर्भात मी या सदर्भात मी त्यांच्याशी बोलणार आहे. असे रामदास आठवले म्हणाले.

तसेच मुख्यमंत्र्यांशी देखील ते बोलणार आहेत. देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. संतोष देशमुख यांची आई आणि त्यांच्या कुटुंबीयांची त्यांनी भेट घेतले आहे. या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची आणि रिपब्लिकन पार्टीची मागणी आहे. असे तेंमहबके. तर या प्रकरणी ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांची देखील भेट घेणार आहेत. परंतु त्या अगोदर ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेणार आहे. या प्रकरणातील सर्व आरोपी आणि त्यांचे मास्टरमइंड यांना तात्काळ अटक झाली पाहिजे. ही घटना घडवून २१ दिवस लोटले आहेत. तरी अद्याप पर्यंत सर्व आरोपी अटक झालेले नाहीत. हे आश्चर्य आहे. अद्याप पर्यंत पोलिसांनी देशमुख यांच्या कुटुंबीयातील कोणाचेही स्टेटमेंट घेतलेले नाही. घटना घडल्या नंतर पहिल्या दोन-तीन दिवसांमध्ये पोलिसांनी त्यांचे स्टेटमेंट घेणे आवश्यक होते. अशा प्रकरणांमध्ये त्या कुटुंबाचे लवकरात लवकर स्टेटमेंट घेतले जातात पण पोलिसांनी त्यांचे लवकरात लवकर विनाविलंब स्टेटमेंट घ्यावे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून उर्वरित सर्व आरोपी यांना तात्काळ ताब्यात घेण्यात यावे. त्या आरोपींना पकडलेच पाहिजे अशी आमची भूमिका असून सर्व आरोपी आणि त्याचा सूत्रधार यांच्या अटकेची मागणी रामदास आठवले यांनी केली आहे.

यावेळी त्यांच्या सोबत राजू जोगदंड, महावीर सोनवणे, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, किसन तांगडे, मझर खान, सुरेश माने, रविराज माळाळे, मायाताई मिसळे, राणी गायकवाड, गोवर्धन वाघमारे, उत्तम आप्पा मस्के, बापू पवार, सादेक कुरेशी, भाई उजगरे, महादेव उजगरे, अरुण निकाळजे, अरुण भालेराव, दीपक कांबळे, धोंडीराम सिरसट, प्रमोद दासुद, सुभाष तांगडे, संदीपान डोंगरे, राहुल सरवदे, अविनाश जोगदंड, सतीश शिनगारे, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, शाम विर, नागेश दुबळे, भाऊसाहेब दळवी, रतन वाघमारे, संभाजी गायकवाड, ईश्वर सोनवणे, राजेश सोनवणे, अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर आणि दिलीप बनसोडे, रवी जोगदंड, गौतम बचुटे, सूरज काळे, हरेंद्र तूपारे, प्रशांत हजारे, हरीश गायकवाड, दादाराव धेंडे, विनोद शिंदे, रोहित कांबळे, रोहित बचुटे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# माजलगाव शहर पोलिसांचा अवैध दारु साठ्याच्या वर छापा

## ११,००० रुपयांची दारू जप्त



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० डिसेंबर**

माजलगाव शहर पोलिसांनी आज अवैध दारूवर छापा टाकला. माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल (पोकॉ) कदम यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, माजलगावच्या बायपास रोडवरील विजय हॉटेल आणि गौतम नगर येथे अवैध दारूची विक्री सुरू आहे.

त्यानुसार, माजलगाव शहर पोलिसांनी त्वरित त्या ठिकाणी छापा मारला. या कारवाईत पोलिसांना २७ बाटल्या 'टँगो पंच' कंपनीच्या देशी दारूच्या, ५ बाटल्या 'मॅग्डॉल' कंपनीच्या, ६ बाटल्या 'ऑफिसर चॉईस बिल्यु' कंपनीच्या आणि ५ बाटल्या 'इम्पेरियल ब्लू' कंपनीच्या विदेशी दारूचा साठा मिळाला. या दारूचा एकूण किंमतीचा अंदाज ५१०० रुपये आहे.

हॉटेलचे चालक प्रशांत रंगनाथराव खरात (वय ३५, रा. बिलालमोहल्ला, माजलगाव) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. यानंतर, गौतम नगर येथे छापा मारून गावठी हातभटीच्या २७ लिटर दारूचा साठा जप्त करण्यात आला, ज्याची किंमत ५९०० रुपये आहे. या सगळ्या अवैध दारूचा एकूण किंमत ११,००० रुपये इतका झाला आहे.सदरची कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहा पोलीस अधीक्षक कमलेश मिना, उपविभागीय पोलीस अधिकारी केज कमलेश मिना, माजलगाव शहर पोलीस निरीक्षक आर.के. सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली केली गेली. पोलिसांच्या पथकात पोहवा राम भंडाणे, पोहवा अनिल भालेराव, पोकॉ अमोल कदम, पोकों श्रीगणेश मिरकले आणि मपोकों रविना जाधव यांचा समावेश होता.कारवाईत मिळालेल्या दारूसाठ्यामुळे माजलगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# सोशल मिडीयावरुन दहशत निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल केल्यास अथवा फॉरवर्ड केल्यास होणार कठोर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

बीड जिल्हा पोलीस अधिक्षक श्री नवनीत कॉंवत यांनी जिल्हयातील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, कोणीही मोबाईल व इंटरनेटचा वापर करुन आपल्याकडे असलेले वैध अथवा अवैध शस्त्राचे (फोटो व्हीडीओ) सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित करु नये. तसेच एखाद्या मारामारीच्या घटनेतील रेकॉर्ड केलेला फोटो/व्हीडीओ, शिव्या देतांनाचा व्हिडीओ अथवा समाजात दहशत किंवा भिती निर्माण होईल अशी कोणतीही पोस्ट कोणत्याही सोशल मिडीया अकाउंटवरुन शेअर करु नये, अथवा फॉरवर्ड करु नये. तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी अशा प्रकारच्या पोस्ट



सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित केल्या असतील/शेअर केल्या असतील किंवा फॉरवर्ड केल्या असतील त्या त्यांनी तात्काळ सोशल मिडीयावरुन डिलिट कराव्यात.

समाज माध्यमांवर (सोशल मिडीया)

### पोलीस अधिक्षक बीड यांच्याकडून जनतेला आवाहन

अशा प्रकारे कोणीही शस्त्राचे, मारामारीचे अथवा शिवीगाळ केल्याचे किवा ज्यामुळे समाजात भिती व दहशत निर्माण होईल असे फोटो व्हीडीओ प्रदर्शित करील, लाईक करील किंवा फॉरवर्ड करील तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी सोशल मिडीयावरुन अशा पोस्ट केल्या आहेत. परंतू आम्ही दिलेल्या सुचनेनंतरही त्या पोस्ट डिलिट केल्या नाहीत. तर अशा व्यक्तींविरुध्द तात्काळ भारतीय न्याय संहिता, माहिती तंत्रज्ञान अधिनियम तसेच इतर कायद्यान्वये योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# विद्यापीठ युवक महोत्सवात सावरकर महाविद्यालयाला तीन पारितोषिके

## जलसा, लोकनाट्य,भजनाचेही उत्कृष्ट सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० डिसेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर द्वारा आयोजित केंद्रीय युवक महोत्सवात शास्त्रीय गायन प्रथम, काव्यवाचन द्वितीय, मृदुमूर्तिकला तृतीय ही तीन पारितोषिके मिळाली आहेत. लोकनाट्य जलसा आणि भजन या प्रकाराचेही महाविद्यालयाने उत्कृष्ट सादरीकरण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता. महाविद्यालयाने भारतीय शास्त्रीय गायन, सुगम गायन, तालवाद्य, भजन मृदूमूर्तीकला, काव्यवाचन, रांगोळी, जलसा, लोकनाट्य, स्पॉट फोटोग्राफी, शोभायात्रा या कलाप्रकारांमध्ये सहभाग नोंदवला. भारतीय शास्त्रीय गायन प्रकारात महाविद्यालयाचा विद्यार्थी चिरंजीव वेद दीपक मुळे याने उत्कृष्ट सादरीकरण केले आणि प्रथम क्रमांक पटकावला. त्याला गुरुवर्य पंडित हेमंत पेंडसे ,गुरुवर्य श्री. नामदेव साळुंके , पालक, तसेच संगीत विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुलकर्णी, श्रीमती दीपा देशपांडे, श्रीमती. आसावरी राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी अंजली जालिंदर शिंदे हिने काव्यवाचन प्रकारामध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले. मृदुमूर्तीकला या कलाप्रकारात कु. ऋतुजा काळे हिने तृतीय क्रमांक पटकावला. तिला डॉ. जोगेंद्र गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाने जलसा या सांघिक कलाप्रकारात डॉ. जोगेंद्र गायकवाड लिखित जलस्याचे उत्तम सादरीकरण केले. प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद या जलशाला मिळाला.महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. सुहास मोराळे सर यांचे युवक महोत्सवातील सर्व संघास मार्गदर्शन व सहकार्य लाभले. पुरुष संघ प्रमुख म्हणून सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. राम् गव्हाणे आणि डॉ. जोगेंद्र गायकवाड, डॉ. रुक्मिणीकांत पांडव आणि महिला संघ प्रमुख म्हणून डॉ. रुपाली कुलकर्णी आणि कु. आसावरी राऊत यांनी संघास प्रेरणा दिली.

## अग्रलेख...

# आयात-निर्यातीचे कायमस्वरूपी धोरण हवे

गेल्या २३ डिसेंबर रोजी शेतकरी दिन साजरा करण्ङ्गात आला. दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. सर्वसाधारणपणे उत्तरेकडील राज्यांमध्ये शेतकरी या दिवशी प्रश्नांवर चर्चा घडवून आणत, शेतकऱ्यांसाठी सुयोग्य ठरणाऱ्या नानाविध संकल्पनांचा अंगीकार करत हा दिवस पार पडतो. देशाच्या अन्य प्रांतांमध्ये हे साजरीकरण होतेच असे नाही. अर्थातच, दिवस वेगवेगळे असले, तरी याचा गाभा शेतकऱ्यांचे रक्षण करणे हाच असल्यामुळे यावर चर्चा होणे गरजेचे आहे. मुळात प्रथम इथे समजून घ्यायला हवे की, महाराष्ट्रात आणि अन्य राज्यांमध्ये हे साजरीकरण वेगवेगळ्या दिवशी बघायला मिळते. आपल्या राज्यापुरते बघता १ जुलै रोजी शेतकरी दिन पाळला जातो. वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधत हे साजरीकरण होते, तर सर्वसाधारणपणे उत्तरेकडील राज्यांमध्ये २३ डिसेंबरच्या दिवशी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा घडवून आणत, शेतकऱ्यांसाठी सुयोग्य ठरणाऱ्या नानाविध संकल्पनांचा अंगीकार करीत हा दिवस साजरा केला जातो. अर्थातच दिवस वेगवेगळे असले, तरी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणे हाच गाभा असल्यामुळे या विषयावर चर्चा होणे गरजेचे वाटते. गेल्या काही काळापासून उत्तरेकडे शेतकऱ्यांची व्यापक आणि विशाल आंदोलने सुरू आहेत. त्याची धग अन्य राज्यांमध्येही जाणवते आहे. लवकरच आणखी तीव्र आंदोलनाचा इशारादेखील देण्यात आला आहे. स्वाभाविकच यंदाच्या शेतकरी दिनामागे ही चिंताजनक तसेच विचार करण्यास भाग पाडणारी पृष्ठभूमी आहे, असे म्हणावे लागेल आणि चर्चेला सुरुवात करताना उत्तरेकडील शेतकरी का पेटून उठतात, हा प्रश्न विचारात घ्यावा लागेल. उत्तरेकडील शेतकरी गहू, तेलबिया पिकवतो. ऊस पिकवणारा शेतकरी तिथे काही प्रमाणात आहे. परंतु, महाराष्ट्राच्या मानाने उत्तरेकडे उसाचे क्षेत्र कमी दिसते. त्यामुळेच देशाच्या या भागात आपल्याइतक्या तीव्रतेने उसाचा प्रश्न भेडसावताना दिसत नाही. दुसरे म्हणजे, तिथे खाजगी साखर कारखान्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळेच तिथे आपल्याकडे होते, तसे आंदोलन होऊ शकत नाही. पण गहू, तांदूळ वा अन्य महत्त्वाच्या पिकांच्या हमीभावासाठी तेथील शेतकरीवर्ग पेटलेला आहे. मागच्या वेळी याच कारणांसाठी तीव्र आंदोलन झाले आणि शेतकऱ्यांनी दिल्लीच्या भोवतालचे सगळे रस्ते बंद केले. अशाच प्रकारे आताही आंदोलनकर्त्यांची दिशा राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तेव्हा त्यांनी आताही दिल्लीकडे येणारे रस्ते बंद केले, रस्त्यावरच मुक्काम ठोकला, चक्काजाम केले तर अनेक संकटे समोर येऊ शकतात. दिल्लीकडे येणारे रस्ते बंद होतात तेव्हा इतर प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. मागेही शेतकरी आंदोलनामुळे सामान्य प्रवाशांना मोठी झळ सोसावी लागली होती. शेतकऱ्यांचा रस्त्यांबरोबरच रेल्वे सेवाही बंद करण्याचा प्रयत्न असल्यामुळे सर्वसामान्यांच्या कटकटीमध्ये मोठी वाढ होते. दुसरे म्हणजे, अशी आंदोलने बऱ्याचदा हिंसक झाल्याचा इतिहासही आपल्याला ज्ञात आहे. त्यात अनेक शेतकऱ्यांचा बळी गेला आहे. खरे पाहता तेथील पुढाऱ्यांनी देशातील सगळ्या शेती प्रश्नांवर बोलायला हवे. मात्र, असे होताना दिसत नाही. टिकैत वा त्यांच्यासारखे पुढारी स्थानिक प्रश्नांवर बोलत राहतात. त्यामुळेच २३ डिसेंबरच्या शेतकरी दिनामध्ये पंजाब, हरयाणा येथील शेतकऱ्यांचाच पुढाकार बघायला मिळतो. याच स्थानिक पातळीवरील प्रश्नांच्या चर्चेमुळे अगदी उत्तरप्रदेशमधील शेतकरी या आंदोलनांमध्ये उतरताना दिसत नाहीत. दक्षिणेकडील शेतकरीही त्यांना साथ करीत नाहीत. त्यामुळेच दिल्या जाणाऱ्या इशाऱ्यानुसार नजिकच्या काळातही या भागामध्ये आंदोलन झाले, तर त्याचा भर आणि प्रभाव स्थानिक पातळीवरच राहण्याची शक्यता आहे. स्वाभाविकच मर्यादित प्रमाणातील आंदोलन असेच त्याचे स्वरूप राहिले आहे आणि आताही ते तसेच राहील. सर्वव्यापी शेतकरी आंदोलन असे स्वरूप बघायला मिळणार नाही. असे असताना केंद्र शासन त्याकडे किती गांभीर्याने पाहील, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण, आता केंद्र शासनाने हमीभाव जाहीर करून त्याप्रमाणे खरेदी सुरू केली आहे. महाराष्ट्रातील तसेच दक्षिणेकडील शेतकऱ्यांना ते समाधानकारक वाटले आहेत. केवळ पंजाब आणि हरयाणा या दोन प्रांतांमधील शेतकऱ्यांनाच ते समाधानकारक वाटत नाहीत. असे असले तरी, केंद्र शासनाला त्यांच्यासाठी वेगळी आणि देशाच्या अन्य भागांमधील शेतकऱ्यांसाठी वेगळी भूमिका घेता येणार नाही. चर्चेचे गाडे अडण्याचे वा कोणतीही निष्पत्ती न होता आंदोलन निष्प्रभ होण्याचे हे एक कारण होऊ शकते. नवीन सरकारने शेतकऱ्यांबद्दल खूप आस्था दाखवली आहे, हेदेखील या दिवसाच्या निमित्ताने आपण लक्षात घ्यायला हवे. पंतप्रधानांनी शेतकऱ्यांना लाभकारक ठरणाऱ्या अनेक योजना जाहीर केल्या आहेत. त्यांच्यासाठी विम्याच्या योजना फायदेशीर ठरत असल्याचे चित्र देशाच्या अन्य प्रांतांमध्ये बघायला मिळत आहे. म्हणूनच शेतकरी वर्गात आनंदाची भावना बघायला मिळत आहे. तसे नसते तर, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीला इतक्या मोठ्या प्रमाणात मते मिळालीच नसती. लोकसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्राने त्यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. याचा जबर फटका त्यांना सहन करावा लागला. परंतु, लोकसभा निवडणुकीनंतरच्या चार-पाच महिन्यांमध्ये केंद्र सरकारने शेतकऱ्यांप्रती घेतलेल्या भूमिकेने चित्र पालटवून टाकले. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर आता इथे फडणवीस सरकार आले आहे. त्यांना एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची भक्कम साथ असून, हे तिघेही केंद्र सरकारला पूरक अशीच भूमिका घेत आहेत. त्यामुळे भीती व्यक्त होत असलेल्या शेतकरी आंदोलनांचे लोण आपल्याकडे पसरण्याची फारशी शक्यता दिसत नाही. दक्षिणेकडून शेतकरी आंदोलनाचे हत्यार न उचलण्यामागे आधी उल्लेख केलेली समाधानावस्था हेच कारण आहे. त्यामुळे शेतकरी आंदोलन झाले, तरी देशाचा हा भागही त्यापासून दूर राहण्याची शक्यता अधिक आहे. अलिकडेच केंद्र शासनाने शेतकऱ्यांना साह्यभूत ठरणारे अनेक निर्णय घेतले. त्यातील एक म्हणजे कांद्याची निर्यात खुली करणे. यामुळे देशातील कांदा शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळाले. आखाती देशांमध्ये आपला कांदा पोहोचला. स्वाभाविकच मतांद्वारे शेतकऱ्यांनी या भूमिकेचे स्वागत असल्याचे दाखवून दिले. मात्र, इथे हेदेखील लक्षात घ्यायला हवे की, आयात-निर्यात हे केंद्राचे धोरण असते. त्यांना संपूर्ण देशाचा विचार करून हे धोरण ठरवावे लागते. देशातील वाढती महागाई, देशाच्या गरजा, पीक-पाण्याची स्थिती लक्षात घेऊनच हे निर्णय घेतले जातात. यावेळी गरिबांचा विचार करणे अत्यावश्यक असते. थोडक्यात, आयात-निर्यातीच्या धोरणांमध्ये अनेक प्रश्न सामावलेले असतात. मात्र, असे असतानाही केवळ निवडणुकांचा विचार न करता आयात-निर्यातीबाबतचे एक कायमस्वरूपी धोरण केंद्र सरकारने आखायला हवे. त्याचे स्वरूप राजकीय वा तात्कालिक असता कामा नये. त्यामध्ये सगळ्या शेतकऱ्यांचा विचार झाला पाहिजे. इथे आपण इस्रायलचे उदाहरण समोर ठेवू शकतो. संपूर्णपणे शेतीवर अवलंबून असणारा अत्यंत लहान देश असूनही त्यांची शेतीमालविषयक आयात-निर्यातीची धोरणे अतिशय सुस्पष्ट आणि सगळ्या शेतकऱ्यांना साह्यभूत ठरणारी आहेत. वालुकामय प्रदेश, पिण्याच्या पाण्याची टंचाई असताना आणि आपल्याकडील जेमतेम दोन जिल्ह्यांइतका देश असतानाही हा देश शेतीमालाच्या निर्यातीबाबत असे शाश्वत धोरण घेऊ शकत असेल, तर आपण यात कुठे मागे पडतोय, कायमस्वरूपी धोरण का आखले, राबवले जात नाही, याचाही गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. मोदी सरकारच्या तिसऱ्या कालखंडात तरी हा विचार होऊन या प्रश्नाला गती मिळायला हवी. ते झाले तर, युरोपची सगळी बाजारपेठ काबीज करणाऱ्या ब्राझीलप्रमाणे आपलीही स्थिती बघायला मिळेल. याचे कारण आपणही ब्राझीलप्रमाणेच युरोपमध्ये सहजतेने निर्यात करण्यास पात्र आहोत. ही पात्रता ओळखली आणि निर्यात वाढवून श्रीमंत देशांकडून पैसा मिळविला, तर आपला शेतकरी सुखी आणि समृद्ध होण्यास अजिबात वेळ लागणार नाही. सरकार याचा विचार करेल आणि शेतकऱ्यांबरोबर देशालाही समृद्ध करेल हीच अपेक्षा व्यक्त करू या.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# पाकिस्तान-बांगलादेश एकीकरणाकडे?

५३ वर्षांपूर्वीचा डिसेंबर महिना! बांगलादेशात म्हणजे पूर्व पाकिस्तानात जागोजागी पाकिस्तानच्या विरोधात घोषणा दिल्या जात होत्या, पाकिस्तानचा राष्ट्रीय ध्वज जाळला जात होता, भारतीय सैन्याचा जयजयकार केला जात होता, ठिकठिकाणी बॅ. मोहम्मद अली जिना यांचा निषेध होत होता आणि पूर्व पाकिस्तानचे नेते शेख मुजीबूर रहेमान यांच्या नावाने जल्लोष होत होता. ५३ वर्षांनंतर सारेच चित्र बदलले आहे. ठिकठिकाणी शेख मुजीबूर रहेमान यांच्या प्रतिमा एकतर काढून फेकल्या जात आहेत वा त्यांच्या प्रतिमांना काळे फासले जात आहे. प्रथमच पाकिस्तानचे संस्थापक मोहम्मद अली जिना यांचा जन्मदिन बांगलादेशात साजरा केला जात आहे. भारतविरोधी घोषणा दिल्या जात आहेत. ५३ वर्षांत जे झाले नव्हते, ते आज बांगलादेशात होत आहे.

**अमानवीय अत्याचार :** बांगलादेशच्या मुक्ती संग्रामात पाकिस्तानी सैन्याने बांगलादेशींवर अमानवीय अत्याचार केले होते. पाकिस्तानी लष्कराने केलेल्या हिंसाचारात ३० लाखांवर बांगलादेशी ठार झाले होते. अनेकांची घरे जाळण्यात आली होती, उद्ध्वस्त करण्यात आली. बांगलादेशी महिलांवर बलात्कार करण्यात आले. त्यावेळी पाकिस्तानी लष्कराबद्दल एक प्रकारचा संताप बांगलादेशात तयार झाला होता. याउलट भारतीय लष्कराचे ठिकठिकाणी स्वागत केले जात होते. स्थानिक जनता भारतीय लष्कराकडे आमचे संरक्षक या भूमिकेतून पाहात होती.

**आता शस्त्रखरेदी :** बांगलादेशाने आता त्याच पाकिस्तानकडून शस्त्रखरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. काही लाख बंदुकीच्या गोळ्या, रणगाड्यात वापरले जाणारे २००० गोळे, ४० टन आरडीएक्सच यासह आणखी काही लष्करी साहित्य पाकिस्तानातून आयात करण्याचा निर्णय बांगलादेशच्या हंगामी सरकारने घेतला आहे. देशात मोहम्मद युनूस यांचे हंगामी सरकार आल्यानंतर पाकिस्तान-बांगलादेश संबंधात दिसणारा हा सर्वांत मोठा बदल आहे. विशेष म्हणजे, या शस्त्रसामग्रीचा पुरवठा बांगलादेशला सुरूही झाला आहे.

**जमाते इस्लामी :** बांगलादेशात सक्रिय असणारी जमाते इस्लामी ही संघटना पाकिस्तान समर्थक व भारत विरोधी मानली जाते. शेख हसीना पंतप्रधान असताना त्यांनी या संघटनेवर बंदी घातली होती. जमाते इस्लामीची कार्यालये-बँकखाती गोठविण्यात आली होती. शेख हसीना यांनी या संघटनेला कधीही भारतविरोधी कारवाया करू दिल्या नव्हत्या.

**बंदी उठविली :** बांगलादेशातील हंगामी सरकारने जमाते इस्लामीवरील बंदी उठविली आहे. सत्तेवर येताच काही महिन्यांच्या आत जमाते इस्लामीवरील बंदी उठविण्याचा निर्णय नव्या सरकारने घेतला. या निर्णयाचे पाकिस्तानने स्वागत केले असून, जमाते इस्लामीने आपल्या भारतविरोधी कारवाया पुन्हा सुरू केल्या आहेत. बांगलादेशात हिंदूंना लक्ष्य करणे, हिंदू मंदिरांवर हल्ले करणे यामागे जमातचा हात असल्याचे म्हटले जाते. म्हणजे बांगलादेश सरकार भारतविरोधी कारवाया घडवून आणण्यासाठी जमातचा वापर करीत असल्याचे चित्र तयार होत आहे. एकीकडे पाकिस्तानच्या बाजूने जनमत तयार करणे आणि दुसरीकडे भारताच्या विरोधात जनमत तापविणे अशी दुहेरी कामगिरी जमात पार पाडत आहे.

**सहकार्याचे नवे युग :** बांगलादेशातील नवे सरकार सत्तेवर येऊन फक्त काही महिने झाले आहेत आणि दोन्ही देशांत सर्वच क्षेत्रात सहकार्याचे नवे युग सुरू झाल्याचे वातावरण आहे. जानेवारी महिन्यात ढाक्यात आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा होत असून, यात सहभागी होण्याचा निर्णय पाकिस्तानने घेतला आहे. साखर, कांदा, ज्यूट, मासळी, चहा, बटाटे, भाज्या-फळे या वस्तूंचा व्यापार करण्याबाबत दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू असल्याचे सांगितले जाते. बांगलादेश आजवर भारताकडून साखर आयात करीत असे. आता त्याने पाकिस्तानकडून साखर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानने ६ लाख टन साखर निर्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. थायलँड, मध्य आशियातील देश आणि बांगलादेश यांचा यात समावेश आहे. याने पाकिस्तानातील साखर उद्योगाला संजीवनी मिळेल आणि आपला परकीय चलनाचा साठा वाढेल, अशी आशा पाकिस्तानी नेत्यांना वाटत आहे. केवळ साखरच नाही, तर आणखी काही जीवनावश्यक वस्तूंची आयात पाकिस्तानकडून करण्याचा निर्णय बांगलादेशने घेतला आहे. आजवर ही आयात भारताकडून होत होती.

**नवे सरकार :** ढाक्यातील पाक उच्चायुक्तांनी बांगलादेश-पाकिस्तान संबंधांवर बोलताना म्हटले आहे, 'बांगलादेशातील नव्या सरकारमध्ये पाकिस्तानबाबत कमालीचा सलोखा दिसत असून, त्यांना पाकिस्तानशी व्यापारी संबंध वाढविण्याची तीव्र इच्छा दिसून येत आहे. या संदर्भात पाकिस्तान पेट्रोलियम लि. व बांगलादेशातील पेट्रोलियम कंपन्या यांच्यात काही करार करण्यात आले आहेत. पाकिस्तान-बांगलादेश यांच्यातील सागरी व्यापार वाढविण्याचाही निर्णय दोन्ही सरकारांनी घेतला आहे.

**मेघालयावर ड्रोन? :** नव्या बांगलादेशची मजल कुठवर जावी? भारतीय भूभागाची टेहळणी करण्यापर्यंत? काही दिवसांपूर्वी मेघालयावर एक ड्रोन आढळून आले. टर्कीमध्ये तयार झालेल्या या ड्रोनचे संचालन बांगलादेश वायुदलाच्या 'बशीर' या हवाई तळावरून केले जात असल्याचे निर्दशनास आले. या साऱ्याचा अर्थ काय, असा प्रश्न आता भारताला भेडसावू लागला आहे. केवळ काही महिन्यांपूर्वी सत्तेवर आलेल्या सरकारने ही हिंमत दाखवावी, याचेही भारताला आश्चर्य वाटत आहे.

**एकीकरणाकडे? :** १९७१ पर्यंत जगाच्या नकाशावर एक देश असणारे दोन देश दोन भागांत विभक्त झाले. आता त्यांच्यात सहकार्याचे वारे वाहू लागले असून, हे सहकार्य असेच चालू राहिल्यास दोन्ही देशांचे पुन्हा एकीकरण होईल काय, असा प्रश्न आताच विचारला जाऊ लागला आहे. पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी एकत्र येवू शकतात, तर पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान का एकत्र येवू शकत नाहीत, असे पाकिस्तान व बांगला देशातील काही लोकांना वाटत आहे. तर, काही विदेशी निरीक्षकांना पाकिस्तान-बांगलादेशचे विलीनीकरण एक अवघड कल्पना वाटते. जर्मनी केवळ एका भिंतीने विभाजित झाला होता. ती भिंत उद्ध्वस्त करून दोन्ही देशांचे एकीकरण करणे तसे सोपे होते. पाकिस्तान-बांगलादेशाचे तसे नाही. दोन्ही देश मुस्लिम असले तरी, त्यांची संस्कृती वेगवेगळी आहे आणि भौगोलिक अंतरही बरेच मोठे. या दोन देशांचे विलीनीकरण ही एक अवघड कल्पना असली तरी, नवे सरकार अस्तित्वात येताच बांगलादेश-पाकिस्तानात सुरू झालेले सहकार्य भारतासाठी नव्या समस्यांची नांदी ठरू शकेल.

**आशेचा एक किरण :** बांगलादेशातील काळवंडलेल्या व धुसर वातावरणात आशा वाटावी, असा एक किरणही आहे. या देशातील सर्वांत प्रमुख अशा 'द डेली स्टार' या वृत्तपत्रात नुकताच एक लेख प्रसिद्ध झाला आहे. तीन वर्षांपूर्वी बांगलादेश स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा झाला. त्यानिमित्ताने हा लेख लिहिण्यात आला होता. आता त्याचे पुर्नमुद्रण करण्यात आले आहे. मुफझ्झल हैदर चौधरी या एका बंगाली साहित्यिकाच्या मुलाचा हा लेख असून, त्याचे शीर्षक आहे, 'द कंट्री माय फादर वाँटेड'! पाकिस्तानी लष्कराच्या हिंसाचारात लेखकाचे वडील मारले गेलेहोते. त्याचीच सारी वेदना या लेखात आहे.

**दिवस शांतिनिकेतनचे! :** लेखात म्हटले आहे, बांगला साहित्याचा अभ्यास करण्याची ओढ चौधरींना शांतिनिकेतनला घेऊन गेली. शांतिनिकेतनमधील वास्तव्याने त्यांच्या जीवनात मोठे बदल घडविले. प्रत्येक परीक्षेत प्रथम येणाऱ्या चौधरींना रवींद्रनाथ टागोर यांचे सुपुत्र रतींद्रनाथ टागोर यांच्या हस्ते रवींद्रनाथांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाची प्रत देण्यात आली. १९४७ मध्ये भारताचे विभाजन झाले आणि पाकिस्तानात म्हणजे त्याच्याच देशात त्यांच्याशी भेदभाव केला जावू लागला. शांतिनिकेतन, कोलकाता विद्यापीठ येथे घेतलेल्या त्यांच्या पदव्यांना पाकिस्तान सरकार नाकारू लागले. असे करता करता १९७१ साल उजाडले. त्यावेळी पाकिस्तानी लष्कराने ढाक्यातील काही बुद्धिजीवींना पकडून ठार केले. त्यात चौधरीही होते. लेखकाने या साऱ्याचे स्मरण करून देत म्हटले आहे, बांगलादेशने वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती केली आहे. आमचा जीडीपी वाढला आहे. अनेक क्षेत्रात बांगलादेश आघाडी मारत आहे. पण, हे सारे करीत असताना, १९७१ मध्ये आम्ही ज्या मूल्यांसाठी संघर्ष केला, लढलो त्याचे विस्मरण होऊन कसे चालेल, असा लाख मोलाचा प्रश्न विचारत लेखकाने आपल्या लेखाची सांगता केली आहे. बांगला देशात आज भारतविरोधी सरकार असताना, हा लेख प्रसिद्ध केला जाणे, देशातील सर्वांत मोठ्या वृत्तपत्रात तो प्रसिद्ध होणे, हाच भारतासाठी आशेचा एकमेव किरण आहे.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# मोबाईलचा चक्रव्यूह तोडा, पण अभिमन्यू बनू नका!

महाभारतात कौरवांना विजय मिळावा म्हणून द्रोणाचार्यांनी चक्रव्यूह आखला होता. तो चक्रव्यूह केवळ द्रोणाचार्य आणि अर्जुनच भेदून परत येऊ शकत होते. पण दुर्दैवाने अर्जुन दुसरीकडे अडकून पडला आणि त्याचा पुत्र अभिमन्यूला सामोरे जावे लागले. अभिमन्यूला चक्रव्यूह भेदता येत होता, पण त्यातून बाहेर पडण्याचे ज्ञान नव्हते. परिणामी तो महाभारताच्या युद्धात धारातीर्थी पडला. अगदी अशीच परिस्थिती आजच्या युवक-युवतींसोबत घडत आहे. त्यांना मोबाईल जगताने आखलेल्या चक्रव्यूहात जाता येते, पण त्यातून बाहेर पडण्याचे ज्ञानच नसल्याने ते आपल्यासह इतरांचेही आयुष्य संकटात टाकत आहेत. नागपूर जिल्ह्यातील मनसर आणि कन्हान गावातील दोन युवकांना याच मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकल्याने आपला जीव देण्याची वेळ आली आहे. ती वेळ त्यांच्यावर का आली, याविषयी खोलात न जाता पहिल्यांदा हा मोबाईल जगताने भारतात आखलेला चक्रव्यूह भेदण्यासाठी इयत्ता पहिल्या वर्गापासूनच अभ्यासक्रमात विषय टाकणे अनिवार्य झाले आहे. पूर्वी मुले समजदार होण्याचे वय थोडे जास्त होते. आता मात्र मुलगा असो किंवा मुलगी आईच्या गर्भातून बाहेर पडताच मोबाईल वापरण्यात समजदार होत आहेत. अशाच समजदार मुला-मुलींना आता भारतीय पद्धतीने समजाविण्याची वेळ आली आहे. पूर्वी घरात आजी, आजोबा, काका, काकू राहायचे. ते आपला असो किंवा दुसऱ्याच्या मुलांवर बारीक नजर ठेवायचे. त्याचे काही चुकल्यास पटकन टोकायचे. आता स्वतःच्या मुलांवर आई-वडिलांना नजर ठेवता येत नाही. समजा कुणी ठेवण्याचा प्रयत्न केला तर आसपासचे सोडा घरातील लोकच त्यांना विरोध करतात. याच कारणाने मोबाईल घराघरात खलनायक बनला आहे. पाश्चिमात्य व्यापारी या मोबाईलच्या बळावर कोट्यधीश होत आहेत, तर



आपल्या भारतातील लोक दिवसागणिक अंत्योदय योजनेतील सहभाग वाढवीत आहेत. जेव्हा मोबाईल आले तेव्हा अनेकांनी त्याचे स्वागत केले. यातील फीचर खूप चांगले आहेत, त्याचा निश्चितच लाभ होईल असे म्हणत आपल्याच लोकांनी मोबाईलला डोक्यावर घेतले. पण आता ज्यांनी मोबाईलला डोक्यावर घेतले तेच रडकुंडीला आले आहेत. ऑस्ट्रेलियात वयाच्या १६ वर्षेपर्यंत मुला-मुलींना मोबाईल वापरता येणार नाही, असा कायदाच पारित करण्यात आला आहे. हा कायदा ऑस्ट्रेलियाच्या सरकारला आणायची काय गरज होती? असाही सवाल आपल्या भारतातील दीड शहाणे करतील. पण माझ्या मते ऑस्ट्रेलिया सरकारचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे. समजा, उद्या भारत सरकारने असा कायदा आणायचा विचार केला तर आपलेच लोक त्याला विरोध करतील. कारण येथील राजकारण्यांना किंवा फितुरांना भारताचे भले व्हावे असे मुळात वाटतच नाही. सर्व मंडळी विदेशी विशेषतः चीनयुक्त शक्तीच्या हातचे बाहुले बनले आहेत. या शक्तीचा विरोध करायचा असेल तर सुरुवात स्वतःपासून करावी लागेल. मनसर आणि कन्हान येथील दोन्ही घटनांतील युवक सेक्सार्टशनचे बळी पडले. कुणीतरी अज्ञात आरोपी त्यांना कॉल करून धमकावत होते. अशावेळी त्यांनी आपल्या आई-वडिलांना याची माहिती द्यायला हवी होती. पण त्या मुलांनी आपल्या आई- वडिलांपासून ती गोष्ट लपवून ठेवली आणि स्वतःचा जीव देऊन मोकळे झाले. मानवी जीवन एवढे स्वस्त नाही. त्याचे मूल्य कुणीही काढू शकत नाही, एवढे ते अमूल्य आहे. मग मृगजळरूपी मोबाईलच्या नादात लागून मुले जर असा जीव देतील तर त्यांच्या पालकांनी काय करावे, याचाही विचार जीव देण्यापूर्वी युवकांनी करायला हवा. माझ्या मते, त्यांनी स्वतःचा जीव देण्यापेक्षा जी मंडळी त्यांना त्रास देत होती, त्यांनाच संपवायला हवे होते. पण मुले तसे करीत नाही, कारण त्यांना लहानपणापासून लढणे शिकविलेच जात नाही. याच कारणाने आजची मुले भलेही मोबाईलवर टपाटप करतील पण प्रत्यक्ष मैदानात उतरण्याचे त्यांच्याजवळ धाडसच नाही. हा सर्व प्रकार भारतीय पिढीला उद्ध्वस्त करण्याचे फार मोठे षडयंत्र आहे. हे पाश्चिमात्यांचे गणित समजून घेणे गरजेचे आहे. इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सॲप याच्या नादी न लागता मुलांनी आता पुस्तकांकडे वळावे आणि मैदानावर घाम गाळावा. समजा त्यांना मोबाईलचा एवढाच नाद असेल तर मग स्वतःचे वेगळे विश्व तयार करून त्या बळावर कोट्यधीश बनावे. ते सोडून इतरांनी आखलेल्या चक्रव्यूहात अडकून पडणे पुरुषार्थ नाही. शेवटी एक सांगतो, 'आपणच तारी, आपणच मारी, आपणचि या' हा संतांचा अभंग नेहमी स्मरणात ठेवा.

९८८१७१७८५९

## प्रासंगिक

**विजय पांढरीपांडे**

# नव्या वर्षात शहाणे होऊ या!

मानव जात म्हणजे होमो सेपियन म्हणवली जाते. हो सेपियन म्हणजे शहाणी मानवजात. अगदी रानटी अवस्थेपासून मानवाने प्रगतीचे टप्पे गाठत आजची विकसित अवस्था प्राप्त केली आहे. स्टोन एज पासून, शेती, अवजारे, यंत्रे, कळप, आर्थिक देवघेव, निसर्गमित्र, धर्म संकल्पना, समाज वर्गीकरण, राज्य शासन, लोकतंत्र.. अशा उंच सखल बहुढंगी मार्गांतून प्रवास करत मानवजात या आजच्या टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. कळपाने राहणारा समाज स्वतःच निर्माण केलेल्या गोष्टी(स्टोरीज) वर जगतो आहे. धर्माचे नियम, जातिवर्ग संकल्पना, राज्यकर्ते शासन, आर्थिक विनिमय, गाव, शहर, राज्य, देश यांच्या सीमा, पुरुष-स्त्री यांच्यातले लैंगिक व्यवहार, संपत्तीचे अधिकार, सुशासनाचे कायदे याची लिखित स्टोरी आहे. प्रत्येक व्यवहाराचे आखून दिलेले कथानक आहे. कधी ते धर्माच्या नीतिनियमातून पुढे येते, कधी लोकशाही व्यवस्थेतून पुढे येते, तर कधी व्यवसाय, व्यापार, नीती व्यवहार या चौकटीतून आपल्यावर अंमल करते. एका विशिष्ट बंधनात पूर्ण समाजाला अडकवते!

सोयीसाठी गेल्या एक दोन शतकांचा जरी मर्यादित विचार आपण केला तरी मानवाची एकूण सामाजिक, आर्थिक, तांत्रिक, शैक्षणिक, व्यावसायिक प्रगती थक्क करणारी आहे. या प्रगतीचा वेग तर त्याहूनही अचंबित करणारा आहे. मानवजातीने विज्ञान-तंत्रज्ञानाचा उपयोग करून, तार्किक बुद्धीचा वापर करून अनेक नवी रहस्ये शोधून काढलीत. आपल्याच जुन्या समजुती खोट्या ठरवत नव्या तर्कशुद्ध प्रमेयांचा स्वीकार केला. अर्थातच हा विकासाचा प्रवास सोपा नव्हता. यात वर्ग संघर्ष होता, धार्मिक नीतिनियमांचा अडसर होता. असे असले तरी एकूणच मानवजात समूहप्रिय असल्याने, त्यांचा सहकारावर प्रचंड विश्वास असल्यामुळे सर्व अडथळ्यांवर मात करण्यात मानवजात यशस्वी ठरली असे आपण म्हणू शकतो.

प्रश्न हा आहे की विकासाचे इतके उंच उंच टप्पे गाठून देखील आपण सुसंस्कृत, सुशिक्षित शहाणे झालोत का? या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने नाही असेच द्यावे लागेल! आपण शिकलो, प्रगती केली, मोठ मोठे तंत्रज्ञान विकसित केले, अगदी परग्रहावर देखील जाऊन पोहोचलो. इंडस्ट्री युग, संगणक युग, माहितीचे मायाजाल, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास असे थक्क करणारे संशोधनाचे टप्पे आपण पाहिले, अनुभवले. आपण सुशिक्षित झालो. ज्ञानी झालो, विकसित झालो, पण शहाणे झालो का? नाही. आपण शहाणे झालोच नाही. कसे ते बघू या. शिकणे, मोठमोठ्या पदव्या मिळवणे, शोध लावणे, याने शहाणपण येत नाही. शहाणपणाचा संबंध समतोल बुद्धीच्या वापराशी आहे. विवेकशील विचार करण्याशी आहे. चांगले काय वाईट काय, ही समज म्हणजे विवेक. सुरीचा शोध आपण लावला. पण या सुरीचा उपयोग फळं कापण्यासाठी करायचा, आजार बरा करण्याकरता शस्त्रक्रियेसाठी करायचा की कुणाचा बदला घेण्यासाठी, एखाद्याचा खून करण्यासाठी करायचा याची जाण, हा विवेक म्हणजे शहाणपण. डायनामाईटचा शोध खनिज द्रव्ये शोधण्यासाठी, पर्वतातून मार्ग तयार करण्यासाठी करण्याऐवजी जर आपण दारूगोळा, बॉम्ब तयार करण्यासाठी करायला लागलो तर त्याला शहाणपण म्हणता येणार नाही.

अगदी गेल्या काही दशकातले आपल्या मानवजातीचे व्यवहार नीट तपासले तरी आपल्या शहाणपणाचे बिंग फुटले म्हणून समजा!

जातिधर्मावरून माणसातला द्वेष प्रचंड वाढला आहे. जात काही जात नाही. अन् आतवर रुजलेल्या धर्माचा कट्टरपणा देखील पुसला जात नाही. आपण तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. अनेक देशांत गेली काही वर्षे युद्ध सुरू आहेत. त्यात निष्पाप नागरिकांचे बळी जाताहेत. मुले अनाथ होताहेत. तरुण स्त्रिया विधवा होताहेत. स्त्रियांवर होणारे अत्याचार, बलात्कार तर माणुसकीला काळिमा फासणारे आहेत. वरवर दोन राष्ट्रांतले संबंध बरे दिसत भासत असले तरी प्रत्यक्षात आतून आग धुमसते आहे. मानवी कौटुंबिक नातेसंबंध देखील द्वेष, असूयेने काळवंडले आहेत. कुणाचा कुणावर विश्वास राहिलेला नाही. रक्ताची नाती एकमेकांचा जीव घ्यायला उठली आहेत. हे शहाणपण निश्चितच नव्हे.

राजकारणाचा चिखल तर बघवेनासा झालाय. त्या शिव्या, ती घाणेरडी भाषा, तो तिरस्कार, द्वेष हे पुढाऱ्यांच्या शहाणपणाचे लक्षण निश्चितच नव्हे. हीच नतद्रष्ट माणसे निवडून येताहेत. कायदे बनवताहेत अन् स्वतःच कायदे, नीतिनियम पायदळी तुडवत आहेत. हे वेडे शहाणपणाचा आधार असलेल्या लोकशाहीचे पाईक आहेत. केवढा मोठा विरोधाभास आहे हा! हे शहाणपण निश्चितच नाही! समाजालाच फसवणारी, घातक ठरणारी समाजमाध्यमे, माणसाला निरुपयोगी, निरोद्योगी बनविणारी कृत्रिम बुद्धिमत्ता, निसर्गाशी खेळणारे विकासतंत्र, पर्यावरणाचा ऱ्हास करणारे उद्योग, निसर्गाचे संतुलन बिघडविणारी काँक्रिटची जंगले, जलचर, तसेच जंगली प्राणी यांच्या जीवावर उठलेला रानटी माणूस शहाणा कोणत्या मापाने म्हणता येईल? हवा, पाणी दूषित करणारा औद्योगिक विकास हे शहाणपण निश्चितच नव्हे.

मानवजातीच्या वेडेपणाची अशी अनेक उदाहरणे देता येतील. अन् पर्यायाने ज्याला आपण बौद्धिक विकास म्हणतो ते केवळ फसवे मायाजाल आहे हे सहज गणिती प्रमेयासारखे सिद्ध करता येईल. हा वेडेपणा आता तरी थांबायला हवा.

नव्या शतकाचे रौप्य महोत्सवी वर्ष सुरू होते आहे. या चालू शतकाच्या रौप्य महोत्सवी वर्षात तरी आपण हा हिंसाचाराचा, द्वेषाचा, स्वार्थाचा, सत्तालालसेचा, तिरस्काराचा वेडेपणा सोडण्याचा संकल्प करायला हवा. चला, नव्या वर्षात थोडे थोडे शहाणे होऊया. अंधारातून प्रकाशाकडे जाऊया. स्वतःच लहानसा सूर्य होऊया. खऱ्या अर्थाने शहाणे होऊया!

७६५९०८४५५५

## वाचक पत्रे

### ...तर आधार रद्द करावे

अगदी अपरिहार्य कारण असेल आणि मतदान कुणी केले नाही तर समजू शकतो; पण मतदान करणे शक्य असतानाही केवळ बेजबाबदारीने आपला मतदानाचा हक्क न बजावणाऱ्या लोकांचे आधार कार्डच रद्द करून टाकायला पाहिजे. जेणेकरून त्यांना कोणतेच व्यवहार करता येणार नाही. आधारच्या अभावी... खरे म्हणजे, तसा कायदा करायला पाहिजे, त्याशिवाय मतदान न करणारे सुधारणार नाहीत. मतदान ऐच्छिक नव्हे, तर अनिवार्य असावे.

**आशिष देव**/चंद्रपूर

### सायबर गुन्हेगारीला बळी पडणाऱ्यांची संख्या वाढत आहे

सामाजिक गुन्हेगारी ज्या प्रमाणात वाढत आहे, अगदी त्याच प्रमाणात सायबर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत असून, या गुन्हेगारीला बळी पडणाऱ्याची संख्याही वाढत आहे. नागरिक व सुशिक्षित नागरिक, महिला वर्ग व तरुण मुली याला बळी पडत आहेत. नागरिकांनी आपल्या मोबाईलवर येणाऱ्या अनोळखी व्यक्तींच्या कॉलला उत्तर देऊ नये. त्यांना आपले मोबाईल नंबर कदापि देऊ नये. त्यांनी जर अमुक ठिकाणी या, अशी विनंती केली, तर अजिबात जाऊ नये. आपणाला बक्षीस मिळाले, असेही ते म्हणतील किंवा मेसेज पाठवतील, त्याकडे दुर्लक्ष करावे तसेच त्यांना आपल्या आधार कार्डचा नंबर सांगू नये. ते आपणाला भावनिक आवाहन करतील, तरी त्यांच्याशी संवाद वाढवू नये. बरेच नागरिक विशेषतः महिला वर्ग या भोंदू व फेक मोबाईल करणाऱ्यांच्या मोहाला बळी पडत आहेत. त्यांनी वेळीच सावध व्हावे. आपल्या बँकेचा पासबुक नंबरही सांगू नये. आपली कौटुंबिक माहिती अशा अनोळखी फेक कॉल करणाऱ्यांना अजिबात सांगू नये. ते मोठे अधिकारी, पोलिस अधिकारी, बँक अधिकारी असल्याचे आपल्याला सांगतील; मात्र असे कोणीही कॉल करीत नाही, हे सर्व भोंदू, फसवे व फेक कॉल असतात. त्यामुळे सर्वांनी अत्यंत सावध व खबरदार राहण्याची नितांत गरज आहे. तरुण मुलींनीही अशा फेक मोबाईल कॉलला बळी पडू नये व फेक मोबाईल कॉल आल्यास स्वीकारू नये. ओळखीचा कॉल नसेल, तर तत्काळ मोबाईल बंद करावा. शक्य असल्यास असे फेक कॉलचा नंबर नोंद करून पोलिसांना तत्काळ कळवले, तर या वाढत्या सायबर गुन्हेगारीला आळा बसू शकतो.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### संघाला न समजणारे चुकीची माहिती पसरवतात

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या कथनाचे वेगवेगळे अर्थ लावून विपर्यास करण्याचे काम सध्या विविध चॅनेलमध्ये सुरू आहे. सरसंघचालकांचे म्हणणे पूर्णपणे समजून न घेता, आपल्या परीने त्यातून अर्थ काढून संघाला न समजणारे लोक चुकीची माहिती पसरवण्याचे काम करीत आहेत व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला बदनाम करीत आहेत. मागे एका खाजगी कार्यक्रमात मोहनजी यांनी दिलेले लोकसंख्येबद्दलचे व्यक्तव्य असो वा हिंदू-मुस्लिम धर्मस्थळांबद्दल त्यांचे भाषण असो, हे लोक संघाचा अनादर करीत असतात. मला मीडियाला व अशा लोकांना सांगावेसे वाटते की, त्यांनी मोहनजींच्या कार्यक्रमात स्वतः उपस्थित राहून किंवा त्यांच्याशी बोलून त्यांचे म्हणणे पूर्ण ऐकावे घ्यावे आणि नंतरच आपले मत मीडियात प्रसूत करावे म्हणजे सर्वसामान्यांपर्यंत त्यांचे खरे मत पोहोचेल.

**प्रमोद वाडी**/९५६१७०११७२

### इंदूर महापालिका भीक देणाऱ्यांवर गुन्हा दाखल करणार

इंदूर हे देशातील सतत सात वर्षे स्वच्छ अभियानात प्रथम क्रमांक मिळविलेले शहर आहे. या शहरातील सार्वजनिक प्रसाधनगृहे अतिशय स्वच्छ आहेत. रस्त्यावर कोठेही कचरा किंवा प्लॅस्टिक दिसत नाही. इंदूर शहर भिकारीमुक्त असावे, असा एक चंग बांधलेल्या जिल्हा प्रशासनाने धक्कादायक निर्णय घोषित केला. १ जानेवारी २०२५ पासून इंदूर शहरात भीक देणाऱ्यांवर सुद्धा गुन्हा दाखल होणार आहे. याआधीच भीक मागणाऱ्यांवर बंदी घालण्याचा आदेश जारी करण्यात आला आहे. इंदूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी लोकांना भीक देऊन या पापात सहभागी होऊ नका, असे आवाहन लोकांना केले आहे. हा निर्णय लागू होण्याआधी अनेक ठिकाणी भिकाऱ्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. एकूणच इंदूर पालिकेचा हा निर्णय अतिशय चांगला असून, तेथे भिकाऱ्यांचे पुनर्वसनसुद्धा करण्यात येणार आहे, ही बाब महत्त्वाची आहे. केंद्रीय सामाजिक न्याय विभागाने एक प्रकल्प सुरू केला असून, त्याद्वारे देशातील इंदूर, मुंबई, नागपूर, दिल्ली, पाटणा, बंगळुरू, हैदराबाद, लखनौ, चेन्नई, अहमदाबाद या शहरांत भिकारी निर्मूलन मोहीम सुरू करण्यात येणार आहे. एकूणच सरकारचा भिकाऱ्यांबाबतचा निर्णय अतिशय महत्त्वाचा आहे आणि हा निर्णय सर्व ठिकाणी दिसावा.

**शांताराम वाघ**/पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### एमएसईबी कंपनीच्या उपाध्यक्षपदी ना.साकोरे

**परभणी,/प्रतिनिधी :** एमएसईबीच्या होल्डींग कंपनीच्या उपाध्यक्षपदी राज्यमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांची नियुक्ती करण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार २८ डिसेंबर रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात एमएसईबीच्या होल्डींग कंपनीच्या अधिकऱ्यांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक, प्रधान सचिव व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत कंपनीच्या उपाध्यक्ष पदाचा पदभार राज्यमंत्री सौ. साकोरे-बोर्डीकर यांना सुपूर्त करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली उर्जा विभाग अधिकाधिक लोकाभिमुख व्हावा, हरित उर्जेचा अधिक वापर व्हावा, मराठवाड्यासह राज्यातील वीज समस्यांचे निराकरण व्हावे, या दृष्टीने आपण सर्वतोपरि प्रयत करु, असा विश्वास बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

### मोबाईलसाठी मुलाने केली आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील केदार वस्ती येथील अक्षय हनमंत तिडके या १८ वर्षीय मुलाने मोबाईल का घेत नाहीत म्हणून रागाच्या भारात फवारणीचे विषारी औषध प्राशन करीत आत्महत्याा केली.

पाथरी पोलिस ठाण्यात हनमंत तिडके यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे मुलाने १४ डिसेंबर रोजी हे कृत्या केले. त्याावर उपचाराकरीता छत्रपती संभाजी नगरातील खाजगी रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचार सुरु असतांना मुलाचा मृत्यू झाल्याचे नमूद केले. दरम्यान, पाथरी पोलिसांनी या प्रकरणात आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### जमजम कॉलनीतून ८० हजारांची रोकड लंपास

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जमजम कॉलनीतील एका निवास्थानातून अज्ञात चोरट्यांनी ८० हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली.

शेख इरफान यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. त्याद्वारे २५ डिसेंबर रोजी सायंकाळी आपण सासरवाडीस गेलो असतांना अज्ञात चोरट्यांनी घरातील अलमारीचे कुलूप तोडून रोख ८० हजार रुपये, एटीएम कार्डसह अन्य वस्तू पळविल्याचे नमूद केले. दरम्यान, या प्रकरणात कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### भाजपाद्वारे दोन लाख सदस्य नोंदणीचा संकल्प

**परभणी,/प्रतिनिधी :** सदस्य नोंदणी अभियानातून या जिल्ह्यात नवीन दोन लाख सदस्य नोंदणीचा संकल्प भारतीय जनता पक्षाच्या पुढाऱ्यांनी निरीक्षकांसह संघटनमंत्र्यांसमोर सोडला.

सदस्य नोंदणीच्या पार्श्वभूमीवर येथील आयएमएच्या सभागृहात शनिवार २८ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे, तसेच प्रदेश सचिव राहुल लोणीकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, महानगर जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, प्रदेश प्रवक्ते डॉ. उमेश देशमुख, जिल्हा महामंत्री सुभाष आंबट, डॉ. केदार खटींग, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, विलास बाबर, शिवाजीराव मव्हाळे, शशिकांत देशपांडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रत्योक पदाधिकाऱ्याने या जिल्ह्यात सदस्य नोंदणीचे अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी करण्याचा संकल्प सोडला. लोकसभा, विधानसभा निवडणूकीत भाजप व इतर मित्रपक्षांना पूरक असे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून सदस्य नोंदणीकरीता निश्चितच सर्वार्थाने प्रयत करावेत, असे आवाहनसुध्दा यावेळी मान्यवरांनी केले.

### लंगोटे करणार रस्ते कामासाठी उपोषण

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर रस्त्याावरील वीज वितरण कंपनी ते स्त्री रुग्णालय तेथून पुढे वैकुंठधाम स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे काम महापालिका प्रशासनाने तात्काळ सुरु करावे, अन्यथा आपण १ जानेवारीपासून बेमुदत उपोषणास बसू, असा इशारा माजी नगरसेवक विकास प्रभाकरराव लंगोटे यांनी दिला आहे.

या रस्त्याची अवस्था भयावह आहे. तरीसुध्दा या रस्त्यावरुन आदळआपट करीत स्त्री रुग्णालयाकडे जाणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक मोठ्या यातना सहन करत आहेत. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, मुन्सिपल कॉलनी, संजय गांधी नगर, बँक कॉलनी, अजमेर कॉलनी, सुभेदार नगर, मंगेश नगर, डॉ. अब्दुल कलाम नगर, जावई कॉलनी, सालासार नगर या भागातील नागरीकांनाही ये-जा करण्याकरीता हाच रस्ता आहे. त्यामुळे या रस्त्यावर ये जा करतांना नरक यातना भोगल्याशिवाय कोणताही पर्याय नागरीकांसमोर नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या रस्त्याच्या दुरावस्थेसह या रस्त्यावरील दुतर्फा अतिक्रमणे ओळखून तात्काळ कारवाई सुरु करावी, अशी अपेक्षा माजी नगरसेवक लंगोटे यांनी व्यक्त केली.

### धर्मापूरी जि.प.शाळेत रतन टाटा यांची जयंती साजरी

**परभणी,/प्रतिनिधी :** धर्मापूरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवारी (दि.२८) शालेय परिपाठात आजचा दिनविशेष या सदरात रतन टाटा यांची जयंती साजरी करण्यात आली. 'आजचा आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत सृजनशीलतेचा विकास आणि सृजनशीलतेचा आनंद मिळावा म्हणून रतन टाटा यांचे जयंतीचे औचित्या साधून सामान्य ज्ञान स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादींचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक वैद्य तर प्रमुख वक्ते तथा मार्गदर्शक म्हणून शिक्षक अनिल बसुळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुरलीधर खेडकर व श्रीमती विमल धंदर यांची उपस्थिती होती. सुरुवातीस प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेचे भाषा शिक्षक डी. एस. फुलवरे यांनी प्रस्तावना केली. नारायण वैद्य यांनी 'जिंदगी के सफर में गुजर जाते है जो मकाम' हे गीत रतन टाटांना समर्पित केले. प्रमुख मार्गदर्शक अनिल बसुळे यांनी रतन टाटा यांचे संपूर्ण जीवन त्यांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्यांची देशभक्ती त्यांचा तो कणखरपणा, नम्रपणा, नैतिकता जागतिक स्तरावरचे उद्योगातील नेतृत्व, अपमानातून यशात रूपांतर, त्यांनी केलेलं शैक्षणिक कार्य, सामाजिक दातृत्व या सर्व बाबींचा उलगडा विद्यार्थ्यांसमोर केला.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# खेडयाकडे चला ही संकल्पना शहरी लोकासाठी - ॲड.गणेशराव दुधगावकर

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मनातील खेड्याकडे चला ही संकल्पना खेड्यातील लोकांसाठी नसून ती पुणे-मुंबईसारख्या मोठ्या शहरी लोकांसाठी आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री ॲड. गणेशराव दुधगावकर यांनी दि.२६ डिसेंबर रोजी येनोली येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक शिबिराच्या समारोपप्रसंगी केले.

जिंतूर येथील ज्ञानोपासक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष शिबीर मौजे येनोली येथे २० ते २६ डिसेंबर या कालावधीत आयोजित केले होते. दि. २६ डिसेंबर रोजी या शिबिराचा समारोप झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरून अड. दुधगावकर बोलत होते. त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ईश्वरसिंह जीवन जागृती मंडळाच्या अध्यक्षा प. पू. श्रीमती लक्ष्मीबाई पवार, अमरगड संस्थानचे मठाधिपती प.पू. ज्ञानेश्वर माऊली पवार, ज्ञानोपासक शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. संध्याताई दुधगांवकर, परभणी येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील वरिष्ठ अधिव्याख्याता गणेश शिंदे, शेवडीचे सरपंच सुधाकरराव घुगे, हे उपस्थित होते.

यावेळी ॲड. दुधगावकर म्हणाले की, येनोली हे गाव परिवर्तनाच्या विचारांची अंमलबजावणी करणारे गाव आहे. ईश्वरसिंह बापू यांनी त्या काळात बंजारा समाजात चांगले परिवर्तन केले. परिवर्तनाच्या लढाईत विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

डॉ. सौ. संध्याताई दुधगांवकर म्हणाल्या की, स्वतःला सिद्ध करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. स्वतःला ओळखून स्वतःची क्षमता प्रामाणिकपणे सिद्ध करा. नको त्या लोकांशी तुलना करून स्वतःचा मौल्यवान वेळ वाया न घालवता चांगल्या कामात स्वतःला झोकून द्या. खूप शिका आणि स्वतःच्या पायावर उभे राहा, असेही त्या म्हणाल्या.

गणेश शिंदे म्हणाले की, डोक्यात माहिती कोंबणं म्हणजे शिक्षण नव्हे, तर ज्यांना वागायला येत नाही त्यांना वागायला शिकवते ते शिक्षण. आज संवाद संपत चाललाय. पण हा संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनेची अशी शिबीरं होत. आजच्या डिजिटल जमान्यात कौशल्य महत्त्वाचे आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी कोणतेही चांगले कौशल्य आत्मसात केले पाहिजे. सध्याच्या काळात एखादी गोष्ट शिकायची कशी, हे आता शिकावे लागणार आहे, असेही त्यांनी बोलून दाखवले.




प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून विद्यार्थ्यांना सर्वधर्मसमभावाची व राष्ट्रीय एकात्मतेची शिकवण मिळते. भगवान घुगे, ओमकार काळे या शिबिरार्थ्यांनी मनोगत मांडले. ऋषिकेश नागरे, ज्योती रोकडे, भगवान घुगे, समृद्धी भालेराव यांना उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून तर गौरव वाकळे, श्रीनाथ रामपूरकर यांना उत्कृष्ट श्रम दानकर्ता म्हणून मान्यवरांचा हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. शाम गोरे, उपप्राचार्य मुंजाजी दाभाडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या सात दिवसीय शिबिराचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. संतोष कदम यांनी मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. निवृत्ती पोपतवार, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. पंढरीनाथ धोंडगे यांनी केले. कार्यक्रमास शिबिरार्थी, ग्रामस्थ, प्राध्यापक, कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## राज्याच्या राज्यमंत्री मेघना साकोरे यांनी स्वीकारला उपाध्यक्ष पदाचा पदभार!

**मुंबई,/प्रतिनिधी:** आज दिनांक २८ डिसेंबर २०२४रोजी सह्याद्रि अतिथीगृहात एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या पार पडलेल्या बैठकित मा. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर ह्यानी मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फड़नवीस ह्यांच्या प्रमुख उपस्थितित होल्डिंग कंपनिच्या उपाध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला!

उपाध्यक्ष तथा ऊर्जा राज्यमंत्री ह्या नात्याने मा मुख्यमंत्री देवेंद्र फड़नवीस ह्यांच्या मार्गदर्शनखाली ऊर्जा विभाग अधिकाधिक लोकाभिमुख करने ,हरित ऊर्जेचा अधिक वापरावर भर देने, मराठवाड्यासह राज्यातील वीज समस्यंचे निराकरण करने बाबत माझी आग्रही भूमिका राहिल आसा विश्वास मा. ना. मेघना बोर्डीकर ह्यानी या प्रसंगी व्यक्त केला. बैठकीकरिता प्रधान सचिव (ऊर्जा),महावितरण, महापारेषण, महानिर्मिति कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## इज्जतेमासाठी विशेष बसेसची व्यवस्था करा- एमडिओ

**परभणी,/प्रतिनिधी-** मुस्लिम बांधवांकडून परभणी-हिंगोली या दोन जिल्ह्यांचा जिल्हास्तरीय इज्तेमाचे आयोजन १ व २ जानेवारी रोजी करण्यात आले असून त्याकरीता राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विशेष बसेसची व्यवस्था करावी, अशी मागणी मायनॉरिटी डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनने केली आहे.

मुस्लिम बांधवांकडून परभणी-हिंगोली या दोन जिल्ह्यांचा जिल्हास्तरीय इज्तेमाचे आयोजन १ व २ जानेवारी रोजी शहरातील जिंतूर रोड उर्दु मदरसा परिसरात करण्यात आले आहे. या इज्तेमाला हजारोंच्या संख्येने मुस्लिम भाविकांची उपस्थिती राहणार आहे. मुस्लिम बांधवांची हजारोंच्या संख्येत होणारी गर्दी लक्षात घेता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून १ व २ जानेवारी रोजी परभणी - हिंगोली जिल्ह्यातील जिंतूर, सेलू, मानवत, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, गंगाखेड, पालम, बसमत, औढा, सेनगाव, कळमनुरी, तालुक्यातील इज्तेमासाठी परभणीकडे येण्यासाठी विशेष बस फेऱ्याची व्यवस्था करावी, तसेच २ जानेवरी रोजी रात्री इज्तेमा समाप्ती नंतर इज्तेमाच्या स्थळापासुन परभणी - हिंगोली जिल्ह्यातील भाविकांना परत जाण्यासाठी तालुकास्तरावर एसटी बसेसची व्यवस्था करावी, अशी मागणी एसटी महामंडळाच्या नियंत्रक विभागाकडे सहाय्यक वाहतूक अधिक्षक एस. आर. औसेकर यांच्याकडे केली आहे.

## उत्तरप्रदेश येथील राष्ट्रीय टेनिस व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेसाठी सेलूच्या चार खेळाडूंची निवड

**सेलू,/प्रतिनिधी-** गंगापूर येथील राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेत चमकदार कामगिरी करत परभणी जिल्हा संघाने विजेते पद पटकवले होते. जिल्हा संघातील चार खेळाडूची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

भारतीय टेनिस व्हॉलीबॉल महासंघाच्या वतीने गाझीपूर उत्तरप्रदेश येथे ३१ डिसें २०२४ ते २ जाने २०२५ पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या २६ व्या राष्ट्रीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी सेलू नूतन विद्यालय येथील प्रसाद संजय महाले, आर्यन रामभाऊ गायके, सार्थक दिंगबर माळकर, कु. गायत्री दत्ता गायके महाराष्ट्र संघात यांची निवड झाली असून महाराष्ट्र संघांचे प्रशिक्षण शिबीर २७ ते २९ डिसेंबर दरम्यान जळगाव येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडणार आहे. जळगाव येथूनच महाराष्ट्र संघ गाझीपूर (उत्तर प्रदेश )साठी रवाना होणार आहे. या उज्वल यशाबदल संस्था अध्यक्ष डॉ एस.एम. लोया, उपाध्यक्ष डी.के.देशपांडे,



सचिव डॉ व्हि.के. कोठेकर, सहसचिव जयप्रकाशजी बिहाणी, मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे, रोहिदास मोगल, प्रशांत नाईक, संजय भुमकर, टेनिस व्हॉलीबॉल चे जनक डॉ व्यंकटेश वांगवाड, राज्य सचिव गणेश माळवे, राज्य कार्याध्यक्ष डॉ आबासाहेब सिरसाठ , उपाध्यक्ष रामेश्वर कोरडे, जिल्हा सचिव सतीश नावाडे, प्रा.नागेश कान्हेकर, विभागीय सचिव प्रमोद महाजन आदींनी उपस्थित होते.



**मुंबई- भाजपा प्रदेशाध्यक्ष तथा नवनिर्वाचित महसूल मंत्री ना चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन परभणी जिल्ह्याल्या मंत्री पद आमदार मेघनाताई बोर्डीकर यांना राज्यमंत्री महाराष्ट्राचे केल्याबद्दल मनःपूर्वक आभार व धन्यवाद केले. तसेच परभणी पालकमंत्रीपदी मेघना साकोरे बोर्डीकर यांना देण्यात यावे यासंर्दभात भेट घेऊन महत्वपूर्ण चर्चा प्रदेशाध्यक्ष यांच्यासोबत केली. यावेळी माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर, भाजपा युवामोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुरेश भुमरे, प्रभाकरराव आप्पा वाघीकर दिसत आहेत.**

## सेलूसह जिल्ह्याच्या विकासासाठी कटीबद्ध मेघना बोर्डीकर यांची ग्वाही; सेलूत नागरी सत्कार

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलूसह जिल्ह्याच्या विकासासाठी कटीबद्ध मेघना बोर्डीकर यांची ग्वाही ; सेलूत नागरी सत्कार करण्यात आला होता.

पाच महत्वाच्या खात्याच्या राज्यमंत्री पदाची जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडताना सेलू, जिंतूर सह जिल्ह्याच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सत्कार समारंभ प्रसंगी दिली.

सेलूकरांच्या वतीने गुरुवारी सायंकाळी आयोजित नागरी सत्काराला उत्तर देताना मंत्री मेघना बोर्डीकर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी माजी आमदार हरिभाऊ लहाने,संध्याताई राठोड, नामदेव महाराज ढवळे, मीनाताई बोर्डीकर, डॉ सत्यानारायण लोया, प्राचार्य डॉ विनायक कोठेकर,



भावनाताई मुंगसे,जयप्रकाश बिहाणी, श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, नयनाताई दाते, डॉ. विद्याताई पाटील, नंदकिशोर बाहेती, प्राचार्य डॉ शरद कुलकर्णी, संजय लोया संदीप लहाने, माजी सभापती दिनकर वाघ, गोविंद थिटे, तालुकाध्यक्ष ॲड दतराव कदम, शहराध्यक्ष अशोक अंभोरे, राजेश देशमुख आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना बोर्डीकर म्हणाल्या, सेलू व जिंतूर तालुक्यातील शेतकऱ्यांना शाश्वत शेती करता यावी, पाणी अभावी वंचित बावीस गावात पाणी तसेच प्रत्योक शेतकऱ्याच्या बांधावर पाणी पोहोचावे, २५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वर्ष कधीही विजेची समस्या येणार नाही असे काम यापुढे करून ठेवायचे आहे. शहराच्या विकासात भर घालून सुंदर शहर करण्याचा संकल्प आहे. शहरासाठी पाणीपुरवठा योजना तयार आहे. अंडरग्राउंड ड्रेनेज, अंडरग्राउंड गॅस पाईपलाईन अशी अनेक सर्वोत्तम कामे करायचे आहे. यासाठी ताकद जनतेच्या माध्यमातून आपण मला देणार आहात असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक दत्तराव कदम यांनी केली सूत्रसंचालन सुभाष मोहकरे यांनी तर आभार अशोक अंभोरे यांनी मानले. दरम्यान, राज्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर प्रथमच बोर्डीकर शहरात आल्या होत्या. त्या निमित्ताने शहरातून रॅली काढून जेसीपी द्वारे बोर्डीकरांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संत नामदेव पतसंस्थेने ग्राहकांची विश्वासअर्हता कायम ठेवली

## संत नामदेव पतसंस्थेत सत्काराला उत्तर देतांना आ. मुटकुळेंचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर.**
आज विविध पतसंस्थेतील कामकाजाबद्दल नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. मात्र संत नामदेव पतसंस्थेने आजपर्यंत १५० कोटी रुपयांच्या ठेवी जमा केल्या असून १०५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. तसेच या पतसंस्थेने ४५ कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. मागील आर्थिक वर्षामध्ये दोन कोटी रुपयांचा नफा मिळविला. या पतसंस्थेने शहरासह ग्रामीण भागातील ग्राहक व सभासदांची विश्वासअर्हता कायम ठेवून सर्व सभासदांना पतसंस्थेच्या माध्यमातून अत्याधुनिक बँकिंग सुविधा दिल्या जात आहेत, असे प्रतिपादन भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी सत्काराला उत्तर देतांना केले.

येथील संत नामदेव नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये सलग तीन वेळा निवडून आलेले हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमासाठी माजी आमदार रामरावजी वडकुते, पतसंस्थेचे अध्यक्ष जनकराज खुराणा, उपाध्यक्ष माणिकराव लोंढे, संचालक ॲड नंदकिशोरजी मुंदडा, ललितराज खुराणा, जगजीतराज खुराणा, हंसराज खुराणा, काशीनाथराव दराडे, डॉ. किशन लखमावार, सुरेंद्र सावंत, नवीन परतवार, बालाजीराव गलंडे, जितेश खुराणा, मानस खुराणा, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिलकुमार सिंह (सिन्हा), प्रशासकीय व्यवस्थापक निलेश लाखकर, भाजपचे पदाधिकारी संजय कावडे, बद्रीनाथ जगताप, सरपंच मारोती कोरडे, प्रल्हादराव कोरडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संत नामदेव महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर नवनिर्वाचित आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांचा मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठलाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. तसेच संत नामदेव पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी आमदार श्री. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी आमदार मुटकुळे यांनी सांगितले की, आज विविध पतसंस्थेतील कामकाजाबद्दल नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. मात्र संत नामदेव पतसंस्थेने आजपर्यंत १५० कोटी रुपयांच्या ठेवी जमा केल्या असून १०५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. तसेच या पतसंस्थेने ४५ कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. मागील आर्थिक वर्षामध्ये दोन कोटी रुपयांचा नफा मिळविला. या पतसंस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून कौतुक केले.

या कार्यक्रमासाठी शाखा व्यवस्थापक किशोर नायसे, प्रकाश शर्मा, जीवन घोडके, प्रवीण पांडे, विशाल दायमा, विशाल गायकवाड, राजेश पुरोहित, नितीन कापसे, आशिष घुगे, कडूजी कोरडे, बालाजी घ्यार, विक्की गोरे, मनोजकुमार गौतम, संजय बनसोडे, प्रेम साकळे, श्रीराम बुधवंत, हार्दिक दुबे, किशोर गोरे, डिगांबर टाक, नामदेव शिंदे, ओम सुर्यवंशी, केदारनाथ देशमुख, किशोर कोरडे यांच्यासह ग्राहक, सभासद, पत्रकार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रकाश शर्मा यांनी केले.

# नाक्यांवर वाहन चालकांची ब्रिथ ॲनालायझर पथकांकडून तपासणी

## जिल्ह्यात ३२ ठिकाणी तपासणी नाके



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**
नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर हिंगोली पोलिसांनी मद्य वाहतूक रोखण्यासाठी ३२ ठिकाणी तपासणी नाके सुरू केले असून वाहन चालकांची ब्रिथ ॲनालाइझर द्वारे तपासणी केली जात आहे. मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जाणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यात थर्टी फर्स्टच्यो नावाखाली मद्यधुंद होऊन चालविणेतसेच हुल्लडबाजी करण्याचे प्रकार होतात. त्यामुळे कायदा व सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्हाभरातील पोलिस यंत्रणांना सतर्कतेचे आदेश दिले आहेत. अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पाच पथके जिल्हाभरात गस्त घालणार आहेत. याशिवाय पोलिस उपाधिक्षकांची पथके त्यांच्या हद्दीत लक्ष ठेवून असणार आहेत.

जिल्ह्यात अवैधरित्या होणारी दारू वाहतूक रोखण्यासाठी ३२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. या तपासणी नाक्यावर वाहनांची तपासणी केली जाणार आहे. याशिवाय शहरातून फिरणाऱ्या सर्वच वाहन चालकांची ब्रिथ ॲनालाइझरद्वारे तपासणी केली जात असून आतापर्यंत एका तरूणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि ३० डिसेंबरपासून पोलिस विभागाने ही कार्यवाही सुरू केली असून ठिकठिकाणी चारचाकी वाहने, दुचाकी वाहन चालकांची तपासणी करण्यात येत आहे. नागरिकांनी नवीन वर्षाचे स्वागत जबाबदारी आणि सतर्कतेने करावे तसेच तरूणांनी नवीन वर्षात चांगले संकल्प घेत उत्साहात नवीन वर्षाचे स्वागत करावे असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.

# औंढा नागनाथ येथे भाजपचे सदस्य नोंदणी अभियान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**
शहरातील शासकीय व्हीआयपी विश्रामगृहामध्ये भाजपा औंढा नागनाथ तालुक्याच्यावतीने सदस्य नोंदणी अभियान कार्यशाळा आज २६ गुरुवार रोजी दुपारी एक वाजता मा. आमदार रामराव वडकुते व भाजपा जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली .या कार्यशाळेत मा. आमदार रामराव वडकुते व भाजपा जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे यांनी मार्गदर्शन केले . औंढा नागनाथ तालुक्यातील प्रत्येक बूथ प्रमुखांनी ५० ते २०० सदस्य नोंदणी



८८०००२०२४ या नंबर वर कॉल करून प ची लिंक उघडल्या जाईल त्या पद्वारे नोंदणी करायची आहे.या कार्यशाळेस माजी आमदार रामराव वडकुते, भाजपा जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, महिला जिल्हाध्यक्ष उज्वला तांबाळे, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, जिल्हा उपाध्यक्ष सर्जेराव दिंडे,औंढा तालुकाध्यक्ष सखाराम इंगळे ,शहराध्यक्ष बबन सोनुने, खोबराजी नरवाडे, गणेश पाटील, एस एस कदम, गणेश ठाकूर, माऊली कदम, मंचकराव कदम, दीपक सानप, प्रा. गजानन कुटे, सिदबाराव करे, संजय लोंढे, सतीश यादव, रुक्मीनाबाई जळके, कौसाबाई रिठे, एकनाथ कदम, माधव वानखडे, डीगाबर गिरी, नवनाथ लोणसणे, सुधाकर सावळे, सुभाष सावळे, जगन सावळे यांच्यासह भाजपाचे प्रदेश पदाधिकारी जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, सुपरवारीयर्स उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रस्तावना व सूत्रसंचालन सखाराम इंगळे तर आभार गणेश पाटील यांनी मानले.



**हिंगोली– भारतीय जनता पक्षाच्यावतीने वसमत येथे सदस्य नोंदणी अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. रामराव वडकुते, सरचिटणीस उमेश नागरे, ज्येष्ठ नेते श्रीकांत देशपांडे, महिला जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे, मिलींद यंबल यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोलीत वीर बाल दिवस साजरा

हिंगोली– गुरु गोविंद सिंग यांच्या दोन लहान मुलांनी दिलेल्या बलिदानाचे प्रतिक म्हणून २६ डिसेंबर हा वीर बाल दिवस म्हणून दरवर्षी साजरा केला जाईल, अशी घोषणा पंतप्रधान यांनी केली आहे. त्या अनुषंगाने हिंगोली जिल्ह्यात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाअंतर्गत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सरस्वती मुलींचे निरीक्षणगृह व बालगृह, सावरकर नगर, हिंगोली व श्री स्वामी समर्थ बालगृह, खानापूर (चित्ता) ता. हिंगोली येथे वीर बाल दिवसानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. यात चित्रकला तसेच माझे स्वप्न भारतासाठी आणि मला कशामुळे आनंद होतो, या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. तसेच प्रवेशित बालकांना वीर गाथा दाखविण्यात आली. कार्यक्रमामध्ये बालकांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, बाल संरक्षण अधिकारी (संस्थात्मक) गणेश मोरे, बाल संरक्षण अधिकारी (संस्थाबाह्य) जरीबखान पठाण, सामाजिक कार्यकर्ता रामप्रसाद मुडे, समुपदेशक सचिन पठाडे, निरीक्षण गृहाचे प्र.अधीक्षक शंकर घ्यार, काळजीवाहक सिंधू भिसे, बालगृह अधीक्षक रमेश पवार, चाईल्ड हेल्प लाईनचे राजरत्न पाईकराव, तथागत इंगळे, बालगृहातील प्रवेशित बालकांची उपस्थिती होती.

### नववर्ष धुंदीत नव्हे, शुध्दीत साजरे करा– अग्रवाल

हिंगोली– आम्ही प्राणी असूनही कोणतेही व्यसन करीत नाही, तुम्ही तर माणस आहात', असा प्रतिकात्मक प्राण्यांनी दिलेला संदेश देत व्यसनमुक्ती चळवळीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र सर्वोदय मंडळाच्या वतीने वसमत येथे दि. ३० सोमवारी व्यसनमुक्ती जनजागृती करण्यात आली. मावळत्या अन् नववर्षाच्या अनुषंगाने धुंदीत नव्हे तर, शुद्धीत साजरे करा, असा संदेश वसमत येथील विविध ठिकाणी देण्यात आला. नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्षा-शुभदा सरोदे, सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, कार्यकर्ते बालाजी दुमाने, सुभाष कुंभारकर आदींची उपस्थिती होती. यावेळी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य प्रकाशित फलकाच्या माध्यमातून प्रतिकात्मक प्राण्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश देत नववर्ष साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले. नववर्षाच्या अनुषंगाने व्यसनी दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, अंमली पदार्थ यांच्या व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते-विशाल अग्रवाल, नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्ष-शुभदा सरोदे यांनी केले आहे. तरुणांनी नवं वर्षानिमित्त सकारात्मक संकल्प घेत आपल्या जीवनाला विविध व्यसनांपासून लांब राहण्याचे आवाहन करण्यात आले.

### चार ठिकाणी अवैध दारू विक्रेत्यांवर छापा

हिंगोली– दारूबंदी कायद्यांतर्गत पोलिस विभागाच्यावतीने चार ठिकाणी अवैध दारू विक्री करणाऱ्यावर छापे मारण्यात आले. यावेळी ५९ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपींताविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अधिकाऱ्याकडून रेशन दुकानदारांची पिळवणूक होत असल्याची तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**
येथील रेशन दुकानदार संघटनेने भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेकडे दिलेल्या निवेदनात रेशन दुकानदारांची अधिकाऱ्यांकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याची तक्रार केली आहे परंतु अधिकाऱ्यांनी सदरील आरोप फेटाळले आहेत. दुकानांची तपासणी वाढवल्यामुळे आपल्याविरूध्द षडयंत्र रचण्यात आल्याचे म्हटले आहे.

हिंगोली येथील रेशन दुकानदार संघटनेचे अध्यक्ष भिकुलाल बाहेती, सचिव अशोक काळे, फारूख खान पठाण यांनी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्याकडे पत्र दिले आहे. यामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी राजेश पुंजल यांच्यावर आर्थिक पिळवणूकीचे आरोप केले आहेत. यामध्ये मे २०२१ मध्ये चलनाद्वारे पैसे भरून देखील शासनाच्या आदेशानुसार मोफत धान्य वाटप केले आहे. त्याची ३३.५० लाख रूपयांच्या परताव्याची रक्कम दुकानदारांना दिली नाही. यामध्ये २५ टक्के कमीशन दिल्याशिवाय रक्कम वाटप करणार नाही असा आरोप केला आहे. तसेच शहरी भागातील दुकानदारांनी दरमहा ५ हजार रूपये तर ग्रामीण भागातील दुकानदारांनी २ हजार रूपये द्यावेत अन्यथा दुकाने तपासून निलंबीत करेल असा आरोपही करण्यात आला आहे. तसेच मागील दोन महिन्यात दुकानदाराला दिलेल्या धान्यातून काही धान्य काढून त्याची परस्पर विल्हेवाट लावली व दुकानदारांवर दबाव टाकून सर्व धान्य मिळाल्याची पोहोच घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाता आ. मुटकुळे यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांना पत्र पाठवून प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांची बदली करून कायमस्वरूपी अधिकारी देणयची मागणी केली आहे.

# आरोपीच्या अटकेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**
शहरातील करिअर कोचींग क्लासेसमधील शिक्षकांच्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून बारावीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांने रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केली. याप्रकरणातील आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवाजी दत्तराव लोंढे यांच्यासह अन्यजणांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.



निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, बारावीत लाख येथे शिक्षण घेणारा किरण लोंढे हा हिंगोलीतील करिअर पॉइंट कोचींग क्लासेस येथे शिकवणी घेत होता. तेथील शिक्षक अनिल वानखेडे, सतीश थोरात, ज्ञानेश्वर गिरी यांचे शिकवणी वर्गातील काही मुलींशी अनैतिक संबंध असल्याची माहीती किरणला होती. त्यामुळे त्याला शिक्षकांनी शारीरिक व मानसिक त्रास दिला. तसेच धमक्या दिल्या. या त्रासाला कंटाळून किरणने एक चिठ्ठी लिहून रेल्वेखाली आत्महत्या केली होती. परंतु पोलिसांनी अद्याप आरोपींना अटक केली नाही. या आरोपींना तत्काळ अटक करावी या मागणीसाठी शिवाजी लोंढे, गजानन लोंढे, अशोक लोंढे, राजू लोंढे, सदाशिव लोंढे, गजानन कल्याणकर आदींनी उपोषण सुरू केले आहे.

# अहिल्यादेवी यांनी समाजाला अमृत देण्याचे काम केले– प्रा कल्पना भागवत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० डिसेंबर**
समुद्र मंथनातून काळकूट विष पृथ्वीवर पडणार यासाठी कोणीही धावून न येता अहिल्या देवी यांनी भगवान शिव यांना समोर करून पृथ्वी नष्ट न होऊ देता त्यांनी समुद्र मंथनातून आलेले काळकूट विष प्राशन करून समाजाला अमृत देण्याचे कार्य पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केल्याचे प्रतिपादन प्रा.कल्पना भागवत यांनी रविवारी येथे केले.



येथील बियाणी नगर येथील विद्यानिकेतन इंग्लिश स्कुल येथे रविवारी (ता. २९) डिसेंबर रोजी स्वयंसिद्धा नारी मंच व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या पुढाकारातून अहिल्यादेवी काल, आज, आणि उद्या यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर डॉ. संध्या बैस, प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. मनीषा सुरेश गडदे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे जिल्हा कार्यवाह तेजकुमार झंजरी, एड, सुरेश गडदे, देशमुख, ॲड. बियाणी आदींची उपस्थिती होती.

भागवत बोलताना पुढे म्हणाल्या,नावातच स्वयंसिद्धा असून, राष्ट्र उभारणीसाठी यंदा अहिल्या देवी होळकर यांचे त्रिशताब्दी वर्ष साजरे होत असल्याचे सांगून अहिल्या देवी यांनी इतर देवता हातात न घेता केवळ शिव का घेतले असा सवाल उपस्थित करीत अनेकांच्या बोलत्या बंद केल्या. या मागे महादेवा बद्दलची भक्ती असून शिव हा सर्व हिंदू धर्माचे देवता आहेत. सर्व समाज शिवाला मानणारा आहे. त्यामुळे हिंदू एकत्रिकरण करणे आवश्यक होते. असे सांगून १७ व्या शतकातील कालखंडात रामनामातुन मुक्ती केली. त्यांच्यावर चांगले संस्कार असल्याने त्यांनी आपले दुःख बाजूला सारून मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा संकल्प केला त्यातून एकेक मंदिरे स्वतःच्या निधीतून बांधली असून, त्यांचे व्यवस्थापन योग्य होते, त्यामूळे त्यांनी महिलांसाठी उद्योग निर्मिती केली, यातून वेगवेगळे गट स्थापन करून त्यांना कामे दिली, आज आपण पाहतो बचत गटा मार्फत महिला कामे करतात मात्र हि संकल्पना अहिल्या देवी यांनी सतराव्या शतकात उपलब्ध करून दिली. तसेच पाण्याचे नियोजन देखील केले. हिंदू संघटन करण्यासाठी महिलांची फळी उभारून महिलासाठी फौंज उभी करून प्रशिक्षण दिले, फोजला सक्षम केले.पती यांच्या निधनानंतर खचून न जाता त्या जोमाने कोणाकडे लक्ष न देता त्या कोणाला न घाबरता सती गेल्या. आणि तिथून उद्योग व्यवस्थापन यांना चालना दिली.

भागवत पुढे म्हणाल्या, संस्कार हे घरातूनच घडत असतात, त्यामुळे त्यांनी तोच वसा घेत आहार, राहणीमान, याबाबत सविस्तर विश्लेषण करून आहारात बर्गर, पिझ्झा न घेता सामान्य आहार यात हरभरा, शेंगदाणे, उडीद भिजवून खालल्यास शरीराला पोषक आहार मिळतो. आणि यातून आपले कर्तृत्व, सामर्थ्य समाजात वावरते. त्यामुळे भारतीय संस्कृती जोपसल्या पाहिजे असे स्पष्ट भागवत यांनी अनेक, उदा हरणे देऊन स्पस्ट केले.

अहिल्या देवी यांनी सर्वआयुष समर्पण करून देशाची सेवा केली, असे सांगून समाजाला एकत्र राहण्याचा संदेश दिला. भारतभरात ठीक ठिकानी मंदिरे शिवालये स्थापन करून मंदिराचा जीर्णोद्धार देखील केला आहे. त्यामुळे समुद्र मंथनातून समाजाला अहिल्या देवी यांनी अमृत देण्याचे काम केल्याचे भागवत यांनी स्पष्ट केले.

पुण्यश्लोक अहिल्या देवी यांचे चरित्र शाळा महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना माहिती दिलेल्या दहा नारी महिलांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पुसेगाव येथील राष्ट्र सेविकेच्या विद्यार्थिनीने स्वतःचे आत्मरक्षण करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## मरवाळी तांडा आश्रम शाळेचे सेवक गणपत कोत्तेवार यांचा सेवा पूर्ती सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ३० डिसेंबर**

मरवाळी तांडा येथील पोष्ट बेसिक माध्यमिक आश्रम शाळेतील सेवक गणपत किशन कोत्तेवार हे दिनांक.३१ डिसेंबर रोजी रोज मंगळवारी नियत्त वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असुन या सेवापूर्ती पर संकुलातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने सेवापुर्ती सोहळा आयोजित केला आहे.

तालुक्यातील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पोष्ट बेसिक माध्यमिक आश्रम शाळेतील सेवक गणपत किशन कोत्तेवार हे ११ जुन १९९०पासुन ते आजतागायत सेवक पदावरून ३४ वर्ष ६ महिने १७ दिवस कर्तव्यावर राहून आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले आहे ते नियत वयोमानानुसार दिनांक.३१ डिसेंबर रोजी दिवशी सेवानिवृत्त होत असुन या सेवापुर्तीपर संकुलातील शिक्षक व शिक्षकेतर व चतुर्थ कर्मचारी यांच्या वतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.रतन लक्ष्मण राठोड यांच्या अध्यक्षते खाली बालक.शिक्षण.प्रसारक. मंडळाचे, सचिव तथा माजी प्राचार्य)बळीराम लक्ष्मण राठोड,माजी .प्राचार्य किशनराव रतन राठोड,मा.प्राचर्य भारत बेटकर ,संस्थेचे कार्यवाहक डॉ. मधुकर राठोड , व प्रसिध्द वक्ते, तथा कवी,मराठवाडा युवा वक्ता शंकर राठोड,यांच्या उपस्थितीमध्ये येथील शाळेच्या प्रांगणात सेवा पुर्ती पर निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.सेवापुर्तीपरनिरोप समारंभाला आजी माजी शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभणार आहे.

## कर्मयोगी नानासाहेब जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळायाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ३० डिसेंबर**

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नानासाहेब जाधव यांच्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी येथे करण्यात आले आहे .

शैक्षणिक क्षेत्रात वाडी-ताड्यांतुन शाळा, महाविद्यालये यांच्या माध्यमातून अतुलनीय योगदान देणारे कर्मयोगी डॉ.नानासाहेब जाधव त्यांच्या १ जानेवारी २०२५ रोजी ६८ व्या वाढदिवसानिमित्त वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालय येथे सायंकाळी ५ वाजता अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजित करण्यात आला आहे.सदरील अभिष्टचिंतन सोहळा म्हणजे त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव सोहळा होय. तरी या अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थिती राहण्याचे आवाहन डॉ.डब्ल्यु.आर.मुजावर प्राचार्य,जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,सिडको नवीन नांदेड व डॉ.एस.पी.घुंगरवार प्राचार्य,वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नांदेड यांनी केले आहे.

## लोणार मुनिसुव्रत स्वामी मंदिर ते अंतरिक्ष पार्श्वनाथ शिरपूरला ३२५ भक्तांची भव्य पदयात्रा (छ'रि पालक संघ)

छत्रपती संभाजीनगर : औरंगाबाद जैन श्वेतांबर मूर्तीपूजक श्री संघ, छत्रपती संभाजीनगर च्या तत्वावधान मध्ये व श्री विमलनाथ स्वामी भगवान यांच्या कृपेने श्वेतांबर जैन समाजाचे विदर्भातील नावाजलेले तीर्थक्षेत्र श्री अंतरीक्ष पार्श्वनाथ मंदिर शिरपूर मालेगाव व प्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे सरोवर असलेले लोणार या गावापासून ३२५ भक्तांची भव्य पदयात्रा (छ'रि पालक संघ) दिनांक ०३ जानेवारी २०२५ ते ८ जानेवारी २०२५ पर्यंत काढण्यात येत आहे. मागील चाळीस वर्षापासून अंतरीक्ष पार्श्वनाथ मंदिर शिरपूर हे दर्शनासाठी व पुजेसाठी बंद होते. परंतु मागील २ वर्षापासून मा. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार मंदिर दर्शनासाठी व पुजेसाठी खुले करण्यात आले. तेव्हापासून पदयात्रा काढण्याचा विचार सुरु होता व २०२४ च्या चातुर्मासावेळी प.पु. मुनिराज युगंधर विजयजी म.सा. आदी ठाणा ४ यांच्या मार्गदर्शनानुसार सदरील पदयात्रेचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार लोणार येथून दि. ३ जानेवारी २०२५ ला पदयात्रेचे प्रस्थान होईल ज्यामध्ये ३२५ भक्तगण, साधू भगवंत प.पु. मुनिराज युगंधर विजयजी म.सा. आदी ठाणा ४ व प.पु. साध्विजी भगवंत सौम्यप्रज्ञाश्रीजी म.सा. आदी ठाणा ५, श्रावक व श्राविका असा चतुर्विध संघ सम्मिलित होईल. सर्व यात्रेकरूंच्या तब्येतीची काळजी घेण्यासाठी डॉक्टर्सही सोबत आहेत.

छ'रि पालक संघ म्हणजे जे भक्तगण यामध्ये समिल्लीत होतील त्यांना ६ नियमांचे पालन करणे अनिवार्य राहील. ज्यामध्ये १) पैदल यात्रा करणे. २) संथारा (सतरंजी) वर झोपणे. ३) ब्रम्हचर्य व्रताचे पालन करणे. ४) दिवसातून १ वेळेस जेवणे (एकासणा करणे). ५) दोन्ही वेळेस प्रतिक्रमण करणे व प्रवचनाचे श्रवण करणे व ६) जैन धर्माच्या शास्त्रानुसार आहार करणे व तसेच रोजच्या नित्य नियमाप्रमाणे सगळे भक्तगण सकाळी ४ वाजता उठून प्रतिक्रमण करतील.त्यानंतर सकाळी ५:३० वाजता चालायला सुरुवात करून ९ वाजेपर्यंत पुढच्या ठेप्यावर पोहोचतील. तेथे पोहोचल्या नंतर आंघोळ करून देवाची पुजा करतील. त्यानंतर दुपारी १२ वाजता एकासणा राहील. दुपारी २ वाजता गुरु भगवंतांचे प्रवचन व संध्याकाळी ५:३० वाजता प्रतिक्रमण व त्यानंतर भगवंतांची भक्ती असा दिवसभराचा कार्यक्रम राहील. संघा सोबत भगवंतांचा रथ व मंदिर राहील. सगळ्या भक्तांची राहण्याची व बाकी सगळी व्यवस्था टेंट व शाळेत करण्यात येणार आहे. मंदिराची देखरेख करण्यासाठी पुजारीही सोबत राहतील.

अशा प्रकारे प्रति दिवस १३ ते १४ कि.मी. चा पायी प्रवास करून हे संघ ७ तारखेला सकाळी अंतरीक्ष पार्श्वनाथ येथे पोहोचेल. तेथे ७ तारखेला दुपारी ३ वाजता बहुमानाचा कार्यक्रम होईल व ८ तारखेला सकाळी ९ वाजता माळेचा कार्यक्रम होईल. अशा प्रकारे सदरील छ'रि पालक संघाची सांगता होऊन सगळे यात्रेकरू आपआपल्या गावी जातील. या पदयात्रेचा संपूर्ण खर्चाची जबाबदारी संघाच्याच ४ परिवारांनी १) मातोश्री उमरावबेन कपूरचंदजी संचेती, २) श्रीमती विजयादेवी इंदरराजजी सिंघवी, ३) मातोश्री श्रीमती विमलबाई बाबूलालजी नाहर, ४) सौ. भारतीबेन इंदरचंदजी संचेती यांनी घेतलेली आहे.

# ग्रामीण भागातील विध्यार्थी खेळाडूसाठी सांभागस्तरीय क्रिडा महोत्सव हे सर्वोच व्यासपीठ : आ. भीमराव केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट ,दि. ३० डिसेंबर**

किनवट सारख्या मागास दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना देशपातळीवर खेळाची संधी उपलब्ध करून देण्याचे एकल अभियानांतर्गत आयोजित केले जात असलेले क्रीडा महोत्सव हे सर्वोच्च व्यासपीठ आहे असे मौलिक प्रतिपादन किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी केले आहे.

एकल अभियान संभाग महाराष्ट्र द्वारा अभ्युदय युथ क्लब संघटनेच्या वतीने किनवट तालुक्यातील मौजे चिखली बुद्रुक येथील शिवबाबा आश्रम शाळेत दिनांक २८ व २९ डिसेंबर रोजी आयोजित संभाग स्तरीय क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी आमदार केराम बोलत होते.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेडचे प्रसिद्ध डॉ.विद्याधर भेदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ह भ प श्री नारायण महाराज माधापुरकर श्री श्री श्री त्रिदंडी अहोबिल स्वामीजी हैदराबाद, गंगेश्वर महाराज, माजी खा.नागेश घोडाम, एकल अभियानाचे राष्ट्रीय संघटन प्रभारी माधवेंद्र सिंह, संतोष तीरमनवार, सौ दिपालीताई घाडगे,सो मनीदीदी गोयंका यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक भाषणातून माधवेंद्र सिंह यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एकल अभियानाच्या माध्यमातून विविध खेळाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.त्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा कौशल्यांना जिल्हा राज्य, देशपातळीवर संधी उपलब्ध करून देण्यात येते मूळ भारतीय खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह देशाचे नाव मोठे करण्याची संधी मिळते असे सांगितले.माजी खा. नागेश घोडाम,ह भ प नारायण महाराज माधापूरकर,डॉ विद्याधर भेदे यांनी त्यांच्या मनोगतातून विविध खेळाचे व क्रीडा गुणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. या क्रीडा महोत्सवात नाशिक पांढरकवडा गोंदिया शहादा घोटी इगतपुरी पालघर आलापल्ली परतवाडा नारायणगाव पुणे व किनवट अशा दहा अंचलातील ३६० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता.या कार्यक्रमास रामभाऊ माताडे पुरुषोत्तम राठी, श्री दामले, रेखाताई आमटे,सुभद्रा तेलंग,ममतादीदी केडिया, गोवर्धन मुंडे, डॉ उत्तम धुमाळे,तुकाराम पेंदोर, राजुभाऊ केंद्रे, किरण बिच्छेवार,रामराव राठोड,नागनाथ कराड,विठ्ठलराव मच्छरलावार,गजानन चाडावार,रमेशचंद्र दारमवार गजानन वट्टमवार यांची उपस्थिती होती. क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सौ ज्योतीताई चौधरी गजानन मेश्राम, अमोल मुंडे, चाटे सर,संतोष मुंडे,मारुती केंद्रे, रेशमीताई कंचरलावार,वर्षाताई केंद्रे प्रवीण भुरेवार, दत्ता मायकोडे, विजय पेंदोर,दत्तात्रेय संदुलवार,अशोक कागणे,रेणुका कंचकटले तसेच संचप्रमुख, आचार्य, संभागचे पूर्ण कार्यकर्ते आंचलचे पूर्णवेळ कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिरुद्ध केंद्रे यांनी केले तर प्रेरणाताई पेरलावार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## बहुचर्चित आसलेल्या आरक्षित भूखंडावरील इमारतीच्या विक्रीचा सौदा प्रकरणात मुख्याधिकारी काय भुमिका घेतात याची जनतेत चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा ,दि. ३० डिसेंबर**

मागील काळात शहरातील सर्वे नंबर ३४ मधील आरक्षित भूखंडावरुन चर्चेला उधान आले होते,त्या आरक्षित भुखंडाच्या बदल्यात थोड्या अंतरावर आरक्षित भुखंडाचा तुकडा दान देऊन नगर पालिकेचे समाधान केले होते ,पण मुळ आरक्षित भुखंडाची विक्री करण्यात आली होती ,त्या भुखंडावर टोलेजंग १० ते १२ पक्क्या दुकान गाळे शॉपिंग सेंटरचे बांधकाम केल्याने आरक्षित जागेच्या संदर्भात शहरात प्रशन ऐरणीवर आला होता पण न.पा. प्रशासनाला हाताशी धरून त्या जागेवर टोलेजंग बांधकाम केले आहे.त्या शॉपिंग सेंटरचा सौदा करुन विक्री करण्यात येत आहे.या सौदा विक्रीची चर्चा शहरात वाऱ्यासारखी पसरली आहे. या प्रकरणात नुतन मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे कोणती भूमिका घेतात याकडे जनतेचे लक्ष लागले आहे सर्वे नंबर ३४ मधील प्लाटधारक कोणता निर्णय घेतात याची चर्चा ऐकायला मिळत आहे.

लोहा शहर वाढते शहर म्हणून नावारूपाला येत आहे.ग्रामिण भागातील नागरिक पालक मुलांचे शिक्षण व नौकरदार या ठिकाणावरुन ये.जा.करण्यास सोईस्कर वाटत आसल्याने शहरात आपल्याला हाक्काचे घर असावे या दृष्टिकोनातून प्लाट खरेदी करतात, आव्वाची सव्वा प्लाटची किंमत असली तरी प्लाट खरेदी करतात करण शहरात लगत राष्ट्रीय महामार्ग गेल्याने पुढील आयुष्यासाठी सोयीचे ठरते.म्हणुन सर्वांचा कल या शहराकडे ओढ घेत आहे. पण शहरात भु.माफियाच्या फसवेगिरीचा सुळसुळाट झाला आहे. प्लाटीगंचा एन.ऐ. करताना शासनाला जमिनीचे मुळ कागदपत्रे सादर करायचे आणी प्रवराणगी मिळाली की त्या जमिनीच्या मुळ नकाशात अदलाबदल व हेराफेरी करुन आवाजवी किमतीत प्लाटची विक्री करण्याच्या गोरखधंद्यात मोठी वाढ झाली आहे.शहराच्या लगत शेती जमीन खरेदी करुन त्या शेतीमध्ये प्लाट व्यवसायाला सुरुवात करून प्लाटला तेजी निर्माण करायचा धंद्यात वाढ झाली आहे.

शहरातील गजबजलेल्या परिसरात मागील काळात सर्वे नंबर ३४ मध्ये आरक्षित भूखंड सोडला होता.हा भुखंड मोकळा आहे म्हणुन आजुबाजुच्या लोकांना प्लाट खरेदी केला आणि लोकांच्या प्लाट विक्री चतुरसिमेमध्ये मोकळा भुखंड दाखवला आहे असे प्लाटधारकाच्या चर्चाने वेग घेतला आहे. या ठिकाणी भुमाफियानी काही काळानंतर मुळ नकाशात अदलाबदल करून तो भुखंड विक्री केला या भुखंडा विषय शहरात प्रकरण तापले बहुआयामी शहरात चर्चाचा आगडोंब उठला या भुखंडाच्या बदल्यात थोड्या अंतरावर भुखंड दान म्हणुन प्लाटचा तुकडा दिला.

आरक्षित भूखंड जागेची विक्री करुन त्या जागेवर टोलेजंग शॉपिंग सेंटर १० ते १२ गाळ्यांचे बांधकाम झाले त्या शॉपिंग सेंटरचा सौदा विक्रीचा झाला हि चर्चा शहरात वाऱ्यासारखी पसरली आहे या प्रकरणावर नुतन मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे काय निर्णय घेतात याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

शहर व परिसरात १०० च्या वर भुमाफियाचा आजतागायत प्लाटीगचा व्यवसाय चालु आहे. काही प्लाट जमिनीचे एन ऐ झाले आहेत तर.काही प्लाट जमिनीचे एन.ऐ. झालेले नाहीत तरी भु माफियाचा धंदा तेजीत आहे.भु.माफिया सुरुवातीला त्या प्लाटीग मध्ये आरक्षित भूखंड सोडला अशी बतावणी करतात आणि काही कालावधी झाल्यानंतर आरक्षित भुखंड विकुन टाकतात आशाच एक प्रकार हाळदव व इंदिरा नगर च्या पलिकडील भागात घडला आहे सर्वे नंबर ५१ मध्ये १५ गुंटे च्या भुखंडाची जागा सोडला होती त्या ठिकाणी ७ ते ८ प्लाट टाकुन करोडो रुपायला भुखंडाची विक्री केली.ग्रामिण व शहरी भागात एक एकर च्या मध्ये जमीन असेल तर आरक्षित भूखंड सोडण्याची गरज नाही पण दिड एकरच्या वर असेल तर आरक्षित भुखंड शासन नियमानुसार सोडावा लागतो पण अधिकाऱ्याला धाब्यावर बसुन हेराफेरी केली जाते.आसाच प्रकर नविन ग्रामीण रुग्णालया समोर, शहर लगत प्लाटीग,सुनेगाव परिसरात,लोहा कंधार रोड परिसरात,सायाळ रोड परिसरातील प्लाटीगच्या मुळ नकाशाची पडताळणी करुन त्या परिसरातील आरक्षित भूखंडावर न.पा.प्रशासनाने ताब्या घ्यावा त्यावर ब्यॉन लावावे अशी अनेक प्लाटधारकाची मागणी होत आहे.

## आदमपूर परिसरात वेळ अमावस्या साजरी



**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर ,दि. ३० डिसेंबर**

रआदमपूर:बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर परिसरात वेळ अमावस्या अर्थात ग्रामीण बोलीभाषेत येळवस हा कृषी संस्कृतीतला सण काही शेतकऱ्यांकडून दि.३० डिसेंबर सोमवार रोजी यथोचित साजरा करण्यात आला.आपला भारत देश हा कृषिप्रधान देश आहे,यासह राज्यातही शेती परंपरेशी निगडीत सण साजरे होतात. पेरणी केल्यानंतर सातव्या अमावस्येला हा सण साजरा केला जातो. काळ्या आईची यथासांग पूजा करून माती आणि माय लक्ष्मीचे त्यानिमित्त ऋण फेडले जाते.

मूळ कर्नाटक राज्यातील हा सण मुखेड,कंधार,देगलूर, बिलोली,लोहा अशा काही तालुक्यात साजरा केला जातो.बाहेर परगावी काम व नौकरीनिमित्त वास्तव्यास असणारे सान,थोर घराकडे धाव घेतात. आदमपूर,नवे,जुने गळेगांव परिसरातील काही शेतकरी कुटुंबांनी हा सण साजरा करीत आपली संस्कृती जपलेली आहे.वेळ अमावस्या दिवशी कडब्याच्या काही पेंड्यांची खोपी घातली जाते.त्यात मातीची लक्ष्मीची मूर्ती किंवा लक्ष्मी मातेची तसबीर ठेवली जाते.मातेसगोडाधोडाचा नैवेद्य ही दाखवला जातो.शेतातील पांडवांना नवा रंगही दिला जातो. रब्बी हंगामातील गहू,हरभरा,ज्वारी,करडई आदि पिकांत चर शिंपून भरभराटीची प्रार्थनाही केली जाते.ऊन,वारा, पाऊस या निसर्गनिर्मित बाबी आणि पर्यावरण शक्तिरूपींसमोर शेतकरी नतमस्तक होतात. सामुहिक वनभोजनाचा परिवारासह आस्वाद घेतात! या हिवाळी ऋतूत मानवी पचनसंस्था उत्तम राहते. स्निग्ध खाद्य पदार्थांचे घराघरांत सेवन केले जाते.फळे आणि पालेभाज्या खाण्याचा सल्ला दिला जातो.खूप भूक लागत असते.दूध,दही,तूप,लोणी,गूळ,तीळ,कडधान्य आदि पदार्थांचा आहारात समावेश केला जातो.अशा परंपरागत शेतीशी संबंधित सण शेतकरी कौटुंबिक साजरा करण्याला जास्त महत्व देत असतात.या वेळ अमावस्येनिमित्त माती, नाती आणि शेतकरी हे नाते या सणांमुळे अबाधित राहील,यात काहीच शंका नाही.

# सौर कृषिपंप योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर

### 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेत डिसेंबरमध्ये दररोज सरासरी ८४४ शेतकऱ्यांना लाभ

छत्रपती संभाजीनगर : शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनल्स आणि कृषिपंप असा संपूर्ण संच देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषिपंप' या योजनेच्या अंमलबजावणीला गती आली असून डिसेंबर महिन्यात दररोज सरासरी ८४४ पंप राज्यात बसविण्यात आले, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा दीर्घ काळाचा 'पेड पेंडिंग'चा प्रश्न सोडविण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. राज्यामध्ये महावितरणच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात २६ तारखेपर्यंत २१,९५१ सौर कृषिपंप बसविण्यात आले, अर्थात दररोज सरासरी ८४४ पंप बसविण्यात आले. ही आतापर्यंतची कोणत्याही महिन्यातील सर्वाधिक सरासरी आहे. राज्यात २०१५ पासून २०२३ पर्यंत विविध योजनांत १,८०,००० सौर पंप बसविण्यात आले होते. तथापि, या वर्षी मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १,५८,००० सौर पंप बसविण्यात आले आहेत. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे. 'मागेल त्याला सौर कृषिपंप' या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषिपंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो. राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्यात साडेदहा लाख सौर कृषिपंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषिपंपासाठी पैसे भरून वीज जोडणीची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा 'पेड पेंडिंग'चा प्रश्न सुटणार आहे. 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे. सौर पॅनल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषिपंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

## ६ जानेवारीला लोकशाही दिन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० डिसेंबर**

जिल्हा प्रशासनाच्यावतीने सोमवार ६ जानेवारी २०२५ रोजी नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी लोकशाही दिनामध्ये आपल्या तक्रारीसह उपस्थित व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यादिवशी महसूल, गृह, जिल्हा परिषद, पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हास्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडे लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, परिसर येथे उपस्थित राहतील. निवेदन नोंदणीची सुरूवात दुपारी १२ वा. होणार आहे. त्यानंतर लगेच प्राप्त झालेल्या अर्जावर सुनावणी घेण्यात येणार आहे. नागरिकांनी दुपारी १ ते ३ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात उपस्थित रहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे.

## जयाबाई गिरगावकर यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० डिसेंबर**

सगरोळी येथील मूळ रहिवासी असलेल्या (हल्ली मुक्काम शिवदत्तनगर, नांदेड) श्रीमती जयाबाई गंगारामजी गिरगावकर वय ८५ वर्ष यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने सोमवार, दि. ३० डिसेंबर रोजी निधन झाले आहे. त्यांचा अंत्यविधी मंगळवार, दि. ३१ डिसेंबर रोजी गोवर्धन घाट, नांदेड येथे सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे.

जयाबाई गिरगावकर यांना पाच मुले व दोन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त सनदी अधिकारी मधुकरराव गिरगावकर यांच्या त्या मातोश्री आहेत. सेवानिवृत्त बाल विकास प्रकल्प अधिकारी गंगामणी खंदारे तसेच कनिष्ठ अभियंता माणिक गिरगावकर, उपअभियंता रमेश गिरगावकर, अशोक गिरगावकर, नागनाथ गिरगावकर, सरस्वती अन्नपुरे यांच्या त्या मातोश्री आहेत.

## प्रभाग दोन मधील पाणीपुरवठ्यासाठी विजपुरवठा सुरळीत न केल्यास आंदोलन

### सामाजिक कार्यकर्ते रोहित ईटकेपेल्लीवार यांचा ईशारा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ३० डिसेंबर**

किनवट शहरातील प्रभाग क्रमांक दोन मधील सिद्धार्थनगर, साठेनगर, वेलमापुरा, लोहारगल्ली येथे मागील अनेक दिवसापासून वारंवार वीज गुल होत असल्यामुळे नागरिकांना वेळेवर पिण्याचे पाणी मिळणे दुरापास्त बनले असून यासंदर्भात विद्युत कार्यालयाकडे सातत्याने तोंडी तक्रारी करून सुद्धा कोणीही दखल घेण्यास तयार नाही प्रभाग क्रमांक दोन मधील नागरिकांची पिण्याच्या पाण्याअभावी होणारे गैरसोय तात्काळ दूर करण्यासाठी वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा सुरळीत करावा अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते रोहित ईटकेपेल्लीवार यांनी दिला आहे.



मागील अनेक दिवसापासून शहरातील प्रभाग क्रमांक दोन मध्ये दिवस रात्र वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम होत आहे या प्रभागात सार्वजनिक पाणीपुरवठ्याची वेळ निश्चित असल्यामुळे व त्याच वेळेत वीज गुल होत असल्यामुळे नागरिकांचे प्रचंड गैरसोय होत आहे. मोक्षधाम रोडला लागून असलेल्या विद्युत डीपी वरून या प्रभागात वीज पुरवठा केला जातो. परंतु या डीपीत वारंवार बिघाड होत असल्यामुळे दिवसभरातून अनेक वेळा वीज गुल होऊन पाणीपुरवठा थांबत आहे विशेष म्हणजे विजेच्या सततच्या लपंडावामुळे घरगुती उपकरणे व मोटारी खराब होऊन नागरिकांना नाहक आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.

याकडे विद्युत कार्यालयाने तात्काळ लक्ष घालून वीज पुरवठा सुरळीत करून पिण्याच्या पाण्याअभावी होणारी गैरसोय दूर न केल्यास नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा ईशारा रोहित ईटकेपेल्लीवार यांनी दिला आहे.


## कार्यालय नगर परिषद उमरी, जि. नांदेड

जा.क्र.न.प.नां./कर वि./ २५०४/२०२४ दिनांक ३१/१२/२०२४

### जाहीर सूचना

**(महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२१ (२) व १२४ अन्वये)**

उमरी नगर परिषद हद्दीतील झोन क्र. १,२ व ३ मधील शासकीय इमारती व सर्व मालमत्तांच्या फेर कर आकारणीच्या संबंधित याद्या मा. प्रधिकृत मूल्य निर्धारण अधिकारी उमरी तथा नगर रचनाकार, नगर रचना कार्यालय नांदेड यांनी तपासणी करून अंतिमरित्या अधिप्रमाणित केलेल्या आहेत. महाराष्ट्र नगर परिषदा व नगर पंचायत औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २१ (२) व १२४ अन्वये अंतिम करमुल्यांकन निर्धारण याद्या मालमत्ताधारकां च्या माहितीसाठी व अवलोकनार्थ याद्वारे जाहीर रित्या प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर याद्या नगर परिषदेच्या कर विभागामध्ये सर्व संबंधित मालमत्ता धारकास व नागरीकास, भोगवटधारकास व त्याच्या अभिकर्त्यास अवलोकनार्थ विनामुल्य उपलब्ध असतील.

अधिप्रमाणित केलेल्या याद्यानुसार संबंधित मालमत्ता धारकांना मागणी देयकें देण्यात येत आहेत. संबंधित मागणी देयकावर अपील आक्षेप असल्यास संबंधित मालमत्ता धारकांनी महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६९ व १७० नुसार मागणी देयकामध्ये दर्शविलेलया पुर्ण थकीत रक्कम व चालू मागणीच्या ५० टक्के रक्कम भरुन ३० (तीस) दिवसाचे आत अपील सचिव, मालमत्ता कर अपील समिती तथा मुख्याधिकारी नगर परिषद उमरी यांचेकडे अपील दाखल करता येईल.

**टिप - मालमत्ता धारकास अपिल करतेवेळी खालील सुचनेनुसार अपिल करावे.**

१) मालमत्ता कर बिले मिळाल्यापासून लगेच ३० दिवसाचे आत अपिल दाखल करता येईल. मुदतीनंतर केलेले अपिल अर्जावर विचार केल्या जाणार नाही.
२) अपिल दाखल करतेवेळी सन २०२३-२४ पर्यंतचा संपूर्ण थकीत कर भरावे लागेल व नवीन कर आकारणी मागणी देयकानुसार ५० टक्के रक्कम भरावी लागेल.
३) मालमत्ता धारकांने आपले अपिल अर्ज वर रू.५/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावलेले सचिव मालमत्ता कर अपिल समिती या नावाने अपिल नगर परिषद उमरी यांचेकडे दाखल करावे.

दि.३०/१२/२०२४

**स्वा./-**
**मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरी**

**स्वा./-**
**उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक न.प. उमरी**



### जाहीर प्रगटन

**तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात इ.कि.**
**फौ.अर्ज.क्र. ५३/२०२४**
**अर्जदार साहेबराव उत्तम गायकवाड**
**विरुध्द**
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय रहाटी खु. ता. उमरी**
**प्रकरण- जन्म नोंद घेणे बाबत.**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे अर्जदार साहेबराव उत्तम गायकवाड रा. रहाटी खु. ता. उमरी जि. नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म / मृत्यू नोंदणी कायदा २०२३ अन्वये दिनांक २७/०६/२०२४ रोजी नोंद घेण्यासाठी इ. कि. फौ. अर्ज ५३/२०२४ दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगी नामे मयुरी साहेबराव गायकवाड यांचा जन्म दिनांक १२/१०/२०१७ रोजी झाल्याची नोंद मौ. रहाटी खु. ता.उमरी जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार मुलीचा दि. १२/१०/२०१७ रोजीच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणा-या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**आदेशावरुन**
**तहसिलदार उमरी**

# रेट्रो ते मेट्रो संकल्पनेवर थिरकले डॉक्टर्स

## धन्वंतरी नाईटने जिंकली शहरवासीयांची मने



छ. संभाजीनगर – पंजाबी गीतांचा ठेका, गुजराती दांडियाची खंक तर महाराष्ट्रीन लावणीचा ठेका असे विविध राज्यातील नृत्य आणि संगीतातील विविध रंग उधळत महिला डॉक्टरांनी मंचावर बहारदार सादरीकरण केले. विविधतेतून साकारलेल्या एकतेच्या रंगात शहरवासीय रंगून गेले. पुकारता चला हु मै, मेरी सपनो कि राणी कब आयेगी टू अशी सुमधुर साद घालत डॉ. संजय पटणे आणि त्याच्या साथीदार डॉक्टरांनी कार्यक्रम उत्तरोत्तर रंगवत नेला.

निमित्त होते शहरातील फिजिशियनी सादर केलेल्या धन्वंतरी नाईटचे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि आयएमए च्या अध्यक्ष डॉ. उज्वला दहिफळे यांच्या हस्ते आणि संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय पटणे, आणि सचिव डॉ. अनंत कुलकर्णी यांच्या उपस्थितीत धन्वंतरीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. डॉ. शामली भारुका यांच्या गणेश वंदना सादर केल्यानंतर रेट्रो ते मेट्रो संकल्पनेवर आधारित गीतांचे सादरीकरण कार्यक्रमाचा सर्वोच्च क्षण होता. पुकारता चला हु गाण्यापासून सुरु झालेली ही मैफल डॉ. संजय पाटणे, डॉ. सुरेंद्र जैस्वाल, आनंददीप अग्रवाल, डॉ.अजय उकडगावकर , डॉ. अमोल कुलकर्णी, मंजिरी नाईक, मिलिंद खर्चे, गीतेश दळवी यांनी एकापेक्षा एक गाणी सादर करत खुलवत नेली.

वरिष्ठ ते तरुण महिला फिजिशियन्स डॉ. मंगला बोरकर, डॉ. ज्योती गयाळ, डॉ. सोनाली भट्ट, डॉ. शैलजा राव, उज्वला झंवर, यशस्विनी तुपकरी यांनी मंचावर विविध राज्यातील नृत्य प्रकार सादर करत अवघा भारत मंचावर उभा केला. डॉ. अजित कडेठाणक्र यांच्या गिटार वादनाची रंगत मैफिलीत पसरली होती. राजकीय नेत्यांची मिमिक्री सादर करत डॉ. अजय पोहेकर यांनी वर्मावर घाव घातला. मल्हारी गाण्यावरील धमाकेदार नृत्य रणजीत पालकर, शरद बिरादार आणि समीर महाजन या डॉक्टरांनी सादर केले.

माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ, सुंदर कुलकर्णी, डॉ. नंदकुमार उकडगावकर, डॉ. अमृत महाजन यांच्या उपस्थित शहरातील अनेक मान्यवर डॉक्टर आणि स्नेही कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ अभय पोहेकर, डॉ अजीत अन्नछत्रे , डॉ अजिंक्य देशमुखयांनी बहारदार सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची रंगत वाढवत नेली. डॉ. अनंत कुलकर्णी यांनी आभार मानले. व्यस्त दिनक्रमातून वेळ काढत, स्वताच्या कलागुणांना वाव देत डॉक्टरांनी स्वतासाठी वेळ काढला. त्यांच्या चेहऱ्यावर हा आनंद फुलून आला होता.

# शहर पाणीपुरवठा योजना; संयुक्त तांत्रिक पाहणी करुन अहवाल सादर करावा- इ.मा.व.कल्याण मंत्री अतुल सावे



छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका):-राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या दोनही विभागांनी पैठण ते छत्रपती संभाजीनगर रस्ता व त्याच रस्त्यालगत होत असलेल्या शहर पाणीपुरवठा योजनेच्या कामाची मनपा समवेत संयुक्त तांत्रिक पाहणी करावी व अहवाल सादर करावा. पहिल्या टप्प्यात मार्च मध्ये पाणीपुरवठा सुरु होईल असे नियोजन करावे,असे निर्देश इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नुतनीकरण मंत्री अतुल सावे यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात शहर पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीबाबत आज बैठक पार पडली. राज्याचे इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नविनीकरण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान पाटील भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, विधानसभा सदस्य आ. अनुराधा चव्हाण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, मजिप्राच्या मुख्य अभियंता मनिषा पलांडे, कार्यकारी अभियंता दीपक कोळी, मनोज पाठक मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अनिकेत कुलकर्णी, जेव्हीपीआर कंपनीचे जी.मेहंदर, खलील अहमद, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य अभियंता रवींद्र इंगोले, महानगरपालिकेचे अभियंता ए. बी. देशमुख, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अभियंता किरण पाटील यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी पाणीपुरवठा योजनेचे कामकाज करणारे कंत्राटदार आणि शेतकरी बैठकीस उपस्थित होते.

बैठकीत प्रारंभी मजीप्रातर्फे माहिती सादर करण्यात आली. त्यानुसार, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत शहर पाणीपुरवठा योजनेला २०१९ मध्ये मान्यता मिळाली. या योजनेचा अमृत २.० योजनेत समावेश करुन त्यास सुधारीत मंजूरी घेण्यात आली. आता पर्यंत १८०८ कोटी ३९ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला असून आतापर्यंत १५८३ कोटी ३२ लक्ष रुपये इतका निधी खर्च झाला आहे.

याअंतर्गत उद्धव विहिरीच्या (जॅकवेल) उभ्या भिंतीचे काम ११.९ मिटर उंचीपर्यंत पूर्ण झाले असून वर्तुळाकार भिंतीचे २२.७ मिटर उंचीचे काम पूर्ण झाले आहे. उपांग कामांमध्ये पुलाचे काम ७५ टक्के पूर्ण आहे. पाईपलाईन अंथरण्याचे काम ८८ टक्के पूर्ण झाले आहे.जलाभिसरण कारंजाचे आरसीसी काम ९० टक्के, आऊटलेट चेंबर ७२ टक्के पूर्ण, सीएलफचे काम ९५ टके पूर्ण,पम्प हाऊस व केमिकल हाऊसचे काम अनुक्रमे ७० व ७५ टक्के पूर्ण झाले आहे. या शिवाय ४७ उंच जलकुंभ व ३ बैठे जलकुंभ असे एकूण ५० जलकुंभ तयार करण्यात येणार आहेत. त्यातील ७ उंच जलकुंभ पूर्ण झाले आहेत. २ बैठे जलकुंभ पूर्ण झाले आहेत. उर्वरीत जलकुंभ ९० टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. पूर्ण झालेल्या जलकुंभांच्या कार्यकक्षेत घरगुती जोडण्यांचे कामेही सुरु आहेत,अशी माहिती देण्यात आली.

राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत रस्त्याच्या कामाबाबत माहिती सादर करण्यात आली. या योजनेसाठी पैठण ते छत्रपती संभाजीनगर या रस्त्यालगत ८ मिटर अंतरापर्यंत अस्तित्वातील १२०० मिमी पाईप लाईनच्या बाजूने नवीन २५०० मिमी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु आहे. जमिनीखाली मंजूर पाईप लाईन टाकल्यास व त्यावरुन रस्ता गेल्यास भविष्यात पाईपलाईनची देखभाल करण्याविषयी निर्माण होऊ शकणाऱ्या प्रश्नांबाबत व याबाबतच्या तांत्रिक शक्यतांवर चर्चा करण्यात आली.

श्री. सावे म्हणाले की, रस्त्याचे व जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर जलवाहिनीची देखभाल दुरुस्ती करतांना रस्ता खोदावा लागू नये. यासाठी कार्यान्वयन यंत्रणा व मनपा या तिघाही यंत्रणांनी मिळून संयुक्त तांत्रिक पाहणी करावी. येत्या चार दिवसात त्याचा अहवाल सादर करावा. येत्या मार्च पर्यंत पहिल्या टप्प्यातील २०० दलघमी पाणी शहराला पुरवठा करावे,असे निर्देश श्री. सावे यांनी दिले. तसेच या कामाची हायड्रॉलिक तसेच रेडिओग्राफिक चाचणी घेतल्यानंतरच संबंधित ठेकेदाराचे देयक अदा करावे,अशी सुचनाही श्री. सावे यांनी दिली.

ही योजना आगामी ५० वर्षांसाठी तयार करण्यात आली असून आगामी कालावधीत कोणत्याही अडचणी निर्माण होऊ नये याबाबत उपाययोजना कराव्या. लोकांना पाणी मिळावे, पैठणकडे जाणारी तसेच बिडकीन व चितेगाव या रस्त्यालगतच्या गावातील रहदारी सुरळीत व्हावी, यादृष्टीने उपाययोजना कराव्या,असे निर्देश खा. संदिपान भुमरे यांनी दिले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की. कार्यान्वयन यंत्रणांनी आपापसात समन्वय राखून काम वेळेत पूर्ण करावे.

मनपा आयुकत जी.श्रीकांत यांनी या योजनेचे काम पूर्ण करुन शहरवासियांना पाणीपुरवठा करणे हेच मनपाचे प्राधान्य असून त्यासाठी सर्व कार्यान्वयन विभागांनी मिळून संयुक्त प्रयत्न करावे,असे सांगितले.

# कामगारांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका):- उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची सुरक्षा राखणे हे कायद्याने बंधनकारक आहे. कामगारांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत यासंदर्भात एक जिल्हास्तरीय समिती तयार करुन या समितीने सर्व आस्थापनांमध्ये तपासणी पाहणी करावी व तसा अहवाल दरमहा सादर करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे दिले.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचा आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे होते. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, औद्योगिक सुरक्षा विभागाचे सहसंचालक प्र.वि. सुरसे, उपसंचालक धिरा. खिरोडकर, सहा. संचालक श्रीमती गायकवाड, ग.बा. पाचवणे, कामगार कल्याण अधिकारी चंद्रकांत राऊत यावेळी उपस्थित होते.महाराष्ट्र कारखाने नियम व महाराष्ट्र कारखाने नियम २००३ अन्वये कारखान्यांचे कामकाज व कामगारांची सुरक्षा याबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजना व आवश्यक तपासण्या व कारवाई बाबत माहिती देण्यात आली. धोकादायक व अतिधोकादायक कारखान्यांमधील कामगारांची सुरक्षा वेळोवेळी तपासणी होणे आवश्यक असून कामगार व औद्योगिक सुरक्षा अधिनियमानुसार ते बंधनकारकही आहे. याबाबत कामगारांमध्ये तसेच आस्थापना चालकांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबवावे. कामगारांना आपल्या सुरक्षा उपाययोजनांविषयी प्रशिक्षित करावे. याबाबत प्रत्येक आस्थापनेत होत असलेल्या सुरक्षा उपाययोजनांच्या अंमलबजावणीच्या तपासणीसाठी एका समितीचे गठन करावे व त्या समितीने आपला अहवाल दरमहा सादर करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

# वीजबिल वसुलीसाठी महावितरणचे मुख्य अभियंता उतरले रस्त्यावर

## थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची धडक मोहीम सुरु

छत्रपती संभाजीनगर : वीजबिल वसुलीसाठी थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या महावितरणच्या धडक मोहिमेत छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट हे स्वत: रस्त्यावर उतरले आहेत. त्यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोहिमेत सहभागी झाल्याने वीजबिल वसुलीस वेग आला आहे. महावितरणची संपूर्ण यंत्रणा जोमाने कामाला लागली आहे. थकबाकीदार ग्राहकही वीजबिल लगेचच भरून मोहिमेस सकारात्मक प्रतिसाद देत आहेत.



वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे महावितरण आर्थिक अडचणीत आलेली आहे. त्यामुळे थकबाकी वसुलीसाठी छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील शहर, ग्रामीण व जालना मंडलात महावितरणची ही मोहीम सुरू करण्यात आलेली आहे. मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्यासह सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते, तांत्रिक कर्मचारी तसेच विविध संवर्गातील संपूर्ण कार्यालयीन अधिकारी-कर्मचारीही मोहिमेत प्रत्यक्ष ग्राहकांकडे भेट देऊन थकबाकी वसुलीसाठी सरसावले आहेत. अनेक ग्राहक तातडीने बिल भरून सहकार्य करत आहेत. तर जे ग्राहक बिल भरण्यास प्रतिसाद देत नाहीत, त्यांचा वीजपुरवठा नाईलाजास्तव खंडित करण्याची कारवाई या मोहिमेत करण्यात येत आहे. तसेच थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित केल्यानंतरही कुणी ग्राहक अनधिकृतरित्या वीज वापरत असेल तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तरी वीजग्राहकांनी आपली वीजबिलांची थकबाकी व चालू बिले भरून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात नक्षत्रवाडी व सिटी चौक शाखा कार्यक्षेत्रात सोमवारी (३० डिसेंबर) राबवण्यात आलेल्या विशेष वसुली मोहिमेत मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, वरिष्ठ व्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली यांच्यासह शहर मंडलातील विविध कार्यालयांतील अभियंते, तांत्रिक कर्मचारी तसेच विविध संवर्गातील संपूर्ण कार्यालयीन अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही एकाच वेळी या मोहिमेत ग्राहकांना भेट देऊन वीजबिलांची वसुली केली.

# अन्नछत्र प्रसादालयाचे खा. संदिपान भुमरे यांच्या हस्ते होणार शुभारंभ



तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० :- पैठण नवीन वर्षापासून श्रीसंत एकनाथ महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने भाविक भक्तांसाठी अन्नछत्र प्रसादालयाचे खासदार संदिपान भुमरे यांच्या हस्ते बुधवारी दि.१ रोजी शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे यांनी दिले आहे.

श्रीसंत एकनाथ महाराज मंदिर विश्वस्त मंडळाच्या बैठकीत नवीन वर्षापासून श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी, भाविक भक्तांसाठी समाधी मंदिर परिसरामध्ये सुसज्ज अन्नछत्र प्रसादालय सुरू करण्याचा निर्णय विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आमदार विलास बापू भुमरे, विश्वस्त सदस्य अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, ह.भ.प रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले, ह.भ.प विठ्ठल चनघटे, डॉ प्रा. गणेश मोहिते यांनी घेतला असून बुधवारी १ रोजी सकाळी ११ वा या अन्नछत्र प्रसादालयाचे खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते शुभारंभ संपन्न होणार असून. वारकरी भाविक भक्तांना अधिक सुविधा देण्यासाठी सर्व विश्वस्त महेश खोचे, पांडुरंग निरखे, कैलास बोबडे, मारुती वाणी, अशोक मिसाळ, राजेंद्र गोरडे, किशोर नरवडे, राजेंद्र मिसाळ, मुकेश निवारे, पठाडे, लादे जानकर, पवार, चोथे परिश्रम घेत आहे.

# जी.डी.सी.ए. व सी.एच.एम. परीक्षा २०२४ निकाल घोषित

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका):-जी.डी.सी.ए. व सी.एच.एम. परीक्षा २०२४ सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मार्फत मे २०२४ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल घोषित झाला आहे,असे जिल्हा उपनिबंधक डॉ. मुकेश बारहाते यांनी कळविले आहे. हा निकाल परिक्षार्थ्यांना https://gdcamaharashtra.gov.in या संकेतस्थळावर आपापला लॉगइन व पासवर्ड वापरुन पाहता येईल. तसेच https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर महत्त्वाचे दुवे मधील जी.डी.सी.एड ए मंडळ येथे पहावयास मिळतील. फेरगुण मोजणीसाठी परिक्षार्थ्यांना दि.५ जानेवारी २०२५ पर्यंत https://sahakarayukta.maharashtra.gov.in यावेबसाईटवर आपला लॉगइन व पासवर्ड वापरुन अर्ज करता येईल. फेरगुण मोजणीचे शुल्क भारतीय स्टेत बँकेच्या कोणत्याही शाखेत प्रत्येक विषयासाठी प्रत्येकी ७५ रुपये या प्रमाणे व अधिक बँक चार्जेस या प्रमाणे चलनाद्वारे भरावे. बँकेचे चलन ऑनलाईन प्राप्त करुन घेण्याची मदत दि.५ जानेवारी २०२५ च्या रात्री साडेदहा (२२.३०) पर्यंत राहील. हे चलन दि.५ ते ८ जानेवारी २०२५ पर्यंत बँकेच्या कामकाजाच्या वेळत भरणा करावे. मुदतीनंतर प्राप्त अर्जांवर विचार होणार नाही,असे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था डॉ. मुकेश बारहाते यांनी कळविले आहे.

# शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या पुरस्कारांचे थाटात वितरण



छत्रपती संभाजीनगर : जुन्या आठवणी लिहिताना सातत्य, उत्स्फूर्तता आणि निरागसता असल्यास संबंधित लेखन वाचकाला निश्चितच भावते. पण, त्यात कृत्रिमता आणि रुक्षपणा असल्यास भावत नाही. असहिष्णू आणि विषारी वातावरणाचा स्पर्श टाळून संतोष आळंजकर यांनी 'रानभुलीचे दिवस' या पुस्तकात गतकातरता मांडूनही ते प्रेरक आणि ग्रामजीवनाचा इतिहास ठरले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत जयदेव डोळे यांनी रविवारी, २९ डिसेंबर रोजी येथे केले.

ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांच्या 'शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठान' चा २३ वा 'शेतकरी साहित्य पुरस्कार' संतोष आळंजकर यांना 'रानभुलीचे दिवस' या ललित गद्यसंग्रहासाठी आणि 'संदीप दळवी बालसाहित्य पुरस्कार' गणेश घुले यांना 'सुंदर माझी शाळा' या बालकवितासंग्रहासाठी प्रदान करण्यात आला. रोख ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या नांदापूरकर सभागृहात कार्यक्रमात ज्येष्ठ विचारवंत डोळे यांच्या हस्ते दोघांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे अध्यक्षस्थानी होते. शिवार प्रतिष्ठानच्या प्रेरणा दळवी आणि नीळकंठ डाके यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीणमध्ये शिक्षणाची आबाळ

डोळे म्हणाले, मागील दहा वर्षांत शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला आहे. सर्वत्र शाळेच्या पिवळ्या रंगाच्या बसेस धावताना दिसतात. पण, ग्रामीण भागात शिक्षणाची अवस्था वाईट आहे. या पार्श्वभूमीवर गणेश घुले यांचा 'सुंदर माझी शाळा' हा कवितासंग्रह काही मर्यादांसह उत्तम कविता देणारा आहे. 'ढ' मुलांवरील कवितेतून त्या मुलांची मनोवस्था मांडली आहे. मात्र, सचित्र कविता असलेल्या पुस्तकात चित्रांतून पुरुषसत्ताक व्यवस्थेचे प्रतिबिंब दिसते.

अनुभवनिष्ठ बालचरित्र

'रानभुलीचे दिवस' या पुस्तकावर रवी कोरडे यांनी भाष्य केले. ललित लेखनाची मराठी आणि हिंदी साहित्यात मोठी परंपरा आहे. हा साहित्य प्रकार परिघावरचा आहे. कविता, कथा, कादंबरी अत्यंत सर्जनशील प्रकार मानला जातो. पण, जे कवितेतून व्यक्त करता येत नाही, त्या भावावस्थेतून होणारे लेखन ललित गद्य असते. रानभुलीचे दिवस हे पुस्तक आळंजकर यांचे बालपणीचे आत्मचरित्रच आहे. अनुभवनिष्ठता असल्याने त्यात कृतकता नाही, असे कोरडे म्हणाले.

शाळेच्या सुंदर आठवणी

'सुंदर माझी शाळा'वर डॉ. जिजा शिंदे यांनी विचार मांडले. हा कवितासंग्रह शाळेच्या सुंदर आठवणी आहेत. मुलांची मनोवस्था लक्षात घेऊन लेखन करणे कठीण असते. शिक्षण व्यवस्थेचे संक्रमण, हरवत चाललेली नैतिकता या परिस्थितीत गणेश घुले यांनी कवितेतून मुलांची मनोवस्था मांडली आहे, असे शिंदे म्हणाले. डॉ. गणेश मोहिते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वीणा माळी यांनी सूत्रसंचालन केले.

# उघड्यावर कचरा आणून टाकणाऱ्या हॉटेल व्यावसायिकावर कारवाई

## दंडात्मक कारवाई करणार : स्वाती पाटील

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : घंटा गाडी सुरू असूनही सिडको परिसरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग तयार झाले आहे. या परिसरात रिक्षाद्वारे कचरा आणून टाकणाऱ्या एका हॉटेल व्यवसायीकास सिडकोच्या सहाय्यक वसाहत अधिकारी स्वाती पाटील यांनी रंगेहाथ पकडून दंडात्मक कारवाई केली. घंटागाडी सुरु असूनही सिडको परिसरात नागरिक व हॉटेल व्यावसायिक कचरा आणून टाकत असल्याच्या अनेक तक्रारी सिडको व्यवस्थापनाला प्राप्त झाल्या होत्या. त्या तक्रारीच्या अनुषंगाने सिडकोच्या सहायक वसाहत अधिकारी स्वाती पाटील या क्शन मोडवर येत कचरा टाकणाऱ्यांवर थेट कारवाई सुरू केली आहे. आज दुपारी सिडकोचे पथक गस्तीवर असतांना पाईपलाईन रोड वर हॉटेल चतुर्थीचा कचरा एका रिक्षात टाकून उघडल्यावर टाकत असतांना रंगेहाथ पकडले. या परिसरात पुन्हा कोणी कचरा आणून टाकू नये यासाठी या हॉटेल चालकावर मोठ्या रकमाची दंडात्मक कारवाई करणार असल्याचे स्वाती पाटील यांनी तरुण भारतशी बोलतांना सांगितले.



# ११ वी, १२ वी विज्ञानच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच मिळणार जातवैधता प्रमाणपत्र

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका):-शासनाने जाहीर केलेल्या १०० दिवस उद्दिष्ट कार्यक्रमांतर्गत येत्या १०० दिवस कालावधीत इ.११ वी व १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनींना जात वैधता प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयातच देण्यात येणार आहे,असे उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती छत्रपती संभाजीनगर डॉ. दीपक खरात यांनी कळविले आहे. इयत्ता ११वी व १२ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग, एएसईबीसी(मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या करीता सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी आपले अर्ज https://bartievalidity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरुन अर्जाची हार्ड कॉपी संबंधित महाविद्यालयात दाखल करावी. संबंधित महाविद्यालयांनी हे अर्ज जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करावे. समिती शिबिरे आयोजित करुन तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र देईल,असे डॉ. खरात यांनी कळविले आहे.

# मराठी साहित्य संमेलनात दहशत, गुंडगिरीविषयी ठोस उपाययोजनांबाबत ठराव पारित करावा

## समाजवादी जनपरिषदेतर्फे मसापला निवेदन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : दिल्ली येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात पुढील ठराव पारित करण्याबाबत सार्वजनिक जीवनातून दहशत आणि गुंडगिरी नष्ट करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने ठोस उपाययोजना करून भयमुक्त समाज निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा, असे पत्र समाजवादी जनपरिषदेचे अध्यक्ष ड. विष्णू ढोबळे यांनी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील व कार्यवाह कुंडलिकराव अतकरे यांना रविवारी, २९ रोजी दिले.



निवेदनात म्हटले आहे की, सांप्रतच्या काळात देशातील सार्वजनिक जीवन कमालीचे अस्थिर आणि असुरक्षित बनले आहे. उगवणाऱ्या प्रत्येक दिवशी महिला, मुली, सामाजिकदृष्ट्या कमजोर घटकांकडून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर सातत्याने हल्ले होत आहेत. अन्याय-अत्याचाराच्या घटना मन विषन्न करणाऱ्या आहेत. महाराष्ट्रातील बदलापूर, पुणे, बीड, परभणी इत्यादी ठिकाणच्या घटना केवळ हिमनगाचे टोक आहे. या स्वरुपाचीच परिस्थिती देशभर वाढीस लागलेली आहे. त्यामुळे काबाडकष्ट करूनही स्थिर, सुरक्षित जगणे सामान्य नागरिकास अशक्य झाले आहे.

साहित्यिकांनी भूमिका घ्यावी

संविधानाच्या अमृत महोत्सवी काळात हे चित्र बदलण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे अर्थातच याबाबत राज्यसंस्थेची भूमिका सर्वाधिक महत्त्वाची ठरते. गुन्हेगारांना राजाश्रय न देता कायद्याची कठोर अंमलबजावणी करून गुन्हेगारीस पायबंद करणे हे सरकारचे नैतिक आणि घटनात्मक कर्तव्य आहे. वाळू, ड्रग, शस्त्र अशा असामाजिक साधनांची तस्करी करणारे गुन्हेगार राजकीय पक्षांची पदे मिळवतात, निवडून येतात आणि मंत्रिपदे सुध्दा मिळवतात हे अधिक चिंताजनक आहे. या सर्व परिस्थितीत सामान्य नागरिक हतबल बनलेला आहे. स्वातंत्र्य आंदोलनात पाहिलेले निकोप समाजाचे स्वप्न आणि भयशून्य चित्त असलेला निर्भय नागरिक घडवण्याची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आज साहित्यिकांनी भूमिका घेण्याची गरज आहे.

संमेलनात चर्चा व्हावी

माणसांच्या सुखदु:खाशी आणि भावभावनांशी अत्यंत तरल नाते असलेले कवी, लेखक, साहित्यिक हा वर्ग आहे. आजच्या प्रतिकूल परिस्थितीत समाज मनाला उभारी देण्यासाठी आणि सत्ताधाऱ्यांची कान उघाडणी करण्यासाठी साहित्य महामंडळाने संमेलनाच्या व्यासपीठावरून चर्चा आणि भूमिका घेणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच नवी दिल्ली येथे होणाऱ्या साहित्य संमेलनात या आशयाचा ठराव आपण संमत करावा, अशी विनंती ड. विष्णू ढोबळे यांनी मसापला केली आहे.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## वनवसींच्या कार्यक्षमतेला वाव देणारे उपक्रम राबवणे गरजेचे

### माध्यमतज्ज्ञ डॉ. धारूरकर यांचे प्रतिपादन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

विरळ होत चाललेली जंगले, वने यामुळे वनवासी यांचे नैसर्गिक संसाधने नष्ट होत चालली आहेत. त्यामुळे त्यांच्या गरजेनुरूप त्यांना सक्षम बनवणारी यंत्रणा उभारावी लागेल तसेच त्यांच्या कार्यक्षमतेला वाव देणारे उपक्रम राबविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध माध्यमतज्ज्ञ डॉ. वि. ल. धारूरकर यांनी येथे केले. अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अंबादास जोशी होते.

छत्रपती संभाजीनगरमधील देवगिरी कल्याण आश्रमाच्या वतीने गुरुवारी, २६ डिसेंबर रोजी आयोजित अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचा स्थापना दिवस समारोह उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. धारूरकर बोलत होते. डॉ. धारूरकर यांनी कल्याण आश्रमाचा स्थापन उद्देश, कार्य या बाबत विस्तृत माहिती



दिली.

अडचणी लक्षात घ्याव्यात

डॉ. धारूरकर म्हणाले, आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्न करताना त्यांची आहार, संस्कृती, राहणीमान यावर विपरित परिणाम तर होणार नाहीना याचा अभ्यास करावा लागेल. आदिवासी, वनवासी व जनजाती रहिवासी भागात प्रत्यक्ष भेटी देवून त्यांच्या गरजा, अडचणी व त्यांनी सुचविलेले पर्याय विचारात घेऊन उपक्रम राबविण्यात यावेत, असे धारूरकर म्हणाले.

उपक्रमांची प्रशंसा

देवगिरी कल्याण आश्रम द्वारे चालू असलेले विविध कार्याची, आरोग्य रक्षक, रक्षाबंधन , दिवाळी फराळ वाटप, रथ यात्रा, बाल संस्कार वर्ग, युवा चेतना शिबिर, गुणवंत विद्यार्थी सत्कार, हितरक्षा जनजागृती आदी विविध आयामांची डॉ. धारूरकर यांनी प्रशंसा केली. शेवटी पसायदान आणि नंतर स्नेहाभोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पाटेगाव पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज

पैठण दि २९ :- पैठण लगतच्या गोदावरी पात्रावरील पटेगाव पुलावर अनेक संशयास्पद घटना घडत असून या घटना रोखण्यासाठी पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज निर्माण झाली आहे.

काही महिन्यांपासून पैठण- शेवगाव रस्त्यावरील पाटेगाव पुलावरून उडी घेऊन गोदावरी पात्रात आत्महत्या करण्याचा घटना घडत आहेत. डॉक्टर महिलेची मुलासह आत्महत्या करण्याची घटना ताजी असतांना शनिवार दिनांक २८ डिसेंबर रोजी दुपारी याठिकाणी एका वृद्ध महिलेचे शव पाण्यात तरंगतांना आढळून आले. याप्रकरणी पैठण पोलिसांत अनोळखी वृद्ध महिलेच्या अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.सदरील मृत वृद्ध महिलेची ओळख अद्याप पटली नसून या महिलेने स्वतः आत्महत्या केली की कुणी त्यांना मृत अवस्थेत तेथे आणून टाकले हा प्रश्न उपस्थित होत आहे. अनोळखी वृद्ध महिलेच्या मृत्यू बाबत असे प्रश्न सध्या अनउत्तरीत असून पैठण पोलीस याचा शोध घेत आहेत. अश्या घटना पुलावर घडल्यास घटनेचे नेमके सत्य बाहेर येण्यासाठी पाटेगाव पुलावर सेफ्टीसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज निर्माण झाली आहे.

## गो तस्करी विरुद्ध पैठण पोलिसांची कारवाई; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

पैठण दि २९ :- पर राज्यातल्या वाहनातून गोमातेची चोरी करून तस्करी करणाऱ्या वाहनाची शनिवारी पहाटे पैठण पोलिसांनी फिल्मी स्टाईल पाटला करून पकडले असून. तस्करी करण्यात येणाऱ्या पाच गोमातेची सुटका केली असून वाहनासह ६ लाख रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



अधिक माहिती अशी की शुक्रवारी दि.२७ रोजी रात्री पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख आपल्या पोलीस सहकार्यासह पेट्रोलिंग ग्रस्त घालीत असताना पहाटेच्या दरम्यान गोपनीय माहिती मिळाले की शेवगाव तालुक्यातील घोटण या गावातून पाच ते सहा अनोळखी चोरट्यांनी गोमातेची चोरी करून पर राज्यातील क्रमांक ठग३२ऋ्‌ष -३४५४ या वाहनातून पैठणकडे येत असल्याची माहिती मिळाल्याने तात्काळ पोलीस निरीक्षक संजय देशमुख, पो. कॉ कल्याण ढाकणे, नरेंद्र अंधारे, गायके, राजेश आटोळे यांनी शनिवारी पहाटेच्या सुमारास नवीन तहसील परिसरातून ही वाहन पळून जात असताना फिल्मे स्टाईल पाठलाग करून सदरील वाहनाला पकडले मात्र गोमातेची तस्करी करणारे पळून जाण्यात यशस्वी झाले. या वाहनाची झडती घेऊन यामध्ये असलेल्या पाच गोमातेची सुटका करून यामध्ये एक गोमाता आजारी असल्याने तात्काळ या गोमातेवर पोलीस ठाण्यात पशुवैद्यकीय पथकाकडून उपचार केला व इतर गोमातेला पैठण येथील विजय पांडुरंग गोशाळेत सुखरूप सोडण्यात आले. या घटनेत पाटेगाव येथील शेतकरी ज्ञानदेव बाबुराव डोंगरे यांच्या घरासमोरील पत्र्याच्या शेड मधून ८० हजार रुपये किमतीची गाय देखील या चोरट्यांनी चोरल्यामुळं पैठण पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून ६ लाख रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार लक्ष्मण पुरी हे करीत आहे.

## श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### शिवराज्याभिषेक व महाभारत व संत तुकाराम गाथेवरील नृत्य नाटिकांचे बहारदार सादरीकरण

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२९ डिसेंबर : गंगापूर शहरातील श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या प्रशाला व उच्च महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थिनींनी सादर केलेल्या शिवराज्याभिषेक व महाभारत व संत तुकाराम गाथेवरील नृत्य नाटिकांच्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची वाहवा मिळवली.

शाळेच्या प्रांगणात झालेल्या या संमेलनाचे उदघाटन अध्यक्ष सुशिलकुमार मंत्री यांच्या हस्ते झाले यावेळी शालेय समितीचे सदस्य सौ. तृप्ती मंत्री, संतोष





भालेराव, राजेंद्र सरोवर, रमेश पाटील प्राचार्या संजीवनी तांबे, विदुला शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी स्नेहसंमेलन दरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्यांसह गतवर्षी दहावी, बारावी परीक्षांमध्ये सर्वप्रथम आलेल्यांचा बक्षिसे देउन गौरव करण्यात आला.

यावेळी इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थिनींनी जुन्या नवीन गाण्यांवर आधारित रिमीक्स गीते, लावणी, देशभक्तीपर गीते, प्रबोधनात्मक गीतांसह ऐतिहासिक महाभारत, शिवराज्याभिषेक संत तुकाराम गाथेवर आधारित नृत्य नाटिका सादर करताना उत्कृष्ट अभिनय करून जिवंत इतिहास उपस्थितांसमोर उभा केल्याने प्रेक्षकांनी या सादरीकरणाला टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत वाहवा केली.

याप्रसंगी स्नेहसंमेलनामध्ये घेण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेतील साडेतीनशेवर विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. त्यांना प्रतिसाद देण्यासाठी हजारावर पालक व मान्यवरांच्या उपस्थितीने शाळेचा परिसर फुलून गेला होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती अरूंधती जोसाळकर व अंजली मांडे, आभार प्रदर्शन अर्चना राउत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिकांसह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बिडकीन येथे फळ विक्रेत्याला तीन जणांकडून जबर मारहाण; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि २९ डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील श्री स.भु विद्यालयाच्या समोर एका फळ विक्रेत्याला तिघा जणांकडून जबर मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले.

सविस्तर माहिती अशी की स.भु विद्यालय समोर फळ विक्रीची दुकान असून हुजेफ असिफ बागवान केळी हा नेहमी प्रमाणे सकाळी नऊ वाजेच्या सुमारस ग्राहक करीत होता केळी घेण्यासाठी आलेल्या ग्राहकांनी केळी दाबून पाहिली व भाव कमी जास्त करण्याच्या कारणावरून हुज्जत व बाचाबाची झाली. काही लोकांनी हा चालू असलेला वाद मिटवला त्यानंतर वाद गिरनार तांडा छत्रपती संभाजीनगर जाऊन परत वाद घालण्यासाठी तीन जण बुलेट या दुचाकीवर येऊन व फळ विक्रेत्याला लोखंडी मोज मापाने डोक्याला जबर मारल्याने रक्तबंबाळ होऊन मोठी दुखापत फळ विक्रेत्याला झाली.

नातेवाईक ,मित्रांनी मारहाणीत जखमी झालेल्या हुजेफला बिडकीन ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी प्रथमोपचार करून छत्रपती संभाजी नगर शासकीय रुग्णालय येथे पुढील उपचारासाठी हलवले. या मारहाणीतील आरोपी राहुल जयसिंग चव्हाण (वय २४) राहणार गिरनेरा तांडा ता.जि. छत्रपती संभाजीनगर,व अमोल जयसिंग चव्हाण यास पोलिसांनी ताब्यात घेतले असून यातील एक फरार आरोपी यांच्या विरोधात बिडकीन पोलीस स्टेशन येथे रात्री उशिरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती. जखमी हुजेफ बागवान यास शासकीय रुग्णालयातून उपचार करून सुट्टी देण्यात आल्यानंतर त्यास खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## सोयगावात दत्त मंदिरात श्री.संत जगनाडे महाराज यांना अभिवादन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ डिसेंबर

सोयगाव शहरातील दत्त मंदिरात शनिवारी श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने शनिवारी अभिवादन करण्यात आले यावेळी शिवसेना तालुका प्रमुख(शिंदे गट)प्रभाकर काळे,

सुरेश बनकर (उद्धव ठाकरे गट) यांनी प्रमुख उपस्थिती होती.ह.भ.प.जान्हवीताई सोनवणे यांनी मान्यवरांचे स्वागत केले तसेच अरूण सोहणी यांनी शाल



श्री फळ देऊन सत्कार केला. शहरातील समस्त तिळवण तेली समाजाच्या वतीने या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नगरसेवक राजू दुतोंडे,कैलास काळे,सुनील गावंडे, मयूर मनगटे, नगरसेवक राजेंद्र जावळे,वसंत बनकर,नगरसेवक हर्षल काळे,नगरसेवक संतोष बोडखे,

मोतीराम पंडित,अरुण सोहनी,मंगेश सोहनी,दिलीप मालोदे, संतोष सोनवणे,दत्तू सोनवणे,बंडू मिसाळ,शांताराम सन्सासे, कैलास पंडित,विनोद तेली,पिंटू सोहनी,सोनवणे,गणेश बागले,शिवाजी मालोदे,दत्तू राऊत,विक्रम सोहनी,गणेश क्षिरसागर,संदीप सोहनी आदींची उपस्थिती होती.

## रा.प.नाशिक ते छत्रपती संभाजीनगर बसेस गंगापूर बस स्थानकात येत नसल्याने प्रवाशांना मनस्ताप; आ. प्रशांत बंब यांचे विभागीय नियंत्रकांना पत्राद्वारे मागणी

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२९ डिसेंबर:

नाशिक, छत्रपती संभाजी नगर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस गंगापूर बस स्थानकात येत नसल्याने या बसेस छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच परस्पर मार्गस्थ होत आहेत बस स्थानकातील प्रवाशांना तासनतास बसची वाट पाहत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांना वेळेनुसार बस न

**छत्रपती संभाजी नगर व नाशिक परिवहन मंडळाच्या बसेस या गंगापूर बस स्थानकात येत नसून वाहक आणि चालक यांना पत्र देऊन सक्ती करण्यात यावी तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रकाची नेमणूक करण्यात यावी. या मागणीचे पत्र विभागीय नियंत्रक यांना दिले आहे.**

**- आ. प्रशांत बंब.**

मिळाल्याने अनेकांच्या कामांचे नियोजन बिघडत आहे. वेळेवर बस न मिळाल्याने पोहचण्यासाठी विलंब होत आहे. यासंबंधी गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांनी विभागीय नियंत्रक छत्रपती संभाजीनगर यांना पत्र देऊन सदरील बस या गंगापूर बस स्थानक येथे येणे अनिवार्य असून प्रवाशांची होणारी गैरसोय तात्काळ थांबविण्यात यावी. तर काही प्रवाशांना छत्रपती शिवाजी महाराज येथेच बसमधून उतरावे लागत आहे त्यामुळे त्यांना पुन्हा पायपीट करत बस स्थानक जावे लागत आहे.

छत्रपती संभाजीनगर ते नाशिक व नाशिक ते छत्रपती संभाजीनगर कडे जाणाऱ्या या दोन्ही विभागाच्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस गंगापूर बस स्थानकात येजा करत नसून त्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच निघून जात आहे परंतु या बसेसच्या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बस स्थानकातच ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्या मार्गावरून जाणाऱ्या बसेसच्या वाहक आणि चालक यांना पत्र काढून सर्व बस गाड्या गंगापूर आगारात येण्याचे सक्तीचे करण्यात यावे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रक यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी आमदार प्रशांत बंब यांनी केली आहे.

## राज्यासाठी समृद्धी घेऊन येणार टोयोटा : किर्लोस्कर मोटर्स

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून २० हजार कोटीची छत्रपती संभाजी नगर मध्ये गुंतवणूक

**टोयोटा किर्लोस्कर मोटर्स काय घेऊन येणार छत्रपती संभाजीनगर मध्ये राज्याच्या मागणीनुसार काय काय उभारण्यात येणार हे प्रत्यक्ष ठरवण्यात येणार असले तरी कर्नाटकच्या धरतीवर उभारण्यात आलेल्या प्रकल्पाप्रमाणे छत्रपती संभाजीनगर मध्ये ही प्रकल्प उभारण्यात येणार आहे.**

छत्रपती संभाजीनगर- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत जपान येथे जाऊन कर्नाटकच्या धरतीवरील प्रकल्पा सारखा प्रकल्प महाराष्ट्रातही घेऊन यावा अशी टोयोटा किर्लोस्कर मोटर्स कडे मागणी केली. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पाहणी करून ऑरिक सिटीतील बिडकीन एमआयडीसी मध्ये येण्यास हिरवा कंदील दाखवला. आता २०२८ -२९ मध्ये उत्पादनाला सुरुवात होणार आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या येण्याने मराठवाड्यात समृद्धी येणार हे मात्र निश्चित आहे.








### सी एस आर फंडातून आरोग्य व सामाजिक उपक्रमाला गती मिळणार

कर्नाटक राज्यातील रामनगर येथे सी एस आर फंडातून टोयोटा किर्लोस्कर मोटार ने बारा कोटी रुपये खर्च करून शासकीय रुग्णालयाला इमारत बांधून दिलेली आहे त्यातील स्वच्छता व शिस्त आपल्याकडील खाजगी रुग्णालया याप्रमाणे जाणवली आहे. कंपनीतर्फे कोविड काळात येथेच पाच कोटी रुपये खर्च करून एक ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आला . या प्लांट मधून तयार होणाऱ्या ऑक्सिजन कोविड काळात मोफत वितरित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. एकंदरीत टोयोटा किर्लोस्कर मोटार च सामाजिक शैक्षणिक आणि आरोग्य विषयक कार्य पाहता राज्याचा आर्थिक जडणघडणीत मोलाचा वाटा असणार आहे व राज्याला समृद्धी लाभणार आहे.

### छत्रपती संभाजी नगर मध्ये इकोझोन

टोयोटा किर्लोस्कर मोटर शहरात येण्याच्या कंपनीने कर्नाटक राज्यात चार हजार एकशे कोटी रुपये याचे गुंतवणूक करून वायु प्रदूषण त्याचबरोबर पाणी प्रदूषण कमी करण्याचे उद्देशाने गुंतवणूक केली आहे. यामध्ये इको गार्डन आणि सोलार प्लांट उभारण्यात आला असून कंपनीसाठी लागणारे वीज याच प्लांट मधून वापरण्यात येते. आता कंपनी आपल्याकडे येण्याच्या हालचाली वाढल्या आहेत . कर्नाटक मधील प्रकल्पाप्रमाणे पर्यावरणास 'कार्बनमुक्त प्रोजेक्ट' कंपनीतर्फे आपल्याकडेही राबवण्यात येणार असून इको गार्डन आणि सोलर प्लांट आपल्याकडेही उभारण्यात येईल हेही स्पष्ट झाले आहे. या सोलर प्लांट मधून आपल्याकडेही संपूर्ण वीज वापरली जाईल असेच चित्र दिसत आहे.

### तांत्रिक प्रशिक्षणाद्वारे कंपनीच तयार करणार कारागीर

बिडकीन एमआयडीसीमध्ये उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पात ८००० लोकांच्या हाताला काम मिळणार आहे. यामध्ये स्थानिक लोकांनाच प्राधान्य असणार असून आवश्यक कुशल कामगार कंपनीच घडवणार आहे यासाठी कर्नाटकच्या धरतीवर(ढढ्ढख) टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट भरण्यात येणार असून याद्वारे शिका आणि कमवा या तत्त्वावर आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना दोन आणि तीन वर्षाचे निवासी प्रशिक्षण देत त्यांना सक्षम करण्यात येणार आहे. सध्या टोयोट किर्लोस्कर मोटर्स कर्नाटक येथील बिदाडी एमआयडीसी मध्ये TTTI अंतर्गत तेथील विद्यार्थ्यांना निवासी प्रशिक्षण देत आहे.

**उद्योग वार्ता**
**नारायण गायकवाड**

टोयोटा किर्लोस्कर मोटर्स आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात ३१ जुलै २०२४ रोजी वीस हजार कोटी रुपयाची गुंतवणूक करारावर स्वाक्षरी करत ८२७ एकर जमीन महाराष्ट्र राज्य कंपनीला देत असल्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. त्यानुसार ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या कराराप्रमाणे टोयोटा किर्लोस्कर मोटर्स ने ८२७ एकर जमिनीचे रक्कम अळल कडे जमा करण्यात आली आहे.

आता कंपनीने राज्यात येण्याच्या हालचालींना वाढ केली आहे त्याप्रमाणे वीस हजार कोटी रुपये ग्रीन फील्ड मॅन्युफॅक्चरिंग सुविधा असलेला प्रकल्प उभारण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील ऑरीक (औरंगाबाद इंडस्ट्रियल सिटी) बिडकीन झोनमध्ये राज्यातील सर्वात मोठा चार चाकी इलेक्ट्रिक वाहन निर्माण करणारा प्रकल्प उभारणार आहे. राज्यासह मराठवाड्याच्या अर्थकारणाला या प्रकल्पाचा फार मोठा फायदा होणार असून कंपनीच्या प्रत्येक घडामोडीवर उद्योग जगताचे लक्ष लागलेले आहे.

**२०२८-२९ पर्यंत उत्पादन होणार सुरू**

प्लांट उभारणीच्या कामाची सुरुवात लवकरच प्रेरण्यात येणार असून २०१८ २९ पर्यंत उत्पादन सुरू होऊ शकते असे टोयोटा किर्लोस्कर मोटर्सचे कंट्री हेड आणि कार्यकारी उपाध्यक्ष विक्रम गुलाटी यांनी बेंगळूर येथे दृकश्राव्य माध्यमातून तरुण भारत शी बोलताना सांगितले. यावेळी ढघच् चे कार्यकारी उपाध्यक्ष, वित्त आणि प्रशासन जे शंकरा, एस व्ही पी आणि मुख्य संपर्क अधिकारी सुदीप दळवी, महा व्यवस्थापक परराष्ट्रीय व्यवहार आणि जनसंपर्क अधिकारी नरेंदर कुक्रेती आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# स्था.स्व.सं.निवडणुकांमध्ये भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा : जगताप, मुळूक, गलधर

## बीड जिल्हा शिवसेनेची बैठक संपन्न!



बीड, प्रतिनिधी- बीडसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरु केली आहे. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने काल रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची बैठक दुपारी बारा वाजता हॉटेल ग्रॅंड यशोदा येथे संपन्न झाली.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह विविध योजना राबवून महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न शिंदे यांच्या कार्यकाळात झाला. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उल्लेखनिय कामामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील शिवसेनेची सत्ता यावी, या दृष्टीने शिवसेना तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे.

बीड जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले. दरम्यान यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा झाली. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना व सर्व अंगीकृत संघटनेचे सर्व पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी उपस्थित होते.

# तालुक्यासाठी अत्याधुनिक रुग्णवाहिका उपलब्ध करा

## आ. संजना जाधव यांच्याकडे निवेदनाव्दारे केली मागणी



तभा वृत्तसेवा

कन्नड :- तालुक्यातील रुग्णांसाठी अत्याधुनिक रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी अशा मागणीचे निवेदन शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे वैद्यकीय सहाय्यक संतोष पवार यांनी विद्यमान आमदार संजना जाधव यांच्याकडे केली आहे

या निवेदनात म्हटले आहे की,तालुक्यातुन राष्ट्रीय महामार्गा सोलापूर धुळे जात असून यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झालेली आहे,कन्नड शहरातुन रुग्णांना जिल्ह्याच्या रुग्णालयात दाखल करण्यासाठी शासकीय रुग्णवाहिका उपलब्ध असून,त्यामध्ये रुग्णांना लागणाऱ्या सुविधा नसल्याने रुग्णांचा जीव धोकादायक परिस्थिती मध्ये असतो त्यामुळे आपण तालुक्यातील जनतेच्या या प्रश्नाला न्याय द्यावा अशी मागणी निवेदनात केली आहे.

# गंगाखेडच्या अन्नपूर्णेला साश्रू नयनांनी निरोप



गंगाखेड ता.२९: शहरातील मागील ४० वर्षापासून घरगुती मेस चालवणाऱ्या व प्रत्येकाच्या तोंडी ताई, मावशी, आत्या असं नाव असणाऱ्या राधाबाई हनुमानदास भंडारी ज्या गंगाखेड शहर व परिसरात साक्षात अन्नपूर्णा म्हणून ओळखल्या जात, त्यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी दिनांक २८ डिसेंबर रोजी निधन झाले.

शहरांमध्ये शिक्षणाच्या निमित्ताने येणारे विद्यार्थी, नोकरीच्या निमित्ताने येणारे कर्मचारी, बँकेतील कर्मचारी या एक ना अशा कितीतरी जणांना आपल्या हातचे चविष्ट, रुचकर जेवण आत्मीयतेने जेवु घालणाऱ्या राधा मावशी यांच्या जाण्याने शहर व परिसरात शोककळा पसरली.

येथील संत मोतीराम महाराज यांच्या दर्शनासाठी जाणे व प्रत्येक दिवाळीमध्ये संतश्रेष्ठ गजानन महाराज यांच्या शेगाव या ठिकाणी त्या जात असत. अत्यंत शांत, संयमी, आध्यात्मिक, मायाळू अशी ओळख असलेल्या या राधा मावशींना गंगाखेड शहर व परिसरातील सर्व नागरिकांच्या वतीने गोदा काठावरील स्मशानभूमीत श्रद्धांजली वाहून अखेरचा निरोप देण्यात आला.

# मराठा सेवा संघाची मुदखेड तालुका कार्यकारणी जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २९ डिसेंबर**

दि. २८ डिसेंबर रोजी राजर्षी शाहू विद्यालय मुदखेड येथे दुपारी चार वाजता मराठा सेवा संघाची तालुका कार्यकारणी निवडीची बैठक पार पडली. प्रथमता जिजाऊ वंदनेने जिजाऊ प्रतिमेचे व बहुजन प्रतिपालक शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन जिल्हा उपाध्यक्ष शिवश्री हौसाजीराव गाढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली सदरील मराठा सेवा संघाच्या बैठकीस जिल्हाध्यक्ष शिवश्री पंडितराव कदम व ड सतीश कुमार जाधव, श्री खुडे सर व कदम सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

बैठकीस मराठा कर्मचारी व समाज बांधव उपस्थित होते अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी

सर्वांशी चर्चा करून सर्वांनु मते मुदखेड तालुका सेवा संघाच्या अध्यक्षपदी शिवश्री शिवानंद पवार निवघेकर यांची निवड करण्यात आली व तालुका कार्याध्यक्षपदी शिवश्री प्राचार्य अजय सरसे तालुका सचिव पदी सचिन पाटील मगरे, कोषाध्यक्षपदी व्यंकटराव नन्नवरे सर तालुका संघटक पदी शिवश्री पंडितराव पाटील व दीपक शेळके, सल्लागारपदी प्रा आनंदराव वडजे ,सहसंघटक पदी गणेशराव शिंदे व तालुका उपाध्यक्षपदी बाबुराव कदम,दादाराव शिंदे ,सूर्यभान शिंदे ,व्यंकटराव मोरे व प्रसिद्धी प्रमुख पदी प्रतापराव पवळे या पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली

सदरील मराठा सेवा संघाच्या बैठकीस जिल्हाध्यक्ष शिवश्री पंडितराव कदम एडवोकेट सतीश कुमार जाधव जिल्हा उपाध्यक्ष हौसाजीराव गाढे यांनी मराठा सेवा संघाच्या वाटचालीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले

सदरील बैठकीस तालुक्यातील हनुमंत नटूरे, ऋषिकेश पारवेकर ,प्राध्यापक बालाजी जाधव ,अमोल आबादार ,माधव गाढे पंडित गाढे मराठा आंदोलन मारुती गाढे सर सिंधीकर, शिंदे सर, पुयड सर, नागेलीकर ,कराळे सर, पवार सर ,अनिल पाटील व इतर असंख्य समाज बांधवांची उपस्थीती होती.

# सावरकर महाविद्यालयाचे समाजासाठीचे कार्य कौतुकास्पद - डॉ.अमोल गीते

## स्वा.सावरकर महाविद्यालयातील आरोग्य शिबिराचा समारोप



बीड (प्रतिनिधी) : शिक्षण क्षेत्रात काम करत असतानाही समाजाप्रती आपले काही देणे आहे या भावनेने सावरकर महाविद्यालयाने आरोग्य शिबिर आयोजित केले याचा लाभ परिसरातील नागरिकांनी घेतला.महाविद्यालयाचे हे कार्य कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन इंडियन मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. अमोल गीते यांनी केले.

स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात आयोजित सात दिवसीय आरोग्य शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सावरकर संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे हे होते. पुढे बोलताना डॉ. अमोल गीते म्हणाले की मॉडर्न आणि अल्टरनेटिव्ह मेडिसिन या दोन्हीही पद्धती महत्त्वाच्या आहेत. क्युप्रेशर च्या उपचाराने अनेकदा रुग्णांना लाभ होतो.भविष्यात महाविद्यालयाने आयुष्यमान भारत चे हेल्थ कार्ड काढण्यासाठी शिबिर घ्यावे आय. एम. ए देखील सोबत असेल. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की गुणवत्तेबरोबर सामाजिक सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने केला आहे. कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे म्हणाले की या शिबिराचा लाभ परिसरातील नागरिकांना झाला याचे समाधान आहे.भविष्यात आणखी असे शिबरे आयोजित केली जातील. प्रास्ताविकात क्रीडा विभाग प्रमुख छत्रपती पांगरकर यांनी शिबिराची माहिती दिली. डॉ. स्वाती कुलकर्णी डॉ. अनुजा कास्तीकर, डॉ. अरविंद रायल वार या शिबिरार्थींनी मनोगत व्यक्त केले. या वेळी डॉ. सचिन कंदले यांची विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रांत अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# महिलांसाठी खास जीवन विमा उद्योगातील पहिली योजना

छत्रपती संभाजीनगर : आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने महिलांसाठी डिझाइन केलेली ' आयसीआयसीआय प्रू विश' ही योजना लॉंच केली आहे. जीवन विमा उद्योगातील आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सची ही योजना क्रांतीकारी पाऊल मानले जात आहे. आयसीआयसीआय प्रु विश योजनेतून महिलांना स्तन, गर्भाशय, गर्भाशयाचे कर्करोग आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांच्या निदानासाठी आरोग्य विमा कवच रकमेच्या १००% पर्यंत त्वरित परतावा दिला जाईल. महत्त्वाचे म्हणजे, प्रीमियमची रक्कम ३० वर्षांच्या कालावधीसाठी स्थिर राहणार आहे. ज्यामुळे विमा धारकाला त्यांच्या निधीचे अधिक चांगल्या पद्धतीने नियोजन करता येईल. या उत्पादनाचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे प्रीमियम हॉलिडे. यातून वीमा धारकाला प्रीमियम भरण्याच्या कालावधीत कधीही १२ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रीमियम भरण्याचा पर्याय मिळणार आहे.विशेष म्हणजे, यात विमा धारक महिलेला मातृत्वाशी संबंधित गुंतागुंत आणि नवजात बाळाच्या जन्मजात आजारांशी संबंधित विमा संरक्षण घेण्याचा पर्याय देखील मिळेल.

# के.व्ही. गायकवाड यांची नियुक्ती



वाळूज महानगर (प्रतिनिधी) : वाळूज महानगरातील जेष्ठ आंबेडकरवादी नेते के.व्ही. गायकवाड यांच्या चळवळीच्या कार्याची दखल घेऊन त्यांची रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटीक) पक्षाचे प्रभारी प्रदेश अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांना पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विशाल नावकर यांच्या स्वाक्षरीने निवडीचे पत्र देण्यात आले आहे. के.व्ही. गायकवाड यांच्या निवडीबद्दल परिसरातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वसमतच्या केंब्रिज महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी शेख जावेद सीए परीक्षेत यशस्वी



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ डिसेंबर**

वसमत शहरातील केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी शेख जावेद शेख गुलाब रा. माळवटा,ता.वसमत या युवकाने नोव्हेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सी.ए. अर्थात सनदी लेखापाल परीक्षेत यश मिळवले असून २६ डिसेंबर २०२४ मध्ये या परीक्षेचे निकाल घोषीत करण्यात आले आहेत. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेतलेल्या जावेदने ग्रामीण भागातील तरुणाई पुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. जावेदचे कुटूंब वसमत तालुक्यातील माळवटा येथे राहते. कुटुंबात आई,वडिल,तीन भाऊ आणि एक बहिण असा त्यांचा परिवार आहे. घरी चार एकर जमीन असून वडीलांना आर्थिक हातभार लावण्यासाठी दोन्ही भावंडे काम करतात. जावेदचे पदवीचे शिक्षण नांदेडला पूर्ण झाले. बी.कॉम च्या शेवटच्या वर्षात त्याला सीए च्या परीक्षेबद्दल अधिकची माहिती मिळाली. तेथूनच त्याने सीए अर्थात सनदी लेखापाल होण्याचा मनी चंग बांधला. जावेदने काही काळ पुण्यात राहून सीए च्या अंतिम परीक्षेची तयारी केली.पहिल्या काही प्रयत्नात तो अपयशी झाला,परंतु त्याने जिद्द सोडली नाही.तीन वेळा अपयशी झाल्यानंतर शेवटी चौथ्या प्रयत्नात तो यशस्वी झाला आहे. मनाचा निश्चय दृढ असेल आणि स्वतः च्या प्रयत्नांवर विश्वास असेल तर कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होणे

शक्य आहे,असे तो म्हणतो. स्वतः कष्ट करीत अर्थाजन करत त्याने मिळवलेलं यश इतरांसाठी प्रेरणादायी असेच आहे. जावेदच्या या यशाबद्दल केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. प्रा. पी. एन. बहिरे, प्राचार्य जगताप, उपप्राचार्य वानखेडे सर, समन्वयक प्रा. राजेगोरे आर. एस .पर्यवेक्षक प्रा. राजेगोरे ए.बी., प्रा. चव्हाण डी.एस., प्रा. कोरडे टि.एन. प्रा. कमळू एल डी आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी जावेदच्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले आहे.

# १२ जानेवारीला प्रदेश भाजपाचे शिर्डीत राज्यस्तरीय अधिवेशन



अहिल्यानगर : महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीचे महा अधिवेशन १२ जानेवारी रोजी शिर्डी येथे होणार आहे. पार्टीचे वरिष्ठ नेते व पदाधिकारी हे राज्यातील सुमारे १५००० पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या अधिवेशनाच्या नियोजनासाठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक नुकतीच पार पडली.

अधिवेशनाच्या अनुषंगाने बैठक व्यवस्था, भोजन व्यवस्था, पार्किंग, व्हीआयपी कक्ष, स्वागत कक्ष, आदींचे नियोजन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार सुरू आहे.

या नियोजन बैठकीला विधान परिषदेतील पक्षाचे मुख्य प्रतोद प्रवीण दरेकर, प्रदेश महामंत्री रणधीर सावरकर, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, कार्यालयीन प्रभारी रवी अनासपुरे, मंत्री मा. आ. स्नेहलताताई कोल्हे, मा. खा. सुजय विखे पाटील, आ. शिवाजीराव कर्डिले, आ. मोनिकाताई राजळे, आ विक्रम पाचपुते, भाजपाचे नूतन उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, बाबासाहेब वाकळे, सचिन पारखी आदींसह भारतीय जनता पार्टीच्या उत्तर व दक्षिण जिल्ह्यातील पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# सदस्य नोंदणीसाठी प्रत्येक घरी पोहोचा :अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी

## सोयगावात भाजपा सदस्यता नोंदणी अभियान बैठकीत पळासखेडा सरपंचाचा भाजपात प्रवेश



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२९ डिसेंबर

भारतीय जनता पार्टी सोयगाव-सिल्लोड सदस्यता नोदणी अभियानांतर्गत एक लाख सदस्य नोंदणी करणार आहे. कार्यकर्त्यांनी आपल्या मेहनतीने विधानसभा निवडणुकीच्या ऊर्जा आणि एकजुटीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्येही यश मिळवण्यासाठी प्रत्येक घराघरात पोहोचण्याचे काम या सदस्यता अभियानाद्वारे करावे लागेल,असे आवाहन भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी शुक्रवारी सायंकाळी सात वाजता भाजपा कार्यालय सोयगाव येथे आयोजित बैठकीत केले.

सोयगाव शहरातील भाजप कार्यालयात आयोजित सदस्यता नोंदणी अभियान बैठकीत ते बोलत होते. देशभरात चालू असलेल्या भाजप सदस्यता नोंदणी अभियानाच्या धर्तीवर तालुक्यातील अभियानाची सुरुवात करण्यात आली.मंडळ स्तरावर कार्यशाळा आयोजित करून सदस्य नोंदणी करावी आणि अधिकाधिक लोकांना भाजपशी जोडण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे.भारतीय जनता पार्टी संघटनात्मक काम करणारी पार्टी असून,लोकसभेमध्ये दोन सदस्य ते आज देशातील एक नंबरचा पक्ष त्याचबरोबर जगभरातील सर्वात मोठा सदस्य असणारा पक्ष अशी वाटचाल करणाऱ्या भाजपाचे स्वप्न अटलजींनी पाहिले होते ते आज पूर्ण होत असून,या गोष्टीचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाजप शहराध्यक्ष योगेश पाटील,माजी नगराध्यक्ष कैलास काळे,सिल्लोडचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर मोठे,सोयगाव चे तालुकाध्यक्ष बद्री राठोड, माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे,वसंत बनकर,राजेंद्र जावळे,सुनील गंवाडे,सुनील ठोंबरे,ईश्वर क्षीरसागर,मंगेश सोहनी,प्रमोद पाटील,मयूर मनगटे,दिलीप पाटील(जरंडी)जरंडी चे उपसरपंच संजय पाटील,दीपक पाटील,संजय चौधरी,संजय मंडवे,अजय पाटील,भावराव पाटील,अमृत राठोड आदींची उपस्थिती होती

पळसखेडा ता.सोयगाव येथील सरपंच राजेंद्र रेकनोद यांचा प्रवेश

दरम्यान यावेळी पळसखेडा येथील सरपंच राजेंद्र रेकनोद यांनी भाजप मध्ये अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष ईदरीस मुलतानी, ज्ञानेश्वर मोठे यांच्या हस्ते प्रवेश केला.

# पतंग उडवताना दक्षता घेण्याचे आवाहन

अहिल्यानगर : आपल्याकडे मकर संक्रांती दरम्यान पतंग उडविण्याची प्रथा आहे. मकर संक्रांत पूर्वी साधारणतः एक महिना अगोदर पतंग उडविण्यास सुरुवात होते. कटलेला पतंग पकडण्यासाठी धावताना विहिरीत पडून दोन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाल्याची दुःखद घटना नुकतीच नगर तालुक्यात घडली आहे. तसेच घराच्या इमारतीच्या छतावर पतंग उडवताना भान नसल्यामुळे इमारतीवरून खाली पडून अनेकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या वापरामुळे देखील गंभीर दुखापत होऊन अनेकांचा मृत्यू झालेला आहे. धारदार प्रतिबंधित मांजामुळे गळा, कान आदी शरीराचे भाग कापले जाणे, पक्षी - प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण होणे आदी गंभीर घटना घडलेल्या आहेत. याचबरोबर पतंग उडविण्याच्या आनंदात अनेक जण मोठ्या कर्कश आवाजात डीजे लावून जल्लोष करतांना आढळतात. या सर्व बाबींचा विचार करता नगर शहरातील तमाम जनतेस आव्हान करण्यात येते की, पतंग उडविण्याचा आनंद घेत असताना आपल्यामुळे इतरांना इजा / अपघात होणार नाही, कर्कश आवाजाच्या डीजेमुळे आजूबाजूच्या लोकांना ध्वनी प्रदूषणाचा त्रास होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. पतंग उडविणाऱ्या मुलांकडे पालकांनी लक्ष ठेवावे. मुलांनी देखील कटलेला पतंग पकडण्यासाठी बेभान होऊन सैरावैरा पळू नये. पाच दहा रुपयाचा कटलेला पतंग पकडण्यासाठी आपला अनमोल जीव धोक्यात घालू नये असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी केले आहे. शहरात कुठेही प्रतिबंधित मांजाचा वापर करतांना कोणी आढळल्यास तसेच मकर संक्रांतीच्या दिवशी कर्कश डीजेमुळे ध्वनी प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा तशा तक्रारी पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्यास संबंधितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

# जि.प.प्रा.शाळा जंगलातांडा येथे सोयगाव केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२९ डिसेंबर

भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांचे दुःखद निधन झाल्याने देशात ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा घोषित करण्यात आल्याने आणि प्रशासनाने पत्रात सूचित केल्याप्रमाणे स्वागत सत्काराला फाटा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करित

केंद्र स्तरावरील शिक्षण परिषद कार्यशाळा शनिवारी दि.२८ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा ता. सोयगाव येथे मंगलमय वातावरणात संपन्न झाली.

फिरोज तडवी केंद्र प्रमुख शिक्षण परिषदेस उपस्थितांना संबोधित करतांना म्हनता की,विद्यार्थ्यांची गुणवत्ता जर भर वाढवायचीअसेल तर सर्व शिक्षकांनी आळसपना झटकून शैक्षणिक कारियला हवं विद्यार्थीनी सुध्दा आपले हिता करिता यश डोळ्यासमोर ठेवले ठेवत न्यानार्जण केलेच पाहिजे,तूम्ही नाविन्यपूर्ण उपक्रमात भाग घेऊन आपल्या गुणवत्तेत भर घालू शकतो असे आशावादी असायला पाहिजे,त्याचप्रमाणे आपला दैनंदिनअध्यापन रंजक करण्यासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य गरजेचे असते ते बाळगायला ही शिका. केंद्र स्तरावरील शिक्षण परिषद मंचावर तडवी बोलतांना म्हणाले.

मंचावर फर्दापूर केंद्राचे केंद्रप्रमुख अण्णासाहेब पोळ, केंद्रीय मुख्याध्यापक मोतीराम जोहरे,शाळेचे मुख्याध्यापक रामदास फुसे,मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,मुख्याध्यापक प्रकाश वंजारी,उपस्थित होते.त्याचबरोबर सोयगाव केंद्रांतर्गत शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक,अतिथी निदेशक, युवा प्रशिक्षणार्थी शिक्षक बंधू-भगिनी पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पुढे संबोधित करतांना तडवी म्हणतात गणित,विज्ञान, इंग्रजी पेटीचा वापर करून विद्यार्थ्यांना १०० दिवसातच सहज वाचन आणि लेखन सुद्धा आपण शिकवू शकतो.त्या सोबत शिक्षकाच्या अध्ययन स्तर निश्चिती मध्ये प्रगती दिसून येते त्या साठी सर्व शिक्षक बंधू शिक्षिकां बंधू - भगिनींनी प्रयत्न पराकाष्ठा करणे गरजेचे आहे,असे प्रतिपादन तडवी यावेळी यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दशसूत्री कार्यक्रमाविषयी व अध्ययन स्तर निश्चिती,अध्ययन निष्पत्ती

रामदास फुसे जंगलातांडा मुख्याध्यापक यांनी शाळेच्या एकंदरीत शैक्षणिक व भौतिक प्रगती विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.Target peak app चा वापर व उपयोग करण्यासंबंधी पालकांशी संवाद साधण्यासाठी सर्व शिक्षकांना प्रेरित केले.अपार आय.डी.सुरक्षा व सुरक्षितता, उल्हास aap वर असा अक्षरांची नोंदणी,निपुण अंतर्गत माता पालक गटाची कार्यवाही,याविषयी चर्चा घडवून आणली व अंमलबजावणी विषयी माहिती दिली.

शैक्षणिक साहित्य प्रदर्शन सुध्दा आयोजित करण्यात आलेले होते केंद्रांतर्गत शाळेतील शिक्षकांनी वेगवेगळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार करून आणलेले दिसून आले. जंगलातांडा येथील ग्रामपंचायत सरपंच विशाल चव्हाण,उपसरपंच फकीरा कल्याणकर,पोलीस पाटील एकनाथ राठोड,पदम राठोड,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दयाराम राठोड,माजी अध्यक्ष विजय राठोड,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य योगेश कल्याणकर,पंचायत समिती शिक्षण विभाग प्रतिनिधी सुपडू सोनवणे यांची शिक्षण परिषदेस उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा येथिल मुख्याध्यापक व सर्वशिक्षक यांनी परिश्रम घेतले प्रा. शा.जंगलातांडा येथील सहशिक्षक राहूल सोनार यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-७३७
उपविभागीय अधिकारी कार्यालय
कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : विठ्ठल संपतराव जंजाळ रा बनशेन्द्रा ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय बनशेन्द्रा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगा सुशील विठ्ठल जंजाळच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगा सुशील विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक २३/०९/१९९६ रोजी बनशेन्द्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा सुशील विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक २३/०९/१९९६ रोजी बनशेन्द्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगा सुशील विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक २३/०९/१९९६ रोजी बनशेन्द्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २३/०९/१९९६ रोजी बनशेन्द्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-७३९
उपविभागीय अधिकारी कार्यालय
कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : विठ्ठल संपतराव जंजाळ रा बनशेन्द्रा ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय बनशेन्द्रा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगी निकिता विठ्ठल जंजाळच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगी निकिता विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक ०८/०८/२००० रोजी बनशेन्द्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी निकिता विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक ०८/०८/२००० रोजी बनशेन्द्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगी निकिता विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक ०८/०८/२००० रोजी बनशेन्द्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०८/०८/२००० रोजी बनशेन्द्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## आ.अर्जुनराव खोतकर यांच्या जन्मदिवसानिमित्त
# लक्ष्मीनारायणपुरा आरोग्य शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने प्रभाग २२ व २३ महायुती मित्र मंडळ व ओझेस मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते झाले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार अरविंद चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून राजेश राऊत, ब्रह्मानंद चव्हाण, विष्णू पाचफुले, पंडित भुतेकर, अनिरुद्ध खोतकर सौ शकुंतला कदम. सौ संध्या संजय देठे.मिर्झांवर बेग.दिनेश भगत, शुभम टेकाळे, अरिहंत मेका. महिंद्र मंचेवार, राजकुमार गुंटुक, बालाजी अडियल, गणेश जल्देवार, रमेश मुळे, एडवोकेट राहुल हिवराळे होते.



ओजस हॉस्पिटलचे डॉक्टर श्रीमंत लाखे पाटील डॉक्टर सुरजसिंह तौर व त्यांची संपूर्ण टीम यांनी तपासणी केली याप्रसंगी माननीय आमदार अर्जुनराव खोतकर माननीय शकुंतला कदम राजेश राऊत सौ संध्या देठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

आमदार अर्जुन खोतकर यांनी आपले अध्यक्षीय भाषणात जालना विधानसभा मतदारसंघात गरजू गोरगरिबांसाठी आरोग्याची सेवा आणखीन बळकटीकरण करून आरोग्य सेवेकडे प्रथमतः सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगितले. महिलांनी कुठल्याही संकोच न बाळगता आपल्या सर्व समस्या डॉक्टरांना सांगून त्याचे निदान करण्याचे आवाहन आमदार अर्जुन खोतकर यांनी केले.

या शिबिरात जवळपास पाचशे महिलांनी पुरुषांनी आपली तपासणी करून घेतली महेंद्र मंचवार यांनी तयार केलेल्या नवीन वर्षाच्या कॅलेंडरचे विमोचन आमदार अर्जुन खोतकर व मान्यवराच्या शुभहस्ते करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी आर्यन मेका, महिंद्र मंचेवार, मोहन मंचेवार, शुभम टेकाळे, बालाजी टेकाळे, अरुण पवार, राजकुमार गुजर, अभिषेक गुंजकर, आकाश लाखापती, भगवानचे पाच श्रीविनाश मंचेवार गणेश गुड्डा मनोज मनोज देवरे सागर गुंटूर किशोर शिंदे राजू पेदराम बालाजी आयडिया निलेश वानखेडे यश ठाकूर सागर ठाकूर शंकर मोहिते पृथ्वीराज दासार महेश पंचवार कन्नू गंगुल गणेश वालाकट्टी सागर मेका

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ संध्या संजय देठे यांनी केले तर सूत्रसंचालन आभार शुभम टेकाळे यांनी मानले मानले

# जालना येथे भव्य मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर; १९ जानेवारीला प्राथमिक तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**





रोटरी क्लब ऑफ जालना आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने जालन्यात २२ फेब्रुवारी रोजी मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर आयोजित करण्यात आले असून, त्या अनुषंगाने प्राथमिक तपासणी रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ रोजी करण्यात येणार आहे.

गेल्या १९ वर्षापासून जालना जालना येथील मिशन हॉस्पिटलमध्ये प्लास्टिक सर्जरी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यावर्षीही मुंबईतील नामांकित प्लास्टिक सर्जन डॉ. अनिल टिबरेवाल आणि त्यांचे सहकारी तज्ज्ञ सर्जन या शिबिरात सेवा देतील. फाटलेले ओठ, तोंड आणि चेहऱ्याची विकृती विकृती,जळाल्यामुळे हात व पायाला झालेली इजा, चिकटलेली बोटे, जळीत जखमा, अन्य जन्मजात विकृती असलेल्यांवर मोफत प्लास्टिक शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या शिबिराचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांसाठी प्राथमिक तपासणी रविवार, दि. १९ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता मिशन हॉस्पिटल, जालना येथे होईल. शिबिराची अधिक माहिती आणि नावनोंदणीसाठी मिशन हॉस्पिटलचे डॉ. ख्रीस्टोफर मोजेस, रोटरी क्लब जालनाचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया (९८२३०८३९०२), सचिव रवी भक्कड (९०२८९५१७३१), प्रकल्पप्रमुख अभय नानावटी (८६६८२ ६७०४७), प्रकल्प सहाय्यक डेव्हिड गायकवाड (९६०४९२६९७७), यांच्याशी संपर्क साधावा आणि या शिबिराचा गरजूंनी मोठ्या संख्येने लाभ घेण्यासाठी प्राथमिक तपासणी करून घ्यावी, असे आवाहन रोटरी क्लब जालना, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन आणि मिशन हॉस्पिटलच्यावतीने करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### जगाचे अज्ञान दूर होण्यासाठी संताचे चिंतन -वेदांताचार्य डाके महाराज



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

संत जगाचे अज्ञान दूर व्हावे यासाठी चिंतन करत असतात.चिंतनाची खरी गरज अज्ञानी माणसाला असते असे विचार वेदांताचार्य पंडित डाके महाराज,मानवत यांनी ,राऊत मळा परतूर येथे दि ३० डिसेंबर रोजी येथील स्व.सुमनबाई विश्वनाथ राऊत यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित कीर्तनातून मांडले. परमार्थात चिंतन महत्वाचे ,देवाला किंवा संतांना चिंतन करण्याची गरज नाही पण जगाला दुःखाच्या खाईतून बाहेर काढण्यासाठी संत चिंतन करत असतात. तुम्हा आम्हाला बंधमुक्त होऊन मोक्ष प्राप्त करण्यासाठी चिंतन करण्याची गरज असते. संत हा संदेश आपल्याला देत असतात असे वेदांताचार्य डाके महाराज म्हणाले.परमार्थ करतांना जाणीव महत्वाची जाणीव नसेल तर परमार्थ नेटका होत नाही.दुःखाची जाणीव ही चींतनाकडे घेऊन जाते,त्यात गरीब श्रीमंत हा भेद नाही,जीवन मरणाची जाणीव सर्वांना चिंतन करायला कारणीभूत असते. त्यातून शांती मिळते असे ते म्हणाले. शांती पैशाने मिळत नाही,पैशाने समृद्धी मिळू शकते असे सांगत त्यांनी संतांच्या संगतीत परमार्थ करण्याचे आवाहन केले. यावेळी ह भ प गणेश महाराज जाधव परतूरकर यांचीही उपस्थिती होती.

### जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील गुणवंत क्रीडापटू, गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे, योगदानाचे मूल्यमापन होवून त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे जिल्हा क्रीडा पुरस्कार देण्यात येतो. तरी जालना जिल्ह्यातील पात्र असलेल्या क्रीडा मार्गदर्शक व खेळाडूंनी पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज शुक्रवार दि.१० जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथे सादर करावेत. असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी केले आहे.

जिल्ह्यातील १ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक तसेच गुणवंत खेळाडू यामध्ये १ पुरूष, १ महिला आणि १ दिव्यांग खेळाडू असे एकुण ४ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. यामध्ये वर्ष २०२३-२४ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दि. १ जुलै २०२२ ते ३० जून २०२३ या कालावधीसाठी प्रत्येक वर्षाच्या खेळाडूसाठी मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

खेळाडूंने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व पाच वर्षापैकी दोन वर्षे त्या जिल्ह्याच्या मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. तर क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्र राज्यात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असले पाहिजे व त्याने पुरस्कार वितरीत करण्यात येणाऱ्या वर्षात वयाची ३५ वर्षे पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व ५ वर्षापैकी २ वर्षे त्या जिल्ह्याचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केलेले असले पाहिजे.

क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरिष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदत विजेते तसेच कनिष्ठ शालेय मधील राज्य ते राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदक विजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील. सांघिक अथवा वैयक्तिक मान्यता प्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेला खेळाडू अथवा राज्य / जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यंत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक विहित नमुन्यातील अर्ज संघटनेमार्फत अथवा वैयक्तीकरित्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथे संपर्क साधावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### ६ जानेवारीला लोकशाही दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन करण्यात येते. तरी जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

# भोकरदन नागरी समस्येच्या विळख्यात!
## स्वराज्य संघटना व आम आदमी पक्षाचे नगर परिषदेसमोर उपोषण सुरु

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरात नागरी समस्याच्या विळखा पडला असुन सर्वसामान्य नागरीक त्रस्त आहेत मात्र प्रशासन सर्वसामान्यांच्या प्रश्नाकडे सफशेल दुर्लक्ष करत असुन कुचकामी निष्क्रिय प्रशासनाच्या विरोधात स्वराज्य पक्षाचे जिहाअध्यक्ष विकास जाधव व आम आदमी पक्षाचे शेख फारूक यांनी असतीस तर कट्टा झाला ३० सोमवार पासून येथील नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे.



कोरोना काळात सर्वसामान्यांना रोजगार उपलब्ध नव्हता सोबतच गेल्या वर्षी दुष्काळजन्य परिस्थीतीने पाणीपुरवठाही बंद होता या एकुण परीस्थीतीचा विचार करता किमान गेल्या पाचवर्षाची पाणीपट्टी माफ करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा या प्रमुख मांगणीसह शहरास पाणीपुरवठा करणार्या जुई धरणात मुबलक पाणीसाठा असतांनाही शहरास नियमीत पाणीपुरवठा होत नाही त्यामुळे पाणीपुरवठा दररोज व्हायला हवा आणि पाणीपुरवठा करतांना स्वच्छ पाणी जनतेला मिळाव अशीही मांगणी उपोषणकर्यांनी केली आहे त्याचबरोबर नगरपरिषद मधील पाणीपुरवठा करणारे कर्मचारी जनतेला असभ्य वागणुक देतात अशा कर्मचार्यांच निलंबन करण्यात याव यीही मांगणी करण्यात आली असुन विविध नागरी समस्येसाठी चालु असलेल्या या उपोषणास आज पहिल्या दिवशी उत्फुर्ते प्रतिसाद मिळतांना दिसत आसुन विविध पक्ष आणि संघटनांच्या पदाधिकार्यांनी उषोषणस्थळी भेट देत उपोषणास जाहीर पाठिंबा दिला.

## कु.साक्षी दिपक सिरसाट हिचा माजी आ.अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील मौजे सिंधी पिंपळगाव येथील कु. साक्षी दिपक सिरसाट हिची संभाजीनगर येथे झालेल्या १७ वर्षाखालील शालेय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेच्या राष्ट्रीय संघ निवड चाचणीसाठी छत्रपती संभाजीनगर क्रिडा विभाग स्पर्धेतून निवड झाल्या बद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कु. साक्षी सिरसाट हिचे सर्वांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जालना तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, ग्रंथालय सेलचे जिल्हाध्यक्ष नवनाथ लोखंडे, तालुकाध्यक्ष उमेश मोहिते, विद्यार्थी सेलचे जिल्हाध्यक्ष कृष्णा गाडेकर, युवकचे कार्याध्यक्ष किशोर सवडे ,अंबड तालुका अध्यक्ष सतीश ढवळे ,महादेव गाडेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# उपविभागीय दंडाधिकारी अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत वाळू माफ्यावर धडक कारवाई अवैध गुंखनिज वरीती वाहतूक विरुद्ध कार्यवाही माननीय उपविभागीय दंडाधिकारी पुलकित सिंग साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही तालुक्यातील संयुक्त पथकाने सकाळी रीती वाहतूक करणारे हवा पकडून तहसील कार्यालयात लावण्यात आले त्यानंतर गोंदी परिसरात दोन वेळत्रित्या रेती उत्खनन करण्याकरता असलेले केणी सह ट्रॅक्टर पकडण्यात आले माननीय उपविभागीय अधिकारी यांनी स्वतः बोटीमध्ये प्रवास करून अंबड तालुका तसेच गेवराई तालुक्याच्या मध्ये



असलेल्या नदीतील सर्व केली बांधण्याकरता वापरत असणाऱ्या दोरी कापून उध्वस्त केले त्याचवेळी गोरी गांधारी या ठिकाणी तहसीलदार विजय चव्हाण व त्यांच्या पथकातील सदस्यांनी मोजे गौरी गांधारी परिसरात असलेले केणी करता बांधण्यात आलेल्या दोऱ्या कापण्यात आल्या त्यापैकी काही दोऱ्यात जप्त करून तहसील कार्यालयात जमा करण्यात आल्या त्याचबरोबर तेथील न उचलता येणाऱ्या दोऱ्या त्या ठिकाणी आग लावून भस्म करण्यात आले सदर परिसरात शोध घेतला असता दोन घेण्यास सापडून आल्या सदरील दोन घेण्यात जप्त करण्यात आले आहे सदरील कार्यवाही माननीय उपविभागीय दंडाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली सदर कार्यवाही मध्ये विविध मंडळ अधिकारी तलाठी तहसीलदार व नायब तहसीलदार समाविष्ट होते

# कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील मुली घेत आहेत व्यवसाय शिक्षणाचे धडे



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील ९वी व १०वी तील मुली व्यवसाय प्रशिक्षणाच्या माध्यमातून ख.ढ. विषय शिकत आहेत.त्या मार्फत मुलींना क्षेत्रीय भेटीसाठी मुलींना २६/१२/२०२४ वार गुरुवार रोजी गुरुकुल तंत्रनिकेतन विद्यालय भोकरदन येथे नेण्यात आले.त्या क्षेत्र भेटीत विद्यालयाचे प्राचार्य श्री. विशाल डोके यांनी मुलींना खूप छान माहिती संगितली

आत्ताच्या काळात लेर्गिशी चे महत्व मुलींना त्यांनी पटवून दिले. त्याच बरोबर संगणकीय विषय शिकविणाऱ्या श्रीमती. डोके मॅडम यांनी स्वतः मुलींकडून संगणकावर प्रात्यक्षिक करून घेतले. ते प्रात्यक्षिक करतांना मुलींना खूप उत्सुकता वाटली.आणि भविष्यात आम्ही कॉम्प्युटर चे ज्ञान घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहू असा विश्वास यावेळी मुलींनी त्यांना दिला.

या क्षेत्रीय भेटीसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती टी. एस. जाधव, श्रीमती .व्यवसाय शिक्षिका ए.डी.राऊत , डॉ .ए. जे. भरणे मॅडम श्रीमती .एस. टी. कळकटे श्री पी आर जोगदंडे यांचे सहकार्य लाभले.

# सकारात्मक दृष्टिकोन, कौशल्य व ज्ञान हीच सहकारी संस्थांच्या प्रगतीची त्रिसूत्री
## सौ.राजश्रीताई पाटील: जालन्यात मराठवाडा विभागातील पतसंस्थांचे सहकार प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यात सांघिक भावना असणे महत्त्वाचे आहे. संस्थेसाठी योगदान देताना सकारात्मक दृष्टिकोन, कौशल्य आणि ज्ञान ही त्रीसूत्री महत्वाची असून, त्यावरच संस्थेची प्रगती अवलंबून असते. संस्था म्हणजे आपले घर आणि सहकारी म्हणजे कुटुंबीय असते. संस्था टिकली तर कर्मचारी टिकतील. संस्था पुढे न्यायची असेल तर 'चलता है, नही चलेगा'. मी नाही केलं तर काय होणार?, असा विचार न करता आजचे काम आजच करण्याची स्वयंशिस्त कर्मचाऱ्यांनी लावून घ्यावी, असा मौलिक सल्ला सहकार क्षेत्रातील प्रेरणादायी वक्त्या तथा नांदेड येथील गोदावरी मल्टीस्टेट पतसंस्थेच्या चेअरमन सौ. राजश्रीताई पाटील यांनी येथे बोलताना दिला.

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन व जालना जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. २९ डिसेंबर रोजी राजुर रोडवरील शौर्य लॉन्समध्ये मराठवाड्यातील ३० पतसंस्थांचे १८६ प्रतिनिधींच्या उपस्थितीत आयोजित सहकार प्रशिक्षण



शिबिराचे उद्घाटन सौ. राजश्रीताई पाटील यांच्याहस्ते झाले, त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर सहकार व बँकिंग तज्ञ श्रीकांत जाधव, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कोषाध्यक्ष दादाराव तुपकर, जालना जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, सचिव डॉ. विठ्ठल पवार, सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष सचिन वाणी यांची उपस्थिती होती. सौ. पाटील पुढे म्हणाल्या की, पतसंस्थांसाठीचे मराठवाडा पातळीवरील हे सहकार प्रशिक्षण शिबिर हे फक्त बदलते तंत्रज्ञान, माहिती अपडेटेशनसाठीच नाहीतर, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता धारदार करण्यासाठी असल्याचे सांगून त्यांनी यासंदर्भात लाकूडतोड्याचे उदाहरण दिले. संस्थेला मोठे करा; तुम्ही आपोआपच मोठे व्हाल. नियम हे त्रास देण्यासाठी नव्हे तर तुमच्या भल्यासाठीच असतात. ज्याची पत नाही, त्याची पत निर्माण करण्याचे काम पतसंस्थांनी केले पाहिजे. पतसंस्थांमधील दैनंदिन कामे कशी चालतात, याची माहिती संचालकांना असावी. शिफारसीने कर्मचारी भरती न करता, संस्थेसाठी योगदान देऊ शकणारे व पात्र कर्मचारी नियुक्त करावेत.

आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण ज्यांच्याशी कौटुंबिक पातळीवरून व्यवहार करतो, ते देखील आपल्या पतसंस्थेचे ग्राहक बनू शकतात. त्यासाठी जिव्हाळ्याचे संबंध ठेवून तसा प्रयत्न केल्यास ग्राहक आणि ठेवी वाढवता येतील. आजूबाजूला आपण बघतो आहोत की, जास्त व्याज देणाऱ्या संस्था येत आहेत. नंतर त्या गाशा गुंडाळतात. त्याची जाणीवही नागरिकांना करून देणे गरजेचे आहे. कॉर्पोरेट आणि सहकारी संस्था यामध्ये मोठा फरक आहे. सहकाराला मानवतेचा चेहरा आहे. सहकारी संस्था कर्मचाऱ्यांच्या सुखदुःखात सहभागी होतात, त्यांच्या अडचणी जाणून येतात. कुटुंबातील सदस्य असल्याची वागणूक देतात, असे राजश्रीताई म्हणाल्या.

प्रशिक्षण शिबिराच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या सत्रात सहकार व बँकिंग तज्ञ श्रीकांत जाधव यांनी प्रभावी कर्ज वसुली व्यवस्थापन व उत्तम कर्जदार कसे ओळखावेत, या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, सहकार क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानामुळे बँका आपल्या दारात आल्या आहेत. सहकार क्षेत्रात १८ टूल्स वापरता येतात. ३५ पेक्षा जास्त कायदे पतसंस्थेला लागू आहेत. त्याच्या तरतुदी, वसुलीबाबतचे कायदे हे वसुली अधिकारी आणि सर्व स्टाफला माहित असले पाहिजे. याबाबतचे अनेक लेक्चर, सर्कुलर, विविध धोरणे युट्युबवर मिळतात. यापुढे आता सहकार कायद्यात आणखी एक बदल होणार असून चार वारसदार निश्चित करता येतील, असे त्यांनी सांगितले. अंतिम सत्रात भक्तामल व प्रेरक वक्ते पं. किशोर तिवारी यशाची गुरुकुल्ली या विषयावर प्रभावी मार्गदर्शन करून, काही टिप्स दिल्या. जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी पतसंस्थांचे कर्मचारी अपग्रेड व्हावेत, त्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची आणि कायद्याची माहिती व्हावी यासाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित केल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार म्हणाले की, युवा पिढी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कमी वेळात आकर्षक कामे करून घेत आहेत. त्यात आपण कमी न पडता आणखी सुलभ सेवा देता यावी, हे प्रशिक्षण शिबिर घेण्याचे प्रयोजन आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष जाधव यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. विठ्ठल पवार यांनी मानले. याप्रसंगी जालना पतसंस्था फेडरेशनचे संचालक प्रसन्ना जाफ्राबादकर, भगवान जायभाये, सतीश निर्वळ, सहकार भारतीचे ड. दशरथ इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जालना जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ संगमुळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तुळजाई पतसंस्थेच्या दिनदर्शीकेचा प्रकाशन सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर,दि.३० डिसेंबर -**

तुळजापूर खुर्द येथील तुळजाई नागरी सहकारी पतसंस्थेच्या सन-२०२५ या वर्षाच्या दिनदर्शीका प्रकाशन सोहळा दि.२७ रोजी संस्थेच्या सभागृहामध्ये सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक पी.ए.साठे यांच्या शुभहस्ते पार पडला. या दिनदर्शीका प्रकाशन सोहळ्याप्रसंगी माजी नगरसेवक पंडितराव जगदाळे, जिल्हा उपनिबंधक कायालयातील सहाय्यक सहकार अधिकारी नितीन पाटील,



संस्थेचे चेअरमन राजाभाऊ देशमाने, चेअरमन ताटे, संचालक सर्वश्री धनंजय कुंभार, मकसुद शेख, भिकु कुंभार, संजय देशमाने, रमेश भोजने, रामहारी भोजने, संस्थेचे कर्मचारी, संक्षप ठेव प्रतिनिधी उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन संस्थेचे व्यवस्थापक संजय ढवळे यांनी केले तर आभार व्हा.चेअरमन ताटे यांनी व्यक्त केले.

# जिल्ह्यात वेळ अमावस्या उत्साहात साजरी

## शेतशिवार माणसांनी गेले होती फुलून...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव,दि.३० डिसेंबर -**

जिल्ह्यात वेळ अमावस्या उत्साहात साजरी करण्यात आली. शेतकऱ्यांनी कुटुंबीयांसह, मित्र परिवार, नातेवाईक यांनी वनभोजनाचा आनंद घेतला. शहर आणि गावातील रस्ते आज सुनसान होते तर शेतशिवार माणसांनी फुलून गेले होते. जिल्ह्यात वेळ अमावास्या मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. यादिवशी शासकीय सुट्टी जरी जाहीर करण्यात येत नसली तरी अघोषित सुट्टीच असते. यावेळी तर सलग तीन दिवस सुट्टी असल्याने शुक्रवारी दुपारनंतर अनेकांनी गावाकडची वाट धरलेली होती. काट्याकुटाचा रस्ता तुडवत सर्वांची पावले शेतशिवाराकडे वळली होती.

भज्जी, आंबील, उकडीचे ज्वारी, बाजरीचे उंडे, चपाती, पुरणपोळी, तीळाची पोळी, गव्हाची खीर, धपाटे, कच्ची मेथी, कांदा, ज्वारी बाजरीची भाकरी असे विविध पदार्थ खाऊन झाडाखाली थोडी झोप घेऊनच सर्वजण परतीला निघतात.

उमरगा, तुळजापूर, धाराशिव लोहारा तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक गावात वेळ आमवस्या हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वेळ आमावस्या म्हणजे ग्रामीण भाषेत 'येळवस' हा सण मूळ कर्नाटकातील असला तरी मराठवाड्यातील काही जिल्ह्यात साजरा केला जातो. पेरणीनंतर येणाऱ्या सातव्या अमावस्येला हा सणसाजरा केला जातो. मार्गशीष अमावस्या म्हणजेच वेळ अमवास्या.



**धाराशिव** : भाजपचे तुळजापूर विधानसभेचे आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी शेतकरी संस्कृती जपणाऱ्या काळ्या आईची, मातीपासून बनवलेल्या पांडवांची पूजा वेळ अमावस्येनिमित्त आपल्या शेतात जावून पूजा केली. यावेळी त्यांनी हा सण बळीराजाला अधिक समृद्धी देणारा ठरावा अशी निसर्गाकडे प्रार्थना केली.

शेतकरी शेतीला आई समजून त्याचीमशागत करतो. त्याच्यातून धान्य पिकवतो व त्याच्यातून शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह होतो अशा काळ्या आईचीकृतज्ञता व्यक्त करण्याचा शेतकऱ्यांचा हा दिवस.

या दिवशी गावात अघोषित संचारबंदी होऊन प्रत्येक शिवारम ाणसांच्या गर्दीने फुलवून जातो. थंडीच्या या काळात विविध भाज्या शेतामध्ये उपलब्ध असतात, त्या सर्वभाज्यांचे मिश्रण करून त्याची भाजी (भज्जी) बनवली जाते. तर बाजरीच्या पिठा पासून उकडलेले बाजरीचे उंडे बनवले जातात. हा सण थंडीच्या ऋतूमध्ये असल्याने उष्ण पदार्थापासून बनलेल्या अन्नाचा यात समावेश होतो.

### या पदार्थाची असते मेजवानी...

बाजरीचे उंडे, वांग्याचे भरीत, तिळासोबत बनविलेल्या बाजरीच्या भाकरी, भज्जी, गुळ घालून बनवलेली खीर, याबरोबरच हे अन्न पाचविण्यासाठी ज्वारीचे पीठ रात्रभर ताकात मुरवून केलेली स्वादिष्ट आंबील असे जेवण या दिवशी केले जाते. त्याचबरोबर रानातील विविध रानमेव्याचा आनंद या दिवशी लुटला जातो. बोर, मोहोळ, बीबीचे फुलं अशा अनेक रानमेव्याचा आनंद या दिवशी घेण्यात येतो. इतर वेळी शेताकडे न फिरकणारेही आजच्या दिवशी शेतात थांबून मनसोक्त निसर्गाचा आनंद घेतात. त्यानंतर परतीची वाट धरतात. पुढील वर्षी हा सण कधी येईल याची आतुरतेने वाट पाहतात.

### संक्षिप्त वृत्त...



### सनातन वैदिक धर्म जनजागृती अभियानास प्रारंभ

**तुळजापूर, दि.३० डिसेंबर -**

शहरातील जय हनुमान नगर येथून सनातन वैदिक धर्म बद्दल जनजागृती अभियानास प्रारंभ करुन यशस्वीरित्या राबवण्यात आले. यापुढे ही हे अभियान मोठ्या प्रमाणात सर्वत्र राबवण्यात येणार आहे. श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी धर्म जागृती धर्मरक्षण तसेच गोवंश संवर्धन आणि रक्षण लव्हजिहाद अशा प्रमुख विषयावर महंत इच्छागिरी महाराज यांनी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जय हनुमान नगर येथील रहिवाशांसह महिलांची संख्या मोठ्या संख्येने होती.



### राष्ट्रीय रोलबॉल स्पर्धा : प्रणवने पटकाविले सुवर्णपदक

**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

भारतीय रोलबॉल महासंघाचे अधिपत्याखाली महाराष्ट्र रोलबॉल संघटनेच्या वतीने सातारा येथे घेण्यात आलेल्या ११ वर्षाखालील राष्ट्रीय रोलबॉल स्पर्धेत धाराशिव जिल्हा रोलबॉल संघटनेचा खेळाडू प्रणव मलदोडे याने सुवर्णपदक पटकाविले आहे. सातारा येथे झालेले राज्यस्तरीय रोलबॉल स्पर्धेतून महाराष्ट्र रोलबॉल संघटनेचे सचिव प्रताप पगार यांनी ११ वर्षे वयोगटातील मुला मुलींचे संघ जाहीर केले होते. मुलांच्या संघात धाराशिव जिल्हा रोल बॉल संघटनेचा खेळाडू प्रणव मलदोडे याची तर धाराशिव जिल्हा रोलबॉल संघटनेचे मुख्य प्रशिक्षक तथा सहसचिव प्रतापसिंह राठोड यांची संघ व्यवस्थापक पदी निवड करण्यात आली होती. धाराशिव जिल्हा रोल बॉल संघटनेचे अध्यक्ष खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन शिंदे, उपाध्यक्ष धनंजय पाटील, सचिव गिरीश पाळणे, कोषाध्यक्ष सचिन देवगिरी, रोलबॉल कोच साई राठोड, ओम राठोड आदिसह संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू, पालक आणि क्रीडा प्रेमींनी अभिनंदन केले आहे.



### राष्ट्रीय ज्युदो स्पर्धा : ओमप्रसाद करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

महाराष्ट्र ज्युदो संघटनेच्या वतीने मुंबई येथे घेण्यात आलेल्या कॅडेट वयोगटातील राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत धाराशिव जिल्हा ज्युदो संघटनेचे ज्युदो पटू ओमप्रसाद निंबाळकर याने ९० किलो पुढील वजनी गटात सुवर्णपदक पटकावत राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. यासह नाशिक येथे झालेल्या वरिष्ठ गटातील राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत ओंकार चौरे याने १०० किलो पुढील वजनी गटात रौप्य पदक तर ओमप्रसाद निंबाळकर याने १०० किलो खालील वजनी गटात कास्यपदक पटकाविले आहे. राज्य स्पर्धेतील जुदोपटूंची कामगिरी जिल्ह्यातील उदयन्मुख ज्युदोपटू साठी प्रेरणादायी ठरणार असून त्यांच्या कामगिरीबद्दल धाराशिव जिल्हा ज्युदो संघटनेचे अध्यक्ष नितीन काळे, उपाध्यक्ष वैजिनाथ घोडके, उपाध्यक्ष अमर सुपेकर, सचिव प्रवीण गडदे, सहसचिव अशोक जंगमे, कोषाध्यक्ष अभय वाघोलीकर, रवींद्र जाधव, प्रभाकर जाधव, स्पर्धा विभाग प्रमुख प्रतापसिंह राठोड, तांत्रिक समिती सचिव कैलास लांडगे, प्रशिक्षक साई राठोड यासह संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले आहे

### सौर ऊर्जेचा प्रकल्प स्थलांतर करा, मनसेचा इशारा

**नळदुर्ग, दि.३० डिसेंबर -**

नळदुर्ग येथील सर्व्हे नं २३६/७ मधील ११ हेक्टर २६ गुंठे जागा हि मुख्यमंत्री सौर योजने अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याकरीता पालिकेने प्रतिवर्षी १ रु दराने ३० वर्षाकरीता भाडेपट्याने दिली असून. ही शहरातील नळदुर्ग-तुळजापुर मार्गांवरील अत्यंत मोक्याची जागा आहे. भविष्यात नळदुर्ग तालुक्याची निर्मिती झाल्यास कार्यालयासाठी ही जागा राखीव ठेवणे गरजेचे आहे. सौर ऊर्जेचा प्रकल्प इतरत्र स्थलांतरीत करावा अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे. या जागेवरील प्रकल्प इतरत्र स्थलांतर नाही केल्यास खळखट्याक आंदोलनाचा इशारा मनसेने दिला आहे. निवेदनावर मनसेचे जिल्हा सचिव ज्योतिबा येडगे, शहराध्यक्ष अलिम शेख, शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी, शहर संघटनक रवी राठोड यांच्या स्वाक्षरी आहेत.



## 'बालाघाट'चे युवामहोत्सवात यश

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० डिसेंबर -**

कला विज्ञान व वाणिज्य म हाविद्यालयाच्या विद्यार्थी कलावंतांनी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवा महोत्सवात लोक आदिवासी नृत्य या प्रकारात प्रथम तर लोकगीत या प्रकारात द्वितीय क्रमांकाचे यश मिळविल्या बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. युवक महोत्सवात यश संपादन केलेल्या विद्यार्थी कलावंताचे संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण व संचालक बाबुराव चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलतांना मधुकरराव चव्हाण यांनी म्हटले की, विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी नेहमी धडपड केली पाहिजे, तरच यश मिळु शकते हे सर्व तुमच्या परिश्रमाचे श्रेय आहे. ग्रामीण भागामध्ये आपल्या अवतीभोवती अनेक लोककला आहेत की ज्या लोप पावत जातात की काय अशी शंका असताना युवा महोत्सवाच्या माध्यमातुन विद्यार्थी कलावंतांच्या द्वारे ही कला जोपासली जाते आहे, याचा आनंद होत आहे. या लोककलांना विद्यार्थी जतन करताना दिसून येते आहे याचे कौतुक केले.

महाविद्यालयातल्या विद्यार्थी कलावंतांनी लोक आदिवासी नृत्य, लोकगीत, लावणी, समुह गायन, सुगम गायन, भजन, वक्तृत्व, काव्यवाचन, रांगोळी, कोलाज, चित्रकला, प्रश्नमंजुषा अशा १२ कला प्रकारात आपला सहभाग नोंदवुन सादरीकरण केले. महाविद्यालयातील रामकृष्ण चव्हाण, रुपेश चव्हाण, अर्चना चव्हाण, किर्ती इटकरी, वैष्णवी सुतार, सुधामती काळे, वृषाली गायकवाड, मुस्कान शेख, श्वेता नाईक, अनुष्का सोनवणे, सोनाली काळे या विद्यार्थी कलावंतांनी सहभाग घेऊन आपल्या कलेचे उत्कृष्ठ सादरीकरण करून यश मिळविले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष राठोड, कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शाखाली सांस्कृतिक विभागातील सर्व प्राध्यापकांनी यशस्वी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

सर्व यशस्वी कलावंतांचे व म ार्गदर्शकांचे संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगावकर, कार्याध्यक्ष रामचंद्र आलुरे, उपाध्यक्ष डॉ.अभय शहापुरकर, कोषाध्यक्ष प्रदीप मंटगे, सहसचिव शहबाज काझी, लिंबराज कोरेकर, प्रकाश चौगुले, बाबुराव चव्हाण, प्राचार्य डॉ.सुभाष राठोड, कार्यालयीन अधीक्षक धनंजय पाटील, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## लोहारा तालुका, जळकोट परिसरात वेळ अमावस्या साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, जळकोट, दि.३० डिसेंबर -**

बळीराजाच्या आनंदाचा दिवस म्हणजे वेळ अमावस्या... काळया आईची पूजा करण्याचा दिवस म्हणजे वेळ अमावस्या... हा शेतकऱ्याचा सण ... लोहारा तालूका, जळकोटसह परिसरातील शिवारात मोठ्या आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. शिवारं-शिवारं वनभोजनाने फुलून गेल्याचे दृश्य दिसून आले.

जळकोटसह परिसरातील हंगरगा, नंदगाव, सिंदगाव, बोरगाव, सलगरा, बोळेगाव, कुंसावळी, घोळसगाव, मुरटा, होर्टी, सलगरा (म), किलज, लोहगाव, येडोळा, वागदरी, दस्तापुर, आष्टा, जेवळी, येणेगुर, डाळिंब,





फनेपूर, हराळी, मुरूम आदि गावच्या तसेच लोहारा तालुक्यातील शेतकरी व नागरिकांनी वेळात वेळ काढून काळ्या आईचे ऋण व्यक्त करत पुजन करून वनभोजनाचा आनंद घेतला.

सध्याच्या युगात आधुनिक तंत्रज्ञानामध्ये वाहनांची संख्या वाढली आहे. बैलगाडीमध्ये बसून जाण्याचे चित्र कमी प्रमाणात पहावयास मिळाले. त्यातल्या त्यात बच्चे कंपनी आनंदाने व उत्साहाने बैलगाडीमध्ये बसून शेताला जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

शेतकऱ्यांनी आपल्या स्वतःच्या शेतात पांडव पूजा मांडून सहकुटुंब सहपरिवार पूजा केल्याचे चित्र दिसून आले. वन भोजनामध्ये खीर, आंबील, शेंगाच्या पोळ्या, भजी, उंडे असा वन भोजनाचा बेत अनेकांनी आखून त्यावर ताव मारतानाचे चित्र शिवारा शिवारात दिसून आले.

## इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे रविवारी प्रकाशन

### धार्मिक क्षेत्रातील, उद्योगात नाविन्यपूर्ण, उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना पुरस्काराने गौरविण्यात येणार

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.३० डिसेंबर -**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या



२०२५ दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा रविवार दि.५ जानेवारीरोजी सायंकाळी ५:00 वाजता निवांता रिसॉर्ट इटकळ ता. तुळजापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळाही आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण व उद्घाटक म्हणून हभप ज्ञानेश्वर रामकृष्ण महाराज दिंडेगावकर व माजी जि.प.सदस्य अझर मुजावर तर प्रमुख पाहुणे म्हणून शेंडगे रिसर्च सेंटरचे डॉ.राजाराम शेंडगे, तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुनील चव्हाण, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष (अजित पवार गट) महेंद्र धुरगुडे, नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, संजीवनी सामाजिक संस्था अणदूरचे नागनाथ कुंभार, जितेंद्र कानडे, माजी जि.प.सदस्य वसंत वडगावे, ग्रा.पं. कार्यालय इटकळचे सरपंच साहेब क्षिरसागर, उपसरपंच फिरोज मुजावर, पोलीस उपनिरीक्षक महेश घोडके, तरुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी प्रमोद राऊत, युवा नेते आशिष सोनटक्के, ऋषी मगर, सुनील रोचकरी हे उपस्थित राहणार आहेत. या दिनदर्शिका व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन अध्यक्ष दिनेश सलगरे, उपाध्यक्ष लियाकत खुदादे, केशव गायकवाड, चांदसाहेब शेख, बालाजी गायकवाड, नामदेव गायकवाड यांनी केले आहे.

गेल्या चौदा वर्षांपासून इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने दिनदर्शिका प्रकाशन व विविध क्षेत्रांत नाविन्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येत असून यावर्षी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणाऱ्या २६ जणांचा व ५ युवा उद्योजकांचा सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ, पेन देऊन गौरविण्यात येणार आहे. यापूर्वी शिक्षक, माजी सैनिक, पोलीस पाटील, कोरोना काळात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्याना गौरविण्यात आले आहे.

## तेरखेडा-नांदगावमार्गे शिर्डीला जाणाऱ्या रस्त्याची प्रचंड दुरावस्था

### रस्त्याच्या दुतर्फा झाडे झुडपे वाढल्याने वाहन चालवणे झाले जिकिरीचे...संबंधित अधिकारी निद्रावस्थेत...

**तभा वृत्तसेवा/ सुधीर घोलप**
**तेरखेडा,दि.३० डिसेंबर -**

गाव खेड्याचा विकास झाला तर शहराचा विकास होतो. मात्र शहरांना जोडणारे रस्ते व्यवस्थित नसले तर याचा परिणाम दळणवळणावर होतो. रस्ते व्यवस्थित नसले तर शेतकऱ्यांचा माल वेळेवर बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होत नाही. गावखेड्यातील मुलामुलींना शिक्षणासाठी वेळेवर शहरात जाता येत नाही. गावखेड्यातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवल्यास रस्ता खराब असल्याने उपचारासाठी जात असताना विलंब होत आहे. देशात, राज्यात अनेक नवनवीन रस्ते झाले असून रस्त्याचे मोठे जाळे विणले गेले आहे. मात्र गाव खेड्याकडे याचा अभाव असल्याचा दिसून येत आहे.

वाशी तालुक्यातील तेरखेडा, नांदगाव मार्गे शिर्डीला जोडणाऱ्या रस्त्याची मोठी दूर अवस्था झाली आहे. मागील अनेक दिवसांपासून या रस्त्यावरती मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. खड्ड्यात रस्ता



की रस्त्यात खड्डा हे समजणे मुश्किल झाले आहे. रस्ता खराब असल्याने या रस्त्यावरती अनेक छोटे-मोठे अपघात झाले आहेत. दळणवळणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा रस्ता आहे.

तेरखेडा, नांदगाव, भूम या रस्त्याने अनेक गावाचा संपर्क जोडला जात असून, पुढे हा रस्ता जामखेड, अहिल्यानगर, आणि शिर्डीला जोडला जात आहे. त्यामुळे या रस्त्याने आंध्रा, कर्नाटक, तेलंगणा तसेच महाराष्ट्रातील भाविक शिर्डी साईबाबांच्या दर्शनाला जाण्यासाठी जवळचा मार्ग म्हणून याच रस्त्याचा वापर करत असतात. मात्र रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाल्यामुळे भाविकांना दर्शनासाठी जात असताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच

खेड्याची जीवन वाहिनी समजली जाणारी लाल परी याच रस्त्याने दिवसभरात धावत असते. रस्ता खराब असल्याने लाल परीतून प्रवास करत असताना नागरिकांना बैलगाडीत बसल्यासारखे वाटत आहे,असे नागरिक सांगत आहेत. खराब रस्ता असल्याने कंबर दुखी, पाठ दुखी, मनके दुखी सारखे आजार उद्भवत आहेत. तरी देखील संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष आहे. यावरून या खात्याचा भांगळ कारभार समोर येत आहे. नांदगाव गावापासून काही किलोमीटर अंतरावर गेल्यानंतर या रस्त्यावरती घाट आहे.

घाटात अक्षरशा रस्त्याची चाळन झाली असून रस्त्यावरती गुडघाभर खोल खड्डे पडले आहेत, असेच म्हणावे लागेल. यामुळे वाहन चालकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्यावर अवघड चढ-उतार आणि धोक्याची वळणे आहेत.

त्यात रस्त्यावर दुतर्फा मोठी झाडे झुडपे वाढली असून समोरून येणाऱ्या वाहनांचा चालकांना अंदाज येत नाही. त्यामुळे अपघात होत आहेत. तसेच रस्ता खराब झाल्याने वाहनांची रहदारी देखील आता कमी झाली आहे. तरी देखील रस्त्या संबंधित अधिकारी मात्र ऑफिसमध्ये फॅन ची हवा खात नो टेन्शनमध्ये आहेत.

## अनुदानासाठी मनसेचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० डिसेंबर -**

सन २०२४ -२५ खरीप मध्ये सोयाबीन पीक काढणे अवस्थेत असताना मोठ्या प्रम ाणे पाऊस झाल्याने पिकाचे नुकसान झाले होते. त्याची शेतकऱ्याने तक्रार करून विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी पंचनामे केले आहेत. त्या चार-पाच महिने झाले असून अद्याप पर्यंत विमा रक्कम मिळाली नाही. तसेच अतिवृष्टी अनुदान मिळाले नाही.

खरीप हंगामातील पिकांची मोठ्या प्रम ाणात घट आले आहेत मालाला भाव नाही तसेच नाफेड मार्फत शासनाची खरेदी अत्यंत संत गतीने चालू आहे. बारदाना नसल्यामुळे केंद्र बंद राहतात. त्यामुळे ना विलाजामुळे सोयाबीन व्यापाऱ्याला कमी भावात विकावे लागते. सन २०२४-२५ चा पिक विमा लवकरात लवकर देण्यात यावा सोयाबीन अतिवृष्टी अनुदान तात्काळ वाटप करावी नाफेड खरेदी केंद्राची संख्या वाढवावी तसेच सोयाबीन खरेदीची मुदत वाढवावी २३-२४ चे सोयाबीन अनुदान शेतकऱ्यांना त्वरित वाटप करावे. नसता प्रशासनाच्या विरोधात मनसेच्या वतीने आंदोलाचा इशारा दिला आहे. निवेदनावर तालुका अध्यक्ष अक्षय चेडे,तसेच श्रीमंत कवडे, शिवशंकर गायकवाड, ओमकार कुदळे यांची स्वाक्षरी आहे.